❖ संस्थापक : कै. वसंत काणे ❖ नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ ❖ पुणे आवृत्ती शनिवार, दि. २४ ऑक्टोबर २०२६ ❖ पाने : ८ ❖ अंक : २९८ ❖ Gmail : news.sandhya@gmail.com ❖ किंमत : ७ रूपये

www.dainikesandhya.com Epaper - www.sandhyaepaper.com www.youtube.com/@sandhyalivenews

७० वर्ष निर्भीड पत्रकारीतेची

दैनिक संध्या

निःपक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक



थोडक्यात...

वाढत्या तापमानामुळं अंगाची लाहीलाही

मुंबई : दैनिक संध्या

राज्यातील वातावरणात मोठा बदल झाला आहे. पावसाळ्याचा काळ संपला आहे, तरीदेखील राज्यातील बहुतांश भागात पाऊस पडलेला नाही. त्यामुळं शेतकऱ्यांची उभी पिकं करपून गेली आहेत. या पार्श्वभूमीवर सरकारनं राज्यात दुष्काळ जाहीर केला आहे. दरम्यान, सध्या हिवाळ्याचे दिवस सुरु झाले आहेत, तरीदेखील राज्यात तापमानाचा पारा वाढत असल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. दिवसेंदिवस राज्यात तापमानाचा पारा वाढत असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. वाढत्या तापमानामुळं अंगाची लाहीलाही होत आहे. सध्या हिवाळा सुरु झाला तरी उष्णता कमी होताना दिसत नाही. यावर्षी पावसाळा कोरडाच गेला आहे. राज्यातील बहुतांश भागात पाऊसच झाला नाही. त्यामुळे देखील तापमान वाढत असल्याचं बोललं जात आहे. राज्यातील बहुतांश शहरात तापमानाचा पारा 35 ते 39 अंशांवर गेला आहे. त्यामुळं वाढत्या तापमानाचा नागरिकांना त्रास होत असल्याचं पाहायला मिळत आहे. महाराष्ट्रात ऑक्टोबर महिन्यात कडाक्याच्या उन्हाचा तडाखा आणि 'ऑक्टोबर हीट'चा प्रभाव वाढला असून, हवामान विभागाने (IMD) राज्यातील काही जिल्ह्यांमध्ये तापमानाचा पारा 35 ते 39 अंशावर गेला आहे. राज्याच्या कमाल तापमानात चढ-उतार सुरू आहेत. अनेक ठिकाणी पारा सातत्याने 35 अंशांच्या वरच आहे. मराठवाड्यासह विदर्भात तापमानाचा पारा अधिक असल्याचं चित्र पाहायला मिळत आहे.

भारतीय संघात बदल; ईशान किशनची माघार

मुंबई : दैनिक संध्या

भारत आणि न्यूझीलंड यांच्यात सुरू असलेल्या टी-२० मालिकेत दुसऱ्या सामन्यापूर्वी टीम इंडियाला मोठा धक्का बसला आहे. यष्टीरक्षक-फलंदाज इशान किशन दुखापतीमुळे दुसऱ्या टी-२० सामन्यात खेळू शकणार नाही. शनिवारी होणाऱ्या या सामन्यासाठी भारतीय संघात कुमार कुशाग्राचा पर्यायी खेळाडू म्हणून समावेश करण्यात आला आहे. भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने याबाबत अधिकृत माहिती दिली आहे. बीसीसीआयने दिलेल्या माहितीनुसार, न्यूझीलंडविरुद्ध पहिल्या टी-२० सामन्यादरम्यान इशान किशनच्या उजव्या मांडीजवळील स्नायूंना दुखापत झाली. या दुखापतीचं स्वरूप सौम्य असल्याचं सांगण्यात आलं आहे. त्यामुळे त्याला दुसऱ्या सामन्यातून बाहेर राहावं लागणार आहे. दरम्यान, बीसीसीआयचं वैद्यकीय पथक इशानच्या दुखापतीवर लक्ष ठेवून आहे. तो पुन्हा मैदानात कधी परतणार, याबाबत अद्याप स्पष्ट माहिती देण्यात आलेली नाही. इशानच्या अनुपस्थितीत भारतीय संघाने कुमार कुशाग्राला पर्यायी खेळाडू म्हणून बोलावलं आहे. सध्या तो न्यूझीलंडमधील क्राइस्टचर्च येथे भारत अ संघासोबत आहे. दुसऱ्या टी-२० सामन्यासाठी तो मुख्य भारतीय संघात दाखल होणार आहे.

अडीच वर्षांनंतर ऑडिओ क्लिप बाहेर येण्यामागे हेतू काय?

फॉरेन्सिक चौकशीतून सत्य बाहेर काढणार; मुख्यमंत्र्यांचा इशारा, स्पाय पेनवरून सुप्रिया सुळेंना टोला



■ नागपूर (दै. संध्या)

राज्यातील विधान परिषदेच्या पाच जागांसाठी आज मतदान पार पडत असून, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नागपूर विभागीय पदवीधर मतदारसंघासाठी आपला मतदानाचा हक्क बजावला. मतदानानंतर माध्यमांशी संवाद साधताना त्यांनी राज्यात सुरू असलेल्या राजकीय घडामोडींवर सविस्तर भाष्य केले. मनोज जरांगे पाटील यांनी समोर आणलेल्या ऑडिओ क्लिपची फॉरेन्सिक चौकशी केली जाईल, अशी ग्वाही मुख्यमंत्र्यांनी दिली. तसेच, पुण्यात भाजपकडून 'स्पाय पेन'चा वापर होत असल्याच्या आरोपांवरून त्यांनी सुप्रिया सुळे यांना टोला लगावला.

मनोज जरांगे यांच्या ऑडिओ क्लिपबाबत विचारलेल्या प्रश्नावर बोलताना मुख्यमंत्री म्हणाले, "काल शिवसेना (शिंदे गट) पदाधिकाऱ्यांचे शिष्टमंडळ मला भेटले. समोर आलेल्या ऑडिओ क्लिपची किंवा संभाषणाची पूर्णपणे फॉरेन्सिक चौकशी होईल, असे मी त्यांना आश्वासित केले आहे. अडीच वर्षांनंतर हे संभाषण आत्ताच बाहेर येण्यामागे नेमका हेतू काय आहे आणि कोणाला टार्गेट केले जात आहे, असे अनेक प्रश्न आहेत. मनोज जरांगे, शिवसेनेचे शिष्टमंडळ आणि भाजपनेही या चौकशीची मागणी केली आहे. त्यामुळे फॉरेन्सिक चौकशीतून याचे जे काही सत्य आहे, ते आम्ही बाहेर काढू." ५०० कोटींच्या आरोपांवरून भाजपची बदनामी होत आहे का, यावर मात्र त्यांनी अधिक बोलणे टाळले. मतदान प्रक्रियेबाबत बोलताना त्यांनी समाधान व्यक्त केले. "लोकांमध्ये मतदानाचा मोठा उत्साह दिसत असून जनरल इलेक्शनसारखा रिस्पॉन्स आहे. विधानपरिषद हे ज्येष्ठांचे सभागृह आहे, त्यामुळे सर्व पदवीधर आणि शिक्षकांनी जास्तीत जास्त मतदान करावे," असे आवाहन त्यांनी केले. नागपूर पदवीधर मतदारसंघाबद्दलच्या आठवणींना उजाळा देताना ते म्हणाले, "५७ वर्षांपूर्वीची ही जागा गमावली होती, त्याचे एक शल्य होते. माझे वडील सुद्धा या मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करत होते, ही एक वेगळी आठवण आहे. यावेळेस मात्र सकारात्मक वातावरण दिसत असून योग्य तोच निकाल लागेल."

'सुप्रियाताईंनी तो स्पाय पेन मला नक्की पाठवावा'

पुणे पदवीधर निवडणुकीत भाजपकडून मतदारांना पैसे वाटण्यासाठी 'स्पाय पेन'चा वापर केला जात असल्याचा आरोप विरोधकांनी केला होता. या आरोपावर मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, "स्पाय पेन म्हणजे नेमके काय आणि तो कसा असतो, हे सुप्रियाताईंनी मला जरूर पाठवून द्यावे. म्हणजे तो स्पाय पेन काय असतो आणि नेमके काय चालले आहे, हे मी निश्चितपणे समजून घेईन."

भाजप उमेदवारावर आचारसंहिता भंगाचा आरोप; गळ्यात पक्षाचे चिन्ह घालून मतदान

राज्यातील विधान परिषदेच्या 5 जागांसाठी (शिक्षक आणि पदवीधर मतदारसंघ) सकाळपासून मतदान पार पडत आहे. या निवडणुकीत तब्बल १८२ उमेदवारांचे भवितव्य आज मतपेटीत बंद होणार असून, २७ ऑक्टोबर रोजी मतमोजणी होणार आहे. सकाळपासूनच 'स्पाय पेन' आणि ५०० कोटींच्या ऑडिओ क्लिपवरून राजकीय वातावरण तापलेले असतानाच, आता पुणे शिक्षक मतदारसंघातील एका नव्या वादामुळे निवडणुकीत आणखी भर पडली आहे. भाजपचे उमेदवार कौस्तुभ गावडे यांनी गळ्यात पक्षाचे चिन्ह घालून मतदान केल्याचा व्हिडिओ समोर आल्यानंतर, सुप्रिया सुळे यांच्यासह महाविकास आघाडीच्या नेत्यांनी आचारसंहिता भंगाचा गंभीर आरोप करत निवडणूक आयोगाकडे कारवाईची मागणी केली आहे. पुणे शिक्षक मतदारसंघातील भाजपचे उमेदवार कौस्तुभ गावडे यांचा मतदान करतानाचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. या व्हिडिओमध्ये गावडे हे गळ्यात आपल्या पक्षाचे चिन्ह असलेले उपरणे घालून मतदान केंद्रात प्रवेश करताना आणि मतदान करताना दिसत आहेत. नियमानुसार मतदान केंद्राच्या आत कोणत्याही पक्षाचे चिन्ह, झेंडा किंवा प्रचार साहित्य नेण्यास सक्त मनाई असते. या प्रकारावर राष्ट्रवादी काँग्रेसच्या (शरद पवार गट) खासदार सुप्रिया सुळे यांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे. सदर व्हिडिओ शेअर करत त्यांनी प्रशासनाला धारेवर धरले. "मतदान केंद्रावर पक्षीय ओळख बाजूला ठेवून एक सामान्य मतदार म्हणून जाणे अपेक्षित असते.

विधान परिषदेच्या ५ जागांसाठी मतदान

पुणे शिक्षक मतदारसंघात ५७.८९ टक्के

■ मुंबई (दै. संध्या)

राज्यातील विधान परिषदेच्या बहुचर्चित शिक्षक आणि पदवीधर मतदारसंघांच्या निवडणुकीसाठी आज (शुक्रवार, २३ ऑक्टोबर) मतदान पार पडले आहे. पुणे, नागपूर, अमरावती आणि छत्रपती संभाजीनगर (मराठवाडा) या विभागांमधील एकूण ५ मतदारसंघांमध्ये ही निवडणूक होत असून, तब्बल १८२ उमेदवारांचे राजकीय भवितव्य आज मतपेटीत बंद होणार आहे. पुणे शिक्षक मतदार संघाच्या मतदानाच्या टक्केवारीच्या अहवालानुसार, एकूण ३२० मतदान केंद्रांवर ६१,९४० नोंदणीकृत मतदार आहेत, ज्यामध्ये ३७,७६८ पुरुष, २४,१६४ स्त्रिया आणि ८ तृतीयपंथीयांचा समावेश आहे. सकाळी ८ ते दुपारी २ या वेळेत एकूण ३५,७८० मतदान झाले ज्यामध्ये २२,६१३ पुरुष, १३,१६६ स्त्रिया आणि १ तृतीयपंथी मतदाराने मतदान केले, ज्यामुळे या वेळेतील एकूण मतदानाची टक्केवारी ५७.८९ टक्के इतकी नोंदवली गेली आहे. लिंगनिहाय मतदानाची टक्केवारी पाहता, पुरुषांचे ६०.०९ टक्के, स्त्रियांचे ५४.४९ टक्के आणि तृतीयपंथीयांचे १२.५ टक्के मतदान झाले. ही अधिकृत माहिती पुणे विभाग शिक्षक व पदवीधर मतदार संघाचे सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तुषार ठोंबरे यांनी प्रमाणित केली आहे. औरंगाबाद पदवीधर मतदारसंघासाठी धाराशिव जिल्ह्यातील ७६ मतदान केंद्रांवर आज सकाळी ८ वाजता मतदानाला शांततेत सुरुवात झाली. दुपारी २ वाजेपर्यंत जिल्ह्यातील ११ हजार ६३३ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला असून, मतदानाची टक्केवारी ३९.९१ इतकी आहे.



चंद्रपूर जिल्ह्यात पदवीधर मतदारसंघासाठी ५८ मतदान केंद्रांवर मतदान सुरू असून, दुपारी २ वाजेपर्यंत १३ हजार ७१८ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. जिल्ह्यात आतापर्यंत ४२.५२ टक्के मतदानाची नोंद झाली आहे. सकाळी ८ वाजेपासून मतदान प्रक्रियेला सुरुवात झाली असून, सायंकाळी ४ वाजेपर्यंत मतदारांना आपला हक्क बजावता येणार आहे. निवडणूक आयोगाकडून सर्व तयारी पूर्ण करण्यात आली असून, उपविभागीय स्तरावरून मतदान पथके आवश्यक साहित्यासह सज्ज आहेत. मतपत्रिका अवैध ठरू नयेत, यासाठी निवडणूक आयोगाने दिलेल्या सूचनांचे तंतोतंत पालन करण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे. राज्यात एकूण पाच जागांसाठी मतदान होत आहे, ज्यामध्ये पुणे, नागपूर आणि मराठवाडा या तीन पदवीधर, तर पुणे व अमरावती या दोन शिक्षक मतदारसंघांचा समावेश आहे.

क्लिपमधील संभाषण म्हणजे लोकशाहीचा खूनच!

फॉरेन्सिक रिपोर्टच्या नावाखाली महाराष्ट्राला फिरवू नका; 'फ्रेंडशिप फाइल'वरून राज ठाकरेंचे शरसंधान



■ मुंबई (दै. संध्या)

"राज्यात सध्या समाजमाध्यमांवर वेगाने व्हायरल होत असलेली 'फ्रेंडशिप फाइल' ही 29 मिनिटांची ऑडिओ क्लिप म्हणजे दुसरा तिसरा काही नसून थेट लोकशाहीचा खून आणि बलात्कारच आहे! 500 कोटी रुपयांच्या मुद्द्यावर खुलासे यायलाच हवेत, मात्र त्याहून अधिक गंभीर बाब म्हणजे भाजप ज्या पद्धतीने प्रसारमाध्यमांवर जरब दाखवून दडपशाही करत आहे आणि भावनिक मुद्द्यांवरून लक्ष भरकटवण्यासाठी धार्मिक ध्रुवीकरणाचे नवे डाव खेळत आहे, त्यावर महाराष्ट्रात सखोल चर्चा झाली पाहिजे. मुख्यमंत्र्यांनी फॉरेन्सिक तपासणीच्या तांत्रिकतेत महाराष्ट्राला गोल गोल घुमवू नये; स्वतःच्या फायद्यासाठी फॉरेन्सिक वाकवण्यापेक्षा मुख्यमंत्री म्हणून किती निष्पक्ष आहात हे प्रत्यक्ष कारवाई करून दाखवावे," असा घणाघाती आणि थेट प्रहार महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रमुख राज ठाकरे यांनी आपल्या अधिकृत ट्विटद्वारे (X) केला आहे.

माध्यमांवरील दडपशाहीवर चर्चा हवी

"ही क्लिप 29 मिनिटांची असून त्यातील 500 कोटींचा मुद्दा गाजतोय, त्यावर खुलासे येतील आणि यायलाच पाहिजेत. पण भाजप ज्या पद्धतीने समाजमाध्यमे आणि मुख्य प्रवाहातील माध्यमांवर दडपशाही आणत आहे, यावरही चर्चा व्हायलाच हवी."

राज ठाकरे यांनी सोशल मीडियावर एक सविस्तर आणि रोखठोक पोस्ट शेअर करत भाजपच्या सोशल मीडिया सेलची कार्यपद्धती, कथित 500 कोटींचा व्यवहार, सरकारमधील अंतर्गत शह-काटशहाचे राजकारण यावर चौफेर तोफ डागली. आपल्या ट्विटमध्ये ऑडिओ क्लिपमधील संभाषणाची पोलखोल करताना राज ठाकरे यांनी लिहिले, "सध्या महाराष्ट्रात एक 'फ्रेंडशिप फाईल' ऑडिओ क्लिप व्हायरल होत आहे. ती तुम्ही सर्वांनी ऐकली असेल. भाजपचे काही पदाधिकारी, पक्षाच्या सोशल मीडियात महत्त्वाची भूमिका बजावणारे, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे एक ज्येष्ठ पदाधिकारी आणि स्वतःला निष्पक्ष राजकीय विश्लेषक म्हणवणारे पण खरंतर भाजपच्या चिखलफेक सैन्याचं चिलखत घालून फिरणारे काही यूट्यूब इन्फ्लुएन्सर्स यांच्यातील ही चर्चा आहे. यामध्ये कोणी कोणाला 500 कोटी दिले इथपासून ते थेट माध्यमांना कशी जरब दाखवायची, एखादा भावनिक मुद्दा सरकारच्या अंगाशी आला तर लोकांचे लक्ष भरकटवण्यासाठी धार्मिक ध्रुवीकरणाचा नवीन मुद्दा कसा रेटायचा, याचे नियोजन उघडपणे ऐकायला येत आहे."

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या ऑडिओ क्लिपचा फॉरेन्सिक अहवाल मागवल्याच्या विधानाचा समाचार घेताना राज ठाकरे यांनी ट्विटमध्ये नमूद केले. "मुख्यमंत्र्यांनी ऑडिओ क्लिपचा फॉरेन्सिक रिपोर्ट मागवला आहे असे म्हणून वेळ मारून न्यायचा प्रयत्न केला आहे. फॉरेन्सिक अहवाल हा ऑडिओ-व्हिडिओच्या सत्यतेबरोबरच खून, बलात्कार, आर्थिक घोटाळे यांसारख्या गंभीर गुन्ह्यांत पुराव्यांची सत्यता तपासण्यासाठी मागवला जातो. खरंतर यातले संभाषण ऐकले तर समजतेच की हा लोकशाहीचा खून आणि बलात्कारच आहे! जे बोलले गेले आहे ते गंभीर आहे आणि त्याची तपासणी झाली पाहिजे हे मुख्यमंत्र्यांना मान्य आहे हे बरे झाले."

"पुराव्यातील तथ्य तपासाच, पण या संभाषणाबद्दल तुम्ही अनभिज्ञ असाल तर तुमच्या पाठीमागे काय काय सुरू होते हेही तपासा. मुख्यमंत्री म्हणतात की ही क्लिप 2 वर्षांपूर्वीची असावी, मग ती आताच कशी आली आणि बाहेर आणली कोणी? यात नेहमीप्रमाणे सरकारमधले 'शहा काटशहा'चेच राजकारण दिसत आहे. फॉरेन्सिकच्या नावाखाली जनतेला फिरवू नका; निष्पक्ष कारवाई करून दाखवा, अन्यथा तो तुमच्या फायद्यासाठी वाकवलेला फॉरेन्सिक ठरेल."

'भाजपला दोष दिल्यास खपवून घेणार नाही'

रामदास कदमांच्या आरोपांवर प्रवीण दरेकरांचा पलटवार; भाजप-शिंदे गटात वादाची ठिणगी

■ मुंबई (दै. संध्या)

शिवसेना ठाकरे गटाचे ज्येष्ठ नेते रामदास कदम यांनी भाजपच्या नेत्यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा केसाने गळा कापण्याचा प्रयत्न केल्याचा खळबळजनक आरोप केला आहे. पत्रकार परिषद घेत कदम यांनी मनोज जरांगे यांच्या उपोषणावरून व व्हायरल झालेल्या कथित ऑडिओ क्लिपवरून भाजपवर निशाणा साधला आहे. यावर आता भाजप आमदार प्रवीण दरेकर यांनी पत्रकार परिषद घेत सडेतोड प्रत्युत्तर दिले आहे. प्रवीण दरेकर म्हणाले, पडद्याआड राहून जरांगे यांना ताकद देणारे आणखी कोण होते, देवेंद्र फडणवीस यांच्या अंगावर सोडायला, त्यांना बदनाम करायला कोण कोण होते हे सुद्धा समोर येईल. मला असे वाटते की एखाद्या ज्येष्ठ नेत्याने आपल्या नेत्याला खुश करण्यासाठी किंवा आपल्या मुलाचे मंत्रिपद सुरक्षित ठेवण्यासाठी किंवा आणखी प्रमोशन मिळवण्यासाठी असे बोलत असाल तर काही हरकत नाही. पण भारतीय जनता पक्षाला दोष देणार असाल तर ते आम्ही खपवून घेणार नाही. तुम्ही जसे कडक आक्रमक



बोलतात, वागतात तसेच आम्हालाही बोलता येते आणि वागता येते, असा इशारा दरेकर यांनी रामदास कदम यांना दिला आहे.

रामदास कदम यांनी भाजपमधल्या नेत्याने एकनाथ शिंदे यांना संपवण्याचा विडा उचलला आहे, असा दावा केला आहे. यावर बोलताना प्रवीण दरेकर म्हणाले, त्यांनी तसे स्पष्ट सांगावे. तुम्ही आक्रमक बेधडक बोलणारे नेते आहात न, मग सांगावे त्यांनी की आमच्या पक्षाच्या नेत्याने विडा उचलला आहे. त्या ठिकाणी आपण सांगता की मराठा समाजाच्या नेत्याला संपवण्याचे षड्यंत्र भाजपला हाताशी धरून करत आहात. आम्ही बोलायचे का? देवेंद्रजींना संपवण्यासाठी जरांगेंना कोण कोण ताकद देत होते ते? त्यामुळे मला असे वाटते की आपण एका घरात राहतो, एका घरात नांदतो तर आपण सभ्यता सुसंस्कृतपणा राखला पाहिजे. पुढे बोलताना प्रवीण दरेकर म्हणाले, देवेंद्र फडणवीस यांच्यावर कटकरस्थान झाले, त्यांच्यावर आरोप झाले, त्याचे स्वागत आहे का? आता त्या ठिकाणी आपल्या नेत्यावर टीका झाल्यावर बोलणे स्वाभाविक आहे, तुम्ही बोला, आम्ही सांगतो की त्याची चौकशी झाली पाहिजे.


राजकारण मराठा समाजाच्या आड होऊ नये

एक लक्षात ठेवा मराठा समाजाला आरक्षण देण्याचे काम देवेंद्र फडणवीस साहेबांनीच केले होते. उद्धवजी ठाकरे साहेबांना ते टिकवता आले नाही. मराठा समाजाला जेवढ्या काही सुविधा देण्यात आल्या आहेत त्या देवेंद्र साहेबांच्या नेतृत्वात देण्यात आल्या आहेत. कधी नव्हे ते अण्णासाहेब आर्थिक विकास मंडळ असेल, सारथीच्या माध्यमातून असेल, हॉस्टेलच्या माध्यमातून असेल, जेवढे काही आहे ते देवेंद्र फडणवीस साहेबांनीच दिले आहे. याच्या संदर्भात मराठा समाजाची कृतज्ञता आहेच, म्हणून आमचे म्हणणे आहे की राजकारण मराठा समाजाच्या आड होऊ नये, असे प्रवीण दरेकर यांनी म्हटले. प्रवीण दरेकर पुढे म्हणाले, आतापर्यंत तुम्हाला जरांगे चांगले वाटत होते. आता जरांगेंना तुम्ही म्हणता हा माणूस सर्वांना फसवतो आहे. जरांगे तुम्ही मराठ्यांना शेंड्या लावतात, खोकल्याचे औषध तुम्ही त्या ठिकाणी सांगता, तुमचे उपोषण नेमके काय? त्यामुळे या ठिकाणी आपण जरांगे यांच्या बाबतीत सुद्धा तुम्ही लगेच भूमिका बदलली, असा पलटवार दरेकर यांनी रामदास कदम यांच्या पत्रकार परिषदेवर केला. पुढे ते म्हणाले, मराठा समाजासाठी जर कोणी प्रामाणिकपणे प्रयत्न करत असेल तर आम्ही त्यांच्यासोबत आहोत आणि उद्याही सोबत राहू, असे आश्वासन दरेकर यांनी दिले.

एकनाथ शिंदेंना संपवण्याचे षड्यंत्र आम्ही नाही, तुम्हीच करताय : मनोज जरांगे

■ मुंबई (दै. संध्या)

"मी वयाचा मान राखून आजवर शांत राहिलो, पण रामदास कदम यांनी पातळी सोडून माझ्या वैयक्तिक गोष्टींवर चिखलफेक करणे तत्काळ थांबवावे. आंतरवालीत आमच्याच आंदोलनात माणसे पेरून, आमच्या पाठीमागून फोटो गोळा करायला रामदास कदम तुम्ही काय फोटोग्राफर होता काय? एकनाथ शिंदेंचा केसाने गळा कापण्याचे काम आम्ही करत नसून, त्यांच्या पाठीशी साडेसाती लावून त्यांना संपवण्याचा कुटील डाव रामदास कदम तुम्हीच खेळत आहात. 500 कोटींचा आरोप करून खासदार डॉ. श्रीकांत शिंदे आणि एकनाथ शिंदे यांचे राजकीय करिअर उद्ध्वस्त करण्याचा जो कट सुरू होता, तो मी क्लिपच्या माध्यमातून बाहेर काढून उलट शिंदेंना सावध केले आहे. त्यामुळे कदमांनी आमच्या डोक्याला डोकं लावू नये आणि स्वतःच्या अज्ञानाचे प्रदर्शन थांबवावे," असा जोरदार प्रतिहल्ला मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी चढवला आहे. शिवसेना नेते रामदास कदम यांनी मुंबईत पत्रकार परिषद घेऊन जरांगेंवर 'शिंदेंना संपवण्याची सुपारी' घेतल्याचा आरोप करत प्रसाद लाडांसोबतचे जेवणाचे फोटो आणि खोकल्याच्या औषधाची बाटली दाखवली होती. त्यावर तातडीने



पत्रकार परिषद घेत मनोज जरांगे पाटील यांनी प्रत्येक आरोपाचा समाचार घेतला. ऑडिओ क्लिपच्या तारखेवरून रामदास कदम यांच्यावर बोट ठेवत जरांगे पाटील म्हणाले, "टीव्हीवर क्लिप वाजण्याच्या 3 तास आधीच रामदास कदमांना ती कधीची आहे, तिची तारीख काय आहे हे आधीच कसे समजले? 32 मिनिटांच्या क्लिपमधील वेळ आणि तारीख कदमांना अगोदरच कशी माहिती झाली, हे फार मोठे गौडबंगाल आहे. यावरून स्पष्ट होते की आमच्यात फूट पाडण्यासाठी आणि शिंदे-फडणवीसांच्या विरोधात अंतर्गत कारस्थाने करण्यासाठी जी टीम काम करत होती, त्या टीमचे सूत्रधार रामदास कदम स्वतःच असावेत."

संपादकीय

लढणाऱ्याच्या पाठीशी कोल्हापूरकर, गोकूळचे सत्तातंर

कोल्हापूरच्या राजकारणात गोकुळ जिल्हा दूध संघ ही केवळ सहकारी संस्था नाही तर जिल्ह्याच्या राजकीय सत्ता समीकरणाचा केंद्रबिंदू आहे, त्यामुळेच गोकुळच्या निवडणुकीत झालेली अटीतटीची लढत, व बारा तास होऊन अधिक चाललेली मतमोजणी, फेर मतमोजणी, व फेरमत मोजणीवरून झालेला तणाव, आणि पेच, आणि अखेर अवघ्या एका जागेच्या फरकाने लागलेला निकाल. याला महाराष्ट्रात विशेष महत्त्व प्राप्त झालेले आहे, आमदार सतेज पाटील तथा बंटी पाटील यांच्या नेतृत्वाखालील राजश्री शाहू शेतकरी समविचारी आघाडीने २५ पैकी १३ जागा जिंकून सत्ता स्थापनेचा मार्ग मोकळा केलेला आहे,तर महायुतीला केवळ १२ जागांवर समाधान मानावे लागलेले आहे, हा निकाल म्हणजे बंटी पाटील यांच्यासाठी राजकीय प्रतिष्ठेची लढाई जिंकण्याबरोबर सहकार क्षेत्रातील आपले निर्विवाद नेतृत्व सिद्ध करण्याची संधी होती, गोकुळच्या निवडणुकीत दोन्ही बाजूंनी प्रतिष्ठा पणाला लावलेली होती, . महायुतीकडे राज्यातील सत्तेचे पाठबळ आणि अनेक दिग्गज नेत्यांची, मंत्र्यांची, आमदार, खासदाराची, ताकद होती, दुसरीकडे सतेज पाटील यांनी स्थानिक पातळीवरील संघटन शक्ती, आणि समविचारी नेत्याची मोट बांधून प्रखर आव्हान उभे केले होते,अखेरचा कौल त्यांच्या बाजूने गेला, या निकालातून एक गोष्ट स्पष्ट होते राज्याची सत्ता हातात असली तरी स्थानिक सहकारी संस्थांमध्ये विजयाची हमी मिळत नाही, मतदारांशी असलेला संपर्क, स्थानिक प्रश्नाची जाण आणि विश्वासाचे राजकारण. यांनाही तितकेच महत्त्व आहे, या विजयाचा खरा थरार मतमोजणी दरम्यान दिसला, सुरुवातीला आकडेवारीत महायुतीचे पारडे जड होते, जसजसी मतमोजणी होत राहीली, आणिआकडेवारीत आघाडीचे चित्र बदलत राहिले, फेर मतमोजणीत काही उमेदवारांचा विजय झाल्याने संपूर्ण समीकरण बदलले, त्यानंतर महायुतीच्या अन्य उमेदवारांनी फेरमतमोजणीसाठी अर्ज केले, दोन्ही बाजूच्या प्रतिनिधींनी आक्षेप. आणि युक्तिवाद केल्यानंतर काही अर्ज फेटाळण्यात आले, अखेर१३ विरुद्ध १२ असा निकाल स्पष्ट झाला,एका जागेने सत्तेचा फैसला करणारी ही निवडणूक सहकार क्षेत्रातील मतमोजणी प्रक्रियेची पारदर्शकता. आणि विश्वासार्हता. ही किती महत्त्वाची आहे, याची जाणीव करून देते, सहा आमदार, तीन मंत्री, दोन खासदार,व राज्याच्या सत्तेचा थेट बूस्टर असतानाही महायुतीला चारी मुंड्या चीतपट करत कोल्हापूरच्या जनतेने पुन्हा एकदा आम्ही शपथा घेणाऱ्यांच्या नाही तर लढणाऱ्याच्या मागे उभे असतो, हे दाखवून दिले आहे. गोकुळला पोटच्या पोराप्रमाणे ज्या आनंदराव पाटील चुवेकरांनी वाढवलं, त्यांचे योगदान तुम्ही मान्य करणार नसाल, तर गोकुळला हलालमध्ये अडकवणार असाल, बॉयकॉट गोकुळ,असे म्हणत गोकूळचा ब्रँड संपवण्याचा प्रयत्न करत असाल, कायम सोबत बसूनही शपथा घेऊन अविश्वास दाखवणारा असाल, तर आम्ही पण कोल्हापूरकर आहोत, कितीही मोठा असला तरी ते तुझ्या घरात,असा संदेश या निवडणुकीच्या निमित्ताने दूध उत्पादकांनी दिलेला आहे. गोकुळच्या निवडणुकीचे पडघम वाजवायच्या अगोदरच ज्या घडामोडी घडल्या त्या पाहता सामान्य माणसाला संताप यावा असे सगळे घडत होते. गोकुळच्या कारभारावर कोणाच्या इशा-यावरुन कोणाला टार्गेट केले जात होते. हे सभासदांच्या लक्षात येत होते. यानंतर गोकुळवर प्रशासक आणण्याचा घाट घातला, नंतर अधिकार बदलण्याचा पोरखेळ झाला, चौदाशे संस्था अपात्र करून व्यवस्थेतून हद्दपार करण्याचा प्रयत्न झाल्याचे दिसताच ठराव धारकांच्या असंतोषाचा भडका उडाला. त्यातच हलाल प्रकरणावरून झालेला गदारोळ, व तो महत्त्वाचा मुद्दा करण्यात सतेज पाटील यशस्वी झाले.सत्तेतील झाडून मंत्री, आमदार, खासदार, यांची फौज समोर असताना, व टिकाव लागेल याची कोणतीही शक्यता नसताना बंटी पाटील यांनी दिलेला लढा, कोल्हापूरच्या अस्मितेला हात घालणारा होता. या निकालामुळे जिल्ह्याच्या राजकारणाची आगामी काळात फेर- मांडणी होणार, व लढणाराच यापुढे जिंकत राहणार, हाच धडा मिळालेला आहे. मतमोजणी दरम्यान एका मतदाराने मतपेटीत टाकलेली चिठ्ठी बोलकी ठरलेली आहे.तुमच्या मुलांना सत्तेत बसविण्यासाठी आमच्या शपथा कशाला घेता?... असा रास्त सवाल त्याने केला आहे.महायुतीच्या नेत्यांना ही खूप मोठी चपराक आहे. आपल्या माणसांवर विश्वास नसेल? तरच शपथ घेतली जाते.जग चंद्रावरून मंगळावर गेले असताना आम्हाला मात्र डोंगरावर शपथ घ्यायला लावून, शपथ मोडल्यास ब्रेन स्ट्रोकची धमकी देणार असाल तर कोल्हापूरची माती असले कदापिही खपवून घेणार नाही, व सहन करणार नाही, हेच ह्या निकालाने दाखवून दिले आहे. गोकुळचे महत्त्व केवळ राजकीय वर्चस्वापुरते मर्यादित नाही, या संस्थेची हजारो दूध उत्पादक, शेतकरी,ग्रामीण अर्थव्यवस्था, दूध संकलन प्रक्रिया, वाहतूक, आणि बाजारपेठ, यांचे हितसंबंध जोडलेले आहेत. त्यामुळेच सत्ताधारी संचालक मंडळासमोर सर्वात मोठे आव्हान असेल ते शेतकऱ्याचा विश्वास सार्थ ठरवण्याचे, दूध उत्पादकांना योग्य दर वेळेवर देणे, गुणवत्तेवर आधारित पारदर्शक व्यवस्था, संस्थेचे आर्थिक शिस्तबद्ध व्यवस्थापन, आणि दूध व्यवसायातील आधुनिकतेला प्रोत्साहन, या मुद्द्यावर नव्या नेतृत्वाची परीक्षा होणार आहे. अवघ्या एका जागेच्या बहुमतामुळे विजय मिळवणाऱ्या आघाडीने विरोधकांना कमी लेखण्याची चूक करू नये.१२ जागांवर मिळालेला महायुतीचा कौल हा देखील महत्त्वाचा आहे. विरोधकांनी विधायक भूमिका बजावावी, आणि सत्ताधाऱ्यांनी त्यांच्याकडे राजकीय शत्रू म्हणून न पाहता संस्थेच्या हितासाठी आवश्यक असलेला लोकशाहीतील प्रतिस्पर्धी म्हणून पहावे, गोकुळच्या निकालाने सतेज पाटील यांचे राजकीय वजन निश्चित वाढले आहे, परंतु या विजयाचे खरे मोजमाप आगामी राजकीय समीकरणात नव्हे, तर दूध उत्पादकाच्या जीवनात झालेल्या सकारात्मक बदलात होईल, सहकार हा राजकीय सत्तेचा जिना नसून शेतकऱ्यांच्या आर्थिक उन्नतीचे साधन आहे, हे नव्या नेतृत्वाने सिद्ध करावे,गोकुळवर कोणाची सत्ता आली,यापेक्षा गोकुळ मुळे दूध उत्पादक किती सक्षम झाले, हा प्रश्न अधिक महत्त्वाचा आहे. सत्तेचा कौल मिळालेला आहे,आता विश्वासाचा कौल मिळवण्याची वेळ आलेली आहे. गोकुळच्या नव्या कारभाऱ्याने राजकारणापेक्षा सहकाराला, आणि सत्ता संघर्षापेक्षा शेतकऱ्यांच्या हिताला प्राधान्य दिले, तरच हा विजय खऱ्या अर्थाने सार्थ ठरेल.

कै. गुलाबराव वरे व कै. लक्ष्मीबाई वरे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ मायेचा हात

वरे कुटुंबाचा स्तुत्य उपक्रम; पुण्यस्मरणातून सामाजिक सेवेचा आदर्श



■ मळद (बारामती) (दै. संध्या)

आपल्या प्रिय व्यक्तींच्या स्मृती जपताना समाजातील गरजू व्यक्तींना मदतीचा हात देणे,हीच खरी श्रद्धांजली ठरते.याच उदात्त विचारातून वरे कुटुंबाच्या वतीने कै.गुलाबराव विठ्ठलराव वरे,कै.लक्ष्मीबाई गुलाबराव वरे तसेच मेहुणे व मुलगी यांच्या स्मरणार्थ "बारामती जेष्ठ नागरिक निवास तांदूळवाडी - बारामती" येथील ज्येष्ठ नागरिकांना जीवनावश्यक वस्तूंचे वाटप करून दसरा सण सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून साजरा करण्यात आला.

या उपक्रमांतर्गत "बारामती जेष्ठ नागरिक निवास तांदूळवाडी - बारामती" येथील ज्येष्ठ नागरिकांना गहू,हॉर्ल्स कंपनीच्या पाण्याच्या बादल्या,चटया आणि पाण्याचे मग त्यांच्या गरजेपुरत्या वस्तु भेट देण्यात आल्या.सणाच्या आनंदासोबतच ज्येष्ठ नागरिकांच्या गरजा लक्षात घेऊन त्यांना मदतीचा आणि मायेचा आधार देण्याचा हा उपक्रम आमच्यासाठी समाधानकारक व प्रेरणादायी ठरला. हा सामाजिक उपक्रम किरण गोडसे (वरे) सोशल फाउंडेशन, मळद-बारामती यांच्या माध्यमातून वरे कुटुंबाच्या एकजुटीने आणि सहकार्याने पार पडला.आपल्या कुटुंबातील दिवंगत व्यक्तींच्या स्मृतींना उजाळा देताना समाजातील ज्येष्ठ नागरिकांची सेवा करण्याचा घेतलेला हा पुढाकार सामाजिक संवेदनशीलतेचे उत्तम उदाहरण ठरला.

वरे कुटुंबाचा एकजुटीने सहभाग
या पुण्यस्मरणाच्या निमित्ताने कुटुंबातील सर्व सदस्यांनी एकत्र येत सामाजिक कार्यात सहभाग नोंदविला.

सुपुत्र व सुना :
- श्री. रामदास गुलाबराव वरे
व सौ. सुमन रामदास वरे
- श्री. बाळासो गुलाबराव वरे
व सौ. लता बाळासो वरे
- श्री. प्रल्हाद गुलाबराव वरे व सौ. संगीता प्रल्हाद वरे
- श्री. हनुमंत गुलाबराव वरे व सौ. शितल हनुमंत वरे

कन्या :
- श्रीमती रत्नप्रभा शरदराव कुतवळ
- श्रीमती कुमुदिनी चंद्रकांत जगदाळे

कुटुंबातील सदस्यांच्या एकत्रित सहभागामुळे या उपक्रमाला विशेष महत्त्व प्राप्त झाले.दिवंगत आई-वडील व इतर प्रियजनांच्या स्मृती जपताना सामाजिक सेवेचा मार्ग स्वीकारणे,ही वरे कुटुंबाची संवेदनशीलता आणि सामाजिक बांधिलकी अधोरेखित करणारी बाब आहे.

सण-उत्सव केवळ आनंद साजरा करण्यापुरते मर्यादित न ठेवता त्यातून गरजू व्यक्तींना मदत करणे, ज्येष्ठ नागरिकांना आधार देणे आणि समाजाप्रती आपले कर्तव्य निभावणे आवश्यक आहे.वरे कुटुंबाने पुण्यस्मरणाचे औचित्य साधून राबविलेला हा उपक्रम त्याच विचाराची प्रचिती देणारा आहे. "दिवंगतांच्या स्मृती जपण्याचा सर्वोत्तम मार्ग म्हणजे त्यांच्या आठवणींतून माणुसकीची सेवा करणे." वरे कुटुंबाच्या या स्तुत्य उपक्रमातून समाजातील इतर कुटुंबांनाही प्रेरणा मिळावी आणि सामाजिक सेवेची ही परंपरा अधिक व्यापक व्हावी,हीच अपेक्षा.बारामती जेष्ठ नागरिक निवास चे व्यवस्थापक श्री. गणेश शेळके यांच्या उपस्थितीत सदर वाटपाचा कार्यक्रम पार पडला. सेवेतून श्रद्धांजली, माणुसकीतून समाधान आणि एकजुटीतून समाजसेवा!

कर्जमुक्तीच्या चौथ्या यादीत चार हजार १६१ शेतकरी पात्र

■ नांदेड (दै. संध्या)

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६ अंतर्गत नांदेड जिल्ह्यातील चार हजार १६१ पात्र शेतकऱ्यांची चौथी यादी गुरुवारी (ता. २२) प्रसिद्ध करण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत जिल्ह्यात आतापर्यंत एकूण २ लाख २ हजार ७३ पात्र शेतकऱ्यांच्या आधार प्रमाणीकरणासाठी याद्या प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेच्या पोर्टलवर नांदेड जिल्ह्यातील बँकांनी एकूण दोन लाख २४ हजार ८४७ थकीत कर्ज खात्यांची माहिती अपलोड केली आहे. संगणकीय प्रक्रियेनंतर यापूर्वी २४ जुलै, ११ सप्टेंबर आणि १२ ऑक्टोबर २०२६ रोजी पात्र शेतकऱ्यांच्या तीन याद्या प्रसिद्ध करण्यात आल्या होत्या. आता चौथी यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे. चौथ्या यादीतील पात्र चार हजार १६१ शेतकऱ्यांची यादी संबंधित बँक शाखा, विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था आणि ग्रामपंचायतींमध्ये प्रसिद्ध करण्यात येणार आहे.

विजयादशमीच्या मुहूर्तावर बारामती तालुका फोटोग्राफर असोसिएशनची अधिकृत स्थापना

■ स्व. अजितदादा पवार यांच्या स्मृतिस्थळी पुष्प अर्पण करून छायाचित्रकारांनी घेतली एकजुटीची शपथ

■ बारामती (दै. संध्या)

विजयादशमीच्या शुभ मुहूर्तावर बारामती तालुका फोटोग्राफर असोसिएशनची आज अधिकृत स्थापना करण्यात आली. संघटनेचे प्रेरणास्थान स्वर्गीय अजितदादा पवार साहेब यांच्या स्मृतिस्थळी जाऊन तालुक्यातील सर्व छायाचित्रकारांनी पुष्प अर्पण करून अभिवादन केले.त्यानंतर संघटनेच्या कार्याला सुरुवात झाली. यावेळी बारामती शहरासह तालुक्यातील खेडोपाड्यांतून आलेले ज्येष्ठ आणि युवा छायाचित्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते. दादांच्या स्मृतिस्थळी उपस्थित सर्व छायाचित्रकार बंधू-भगिनींनी शपथ घेतली.संघटना तालुक्यातील प्रत्येक छायाचित्रकाराच्या हितासाठी काम करेल आणि छायाचित्रकारांना त्यांचे न्याय्य हक्क मिळवून देण्यासाठी सातत्याने प्रयत्न करेल, असा या शपथेचा आशय होता. अजितदादांनी बारामतीच्या विकासासाठी दिलेले योगदान आणि त्यांची कार्यपद्धती आमच्यासाठी प्रेरणादायी आहे. त्यांच्या विचारांवर चालत ही संघटना छायाचित्रकारांसाठी भरीव काम करेल,असा विश्वास पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला. या वेळी उपस्थित संघटनेचे पदाधिकारी: अध्यक्ष : विशाल साळुंखे उपाध्यक्ष : प्रशांत कुचेकर, महेश रोकडे सचिव : संतोष चौधरी खजिनदार : बाळासाहेब कारंडे कार्याध्यक्ष: सागर सूळ सल्लागार : सचिन सावंत, तृणाल गायकवाड पदाधिकारी : गौरव होले, स्वप्नील शिंदे, प्रीतम कुंभार, महेंद्र जगदाळे, अक्षय शेलार ज्येष्ठ छायाचित्रकार शंकर शिंदे,योगेश दुर्गे, अतुल चव्हाण, अजित स्वामी यांच्यासह तालुक्यातील सर्व छायाचित्रकार बांधव उपस्थित होते.

आश्वासनं नको, प्रत्यक्ष काम करा! चोपडज-मुर्टी रस्त्यासाठी पिसाळ आक्रमक

■ अन्यथा तीव्र आंदोलनाचा इशारा



■ वडगाव निंबाळकर (दै. संध्या)

चोपडज पुल ते मुर्टी-मोढवे रस्त्यावरील धोकादायक झाडेझुडपे, अपुऱ्या साईडपट्ट्या आणि अपघातप्रवण ठिकाणांच्या समस्येकडे लक्ष वेधत बहुजन समाज पार्टीचे बारामती विधानसभा अध्यक्ष दयानंद मोतीराम पिसाळ यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाला आठ दिवसांची अंतिम मुदत दिली आहे.यापूर्वी निवेदन देऊनही ठोस कार्यवाही न झाल्याने तीव्र आंदोलनाचा इशारा दिला आहे. बारामती तालुक्यातील चोपडज पुल ते मुर्टी-मोढवे हा रस्ता परिसरातील नागरिक, शेतकरी,विद्यार्थी,कामगार, दुचाकीस्वार,चारचाकी वाहनचालक आणि इतर प्रवाशांसाठी महत्त्वाचा आहे. मात्र,रस्त्याच्या दोन्ही बाजूंना वाढलेली झाडेझुडपे,धोकादायक फांद्या,अपुऱ्या साईडपट्ट्या आणि रस्त्यालगत असलेले अडथळे यामुळे वाहनचालकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे. महत्वाचे वळणांवर आणि रात्रीच्या वेळी समोरून येणाऱ्या वाहनांचा अंदाज घेणे कठीण होत असल्याने अपघाताचा धोका वाढत असल्याची बाब पिसाळ यांनी प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिले आहे.दयानंद पिसाळ यांनी यापूर्वी ४ जून २०२६ रोजी सार्वजनिक बांधकाम विभागाला लेखी निवेदन सादर केले होते.या निवेदनातून रस्त्याची प्रत्यक्ष पाहणी करणे,धोकादायक झाडेझुडपे हटविणे, साईडपट्ट्यांची दुरुस्ती करणे आणि आवश्यक सुरक्षा उपाययोजना करण्याची मागणी करण्यात आली होती.त्यानंतर संबंधित विभागातील अधिकाऱ्यांशी दूरध्वनीवरून संपर्क साधला असता, साईडपट्ट्या भरल्याचे तसेच रस्त्यावरील अडथळे निर्माण करणारी झाडेझुडपे काढण्यात येतील,असे आश्वासन मिळाल्याचे पिसाळ यांनी म्हटले आहे.मात्र, प्रत्यक्ष कामांची स्थिती आणि केलेल्या कार्यवाहीचा सविस्तर अहवाल मिळाला नसल्याने त्यांनी नाराजी व्यक्त केली आहे.या निवेदनाद्वारे संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तातडीने रस्त्याची पाहणी करावी,धोकादायक झाडेझुडपे व फांद्या नियमानुसार हटवाव्यात,साईडपट्ट्यांची तपासणी करून आवश्यक त्या ठिकाणी दर्जेदार दुरुस्ती करावी,अपघातप्रवण ठिकाणी दिशादर्शक फलक,रिफ्लेक्टर आणि इतर सुरक्षा उपाययोजना कराव्यात,अशी मागणी करण्यात आली आहे.निवेदन प्राप्त झाल्यापासून आठ दिवसांच्या आत प्रत्यक्ष पाहणी करून आवश्यक कामे सुरू करावीत आणि रस्त्यावरील सुरक्षिततेसाठी तातडीच्या उपाययोजना पूर्ण कराव्यात,अशी स्पष्ट मागणी करण्यात आली आहे.निर्धारित मुदतीत समाधानकारक कार्यवाही न झाल्यास स्थानिक नागरिक, शेतकरी,युवक आणि वाहन चालकांना सोबत घेऊन सार्वजनिक बांधकाम विभागाच्या बारामती कार्यालयासमोर बेमुदत धरणे आंदोलन व ठिय्या आंदोलन छेडण्यात येईल,असा इशारा दयानंद पिसाळ यांनी दिला आहे. त्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभाग या अंतिम मुदतीची दखल घेऊन कोणती कार्यवाही करतो,याकडे लक्ष लागले आहे.

मतदानाच्या पूर्वसंध्येला बारामती शहर पोलिसांची धडक कारवाई

■ बारामती (दै. संध्या)



महाराष्ट्र विधान परिषदेच्या पुणे विभाग पदवीधर व शिक्षक मतदारसंघाच्या मतदानाच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी बारामती शहर पोलिसांकडून विशेष सतर्कता बाळगण्यात येत आहे.याच अनुषंगाने दिनांक २२ ऑक्टोबर २०२६ रोजी मतदानाच्या पूर्वसंध्येला मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे बारामती शहर पोलीस स्टेशनच्या प्रभारी परिविक्षाधीन पोलीस उपअधीक्षक श्रीमती मनीषा ओमासे यांच्या नेतृत्वाखाली,पोलीस निरीक्षक श्री. श्रीशैल चिवडशेट्टी यांच्या समन्वयातून तपास पथकाने बेकायदेशीर अग्निशस्त्र बाळगणाऱ्या संशयिताविरुद्ध धडक कारवाई करून एक देशी बनावटीचे गावठी पिस्टल,तीन जिवंत काडतुसे व स्विफ्ट कार असा एकूण ₹२,२६,२००/- किमतीचा मुद्देमाल जप्त केला असून,संबंधित आरोपीस अटक करण्यात आली आहे. सदर कारवाई मा.पोलीस अधीक्षक श्री.संदीप सिंह गिल,पुणे ग्रामीण, मा.अपर पोलीस अधीक्षक श्री.गणेश बिरादार,बारामती विभाग व मा.उपविभागीय पोलीस अधिकारी श्री.चैतन्य कदम, बारामती विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

दिनांक २२ ऑक्टोबर २०२६ रोजी सायंकाळी २०.०० वाजण्याच्या सुमारास बारामती शहर पोलीस स्टेशनच्या तपास पथकातील पोलीस शिपाई अक्षय सिताफ यांना गोपनीय बातमीदारामार्फत माहिती मिळाली की,आदित्य शेलार,रा. आमराई,बारामती हा त्याच्या ताब्यातील लाल रंगाच्या मारुती सुझुकी स्विफ्ट कार क्रमांक MH 12 UK 0072 मधून टी.सी. कॉलेज परिसरात बेकायदेशीर अग्निशस्त्र बाळगून फिरत असून,त्याच्याकडून काहीतरी अनुचित प्रकार घडण्याची शक्यता आहे.सदर माहितीचे गांभीर्य लक्षात घेऊन वरिष्ठांना तत्काळ माहिती देण्यात आली.त्यानंतर प्रभारी परिविक्षाधीन पोलीस उपअधीक्षक श्रीमती मनीषा ओमासे यांनी स्वतः पोलीस पथकाचे नेतृत्व करून, आवश्यक खबरदारीसह संशयिताचा शोध घेण्यासाठी रात्री २०.१५ वाजता पथकासह प्रस्थान केले. सदर पथकाने टी.सी.कॉलेज परिसरात गोपनीय माहितीच्या आधारे शोध घेत असताना रात्री २०.३५ वाजण्याच्या सुमारास आठ नंबर ग्राउंडजवळील मोरया पॅलेस इमारतीसमोरील सार्वजनिक रस्त्यावर लाल रंगाची स्विफ्ट कार क्रमांक MH 12 UK 0072 संशयास्पद स्थितीत उभी असल्याचे आढळून आले. वाहनाच्या चालक सीटवर आदित्य शेलार हा बसलेला होता.दोन स्वतंत्र पंचांच्या उपस्थितीत वाहनाची तपासणी केली असता चालकाच्या सीटच्या बाजूस पुढील भागात एक लोखंडी देशी बनावटीचे गावठी पिस्टल व त्याच्या मॅगझीनमध्ये एक जिवंत काडतूस मिळून आले.

पोलीस आयुक्त पुणे शहर यांचे कार्यालय,
साधु वासवानी चौक, जीपीओ शेजारी, पुणे-४११००८
दुरध्वनी क्र.०२०-२६१२०८३२५, फॅक्स क्र.०२०-२६१२८१०५
ई मेल-cp.pune@nic.in

दिवाळी सणानिमित्त फटाका विक्री व साठा करण्यासाठी तात्पुरते परवाना घेणेबाबत जाहीर सूचना-२०२६

पुणे शहर आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रात दिवाळी सणा निमित्त शोभेची दारु व फटाके विक्रीचे परवाने देणेबाबत खालील प्रमाणे कार्यपध्दती अवलंबली जाणार आहे.

१ मुंबई पोलीस अधिनियम १९५१ मधील नियम ३३ अन्वये पुणे महानगरपालिका, कॅन्टोन्मेंट बोर्ड, लष्कर, खडकी, यांचेतर्फे केले जाणाऱ्या लिलावात भाग घेणाऱ्यांनी प्रथम पोलीस आयुक्त कार्यालयातील व्हेरिफिकेशन ब्रँच मधून ना हरकत दाखला घ्यावा व त्याकरिता रु.१/- चा कोर्ट फी स्टॅम्प लावून अर्ज करावा त्याशिवाय लिलावात भाग घेता येणार नाही.

२. लिलावात जागा घेतल्या नंतर शोभेची दारु विक्री करिता स्वतंत्र अर्ज खालील प्रमाणे करण्यात यावा.
अ. लिलावात घेतलेल्या जागेचा तपशिल कागदपत्रांसह दयावा.
ब. अर्जास रु. १/- चा कोर्ट फी स्टॅम्प लावावा.
क. परवाना शुल्क रु.६००/- ही संबंधीत पोलीस उप आयुक्त यांचे कार्यालयात भरण्यात यावी.

३. वरील भागाशिवाय पुणे पोलीस आयुक्तालयाचे हद्दीतील इतर ठिकाणी शोभेची दारु विक्रीचे परवाने देणेसाठी खालील प्रमाणे पध्दत अवलंबण्यात येईल.
अ. परवाने मंजूरीचे काम (१) पोलीस उप आयुक्त परिमंडळ -०१ (फरासखाना इमारत), २. पोलीस उप आयुक्त परिमंडळ -०२ (स्वारगेट पोलीस स्टेशन) इमारत, ३. पोलीस उप आयुक्त परिमंडळ-०३ (एरंडवणा पोलीस चौकीजवळ) ४. पोलीस उप आयुक्त परिमंडळ -०४ (नगर रोड, येरवडा पोलीस स्टेशन जवळ) आणि ५. पोलीस उप आयुक्त परिमंडळ -५ (लष्कर पोलीस स्टेशन) इमारत, ६. पोलीस उप आयुक्त परिमंडळ ६ (वानवडी) ७. पोलीस उप आयुक्त परिमंडळ -०७ (चंदन नगर पोलीस स्टेशन) इमारत या कार्यालयांकडून होणार आहे. संबंधीतांनी अर्ज त्या कार्यालयाकडे सादर करावेत.
ब. अर्जदाराने रु. १/- चा कोर्ट फी स्टॅम्पसह जागेचे तपशिलवार माहितीसह संबंधीत पोलीस उप आयुक्त यांना परवाना मिळण्यासाठी अर्ज करावा, जागा विटाची, सिमेंट काँक्रीट बांधकामाची असावी.
क. अर्जदाराने पोलीस आयुक्त कार्यालयात चारित्र्य पडताळणी करिता व्हेरिफिकेशन ब्रँच येथे अर्ज करुन त्याची पोच (छायांकित प्रत) परवाना मंजूरीसाठी सादर केलेल्या अर्जासोबत जोडावी.
ड. अर्जा सोबत जागेचे लोकेशन, मोजमाप, आजुबाजुचा परिसर व रस्ते दर्शविणारा कच्चा नकाशा, जागा योग्य असले बाबतचा नागरपालिका अथवा ग्रामपंचायतीचा दाखला जोडावा. अग्निशामक अधिकारी यांचेकडील ना हरकत दाखला, महानगर -पालिका, आकाशचिन्ह विभागाकडील ना-हरकत दाखला, जगा मालकीची असल्यास मालकी संबंधी अथवा भाडयाची असल्यास जागा मालकाचे संमतीपत्र या बाबतची कागदपत्रे जोडावीत.
इ. गतवर्षी सध्याचे नियोजित जागी परवाना घेतला असल्यास त्याचा तपशिल व परवान्याची छायांकित प्रत जोडावी.
फ. अर्जासोबत सादर केलेल्या छायांकित प्रती नोटराईज साक्षांकित करुन सादर कराव्यात.

४. अर्ज स्विकारण्याची मुदत दिनांक २५/१०/२०२६ ते ०५/११/२०२६ पर्यंत असून अर्ज सकाळी १० ते सायंकाळी ०५ वाजेपर्यंत संबंधीत परिमंडळ पोलीस उप आयुक्त यांचे कार्यालयात स्विकारले जातील.

५. दिनांक ०५/११/२०२५ नंतर अर्ज स्विकारले जाणार नाहीत अथवा त्याचा विचार केला जाणार नाही.

६. परवाना दिनांक ०६/११/२०२६ ते दिनांक ०५/१२/२०२६ पर्यंत चा कालावधीसाठीच दिला जाईल.

७. मंजूर परवाने संबधीत पोलीस उप आयुक्त यांचे कार्यालयातून सायंकाळी १६.०० वा ते १८.०० वा पर्यंत वाटप केले जातील.

८. परवाना शुल्क रुपये ६००/- ही संबंधित पोलीस उप आयुक्त कार्यालयांकडे रोख स्वरुपात भरण्यात यावी.

९. पर्यावरण (संरक्षण) अधिनियम १९८६, ध्वनीप्रदूषण (नियम आणि नियंत्रण) नियम २००२ तसेच वरील संदर्भात सर्वोच्च्य किंवा इतर न्यायालयाकडून निर्गमित झालेल्या सूचना (विशेषतः दिनांक १८/०७/१९८४ चे सर्वोच्च न्यायालयाचे ध्वनी प्रदूषण बाबतचे निर्देश यांचे पालन करावे.

१०. संयुक्त नियंत्रक, विस्फोटके, मुंबई यांचेकडील पत्र क्रमांक इ-२ (ए) इएक्सपीएल, जीईएन, दिनांक ०२/०९/२००५ व त्यासोबतची अधिसूचना क्रमांक जीएसआर-६८७ (ई), दिनांक २७/०९/१९८४ मधील सूचनांचे पालन करणे बंधनकारक असेल.

११. पेट्रोलियम तथा विस्फोटक सुरक्षा संघटन, नागपूर यांचेकडील परिपत्रक क्र. आर-४ (२) १८३/सी.सी.१९४/२०१५ दिनांक १५/१२/२०१५ अन्वये **परवानाधारकांनी विदेशी मूळ फटाके विक्री करु नये** अशा सूचना दिलेल्या आहेत.

१२. सार्वजनिक सुरक्षिततेच्या दृष्टीकोणातून धोकादायक ठिकाणी परवाने देणेत येणार नाहीत. अर्जासोबत वर नमूद प्रमाणे - आवश्यक माहिती दाखले व इतर कागदपत्रे जोडलेली नसतील अथवा अर्ज अपूर्ण असेल, तसेच मुदती नंतर अर्ज प्राप्त झालेस अर्जाचा कोणत्याही परिस्थितीत विचार केला जाणार नाही.

पुणे
दिनांक : २२/१०/२०२६

सही/-
(अमितेश कुमार)
पोलीस आयुक्त, पुणे शहर.

विमाका/पुणे/जाहि/१६९/२०२६-२७

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे-४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे - ४११००२ येथे प्रसिद्ध केले. संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०-२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

दैनिक संध्या निःपक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक

शनिवार, दि. २४ ऑक्टोबर २०२६

॥ पुणे दर्शन

अखिल मित्र मंडळाचा २१वा नवरात्रोत्सव उत्साहात संपन्न

- १० ते ११ हजार भाविकांनी घेतला महाप्रसादाचा लाभ
- ढोल-ताशांच्या गजरात पर्यावरणपूरक मिरवणूक



■ पुणे (दै. संध्या)

घोरपडी येथील बी. टी. कवडे रोड, बँक ऑफ महाराष्ट्रजवळील अखिल मित्र मंडळ व उत्तर भारतीय समाजाच्या वतीने आयोजित २१ वा सार्वजनिक नवरात्रोत्सव भक्तिमय वातावरणात, उत्साहात आणि शिस्तबद्ध पद्धतीने नुकताच संपन्न झाला. सन २००६ मध्ये स्थापन झालेले आणि २०१२ पासून अधिकृत नोंदणीकृत असलेले हे मंडळ धार्मिक उपक्रमांसोबतच विविध सामाजिक उपक्रमांची परंपरा सातत्याने जपत आहे. घटस्थापनेच्या दिवशी ध्वनीप्रदूषणाला आळा घालण्याच्या उद्देशाने मंडळाने डीजेला पूर्णपणे फाटा देत पारंपरिक ढोल-ताशांच्या गजरात भव्य शोभायात्रा काढली. स्थानिक कलाकार व तरुणांना रोजगाराची संधी मिळावी, या सामाजिक उद्देशाने तब्बल १२० ढोल-ताशा वादकांचा या मिरवणुकीत सहभाग होता. तसेच १४ ऑक्टोबर रोजी बिहारमधील प्रसिद्ध बालकलाकार आर्यन बाबू यांच्या भोजपुरी सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. नवरात्रोत्सवादरम्यान दररोज महाआरती, पूजा तसेच कन्या भोजनाचे आयोजन करण्यात आले. मुख्य दिवशी आयोजित करण्यात आलेल्या भव्य महाप्रसादाचा (भंडारा) १० ते ११ हजार भाविकांनी लाभ घेतला.

भाविकांची मोठी गर्दी लक्षात घेऊन मंडळाच्या वतीने विशेष नियोजन करण्यात आले होते. महिला व नागरिकांची सुरक्षितता तसेच गर्दीचे व्यवस्थापन करण्यासाठी संपूर्ण मंडप परिसरात सीसीटीव्ही यंत्रणा बसविण्यात आली होती. तसेच बँच लावलेले मंडळाचे १५० हून अधिक स्वयंसेवक दिवसरात्र सेवा बजावत होते. नवरात्रोत्सवानिमित्त आयोजित कार्यक्रमात स्थानिक आमदार सुनील कांबळे, नगरसेवक उमेश गायकवाड, नगरसेवक किशोर धायरकर नगरसेविका सुरेखाताई कवडे, हिमालीताई कांबळे तसेच आयकर विभागातील वरिष्ठ अधिकारी यांनी उपस्थित राहून श्री दुर्गामातेचे दर्शन घेतले व महाआरतीत सहभाग घेतला. "उत्तर प्रदेश व बिहारमधून आलो असलो, तरी महाराष्ट्र ही आमची कर्मभूमी आहे. जन्मभूमी आई तर कर्मभूमी मावशीसमान असते. त्यामुळे महाराष्ट्राची प्रतिष्ठा, संस्कृती आणि सामाजिक सलोखा जपणे हेच आमचे कर्तव्य आहे," अशी भावना मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केली. नवरात्रोत्सवासोबतच मंडळाच्या वतीने दरवर्षी छठपूजा, रामनवमी, १५ ऑगस्ट व २६ जानेवारीनिमित्त बाइक रॅली, रक्तदान शिबिर तसेच गरजू रुग्णांना वैद्यकीय मदत अशा विविध लोकोपयोगी उपक्रमांचे आयोजन केले जाते. मुख्य कार्यकारिणी: अखिलेश मिश्रा (संस्थापक), अनिल झा (अध्यक्ष), महेन्द्र चौहान (उपाध्यक्ष), बलवंत सिंह (कार्याध्यक्ष), विनोद सिंह (सचिव), सुशील सिंह (खजिनदार/कोषाध्यक्ष), अभिमन्यू सिंह (सल्लागार), हरिद्वार गुप्ता (उपसंचालक), अशोक चौहान (उपखजिनदार), मोहन यादव (उपसचिव), संतोष सिंह (उपसल्लागार), संतोष प्रसाद (उपकार्याध्यक्ष). कार्यकारिणी सभासद : दिनेश पटेल, मुकेश सिंह, लालबहादूर यादव, एस. एम. तिवारी, सुशील मिश्रा, ब्रह्मदेव चौधरी, मनोज मिश्रा, जय प्रकाश चौधरी, विजय राय, शशिकांत शर्मा, श्रीनिवास शर्मा.

फटाके उडविताना खबरदारी

■ पुणे (दै. संध्या)

दिवाळीचा सण सुरक्षित आणि आनंदात साजरा व्हावा, यासाठी महापालिकेच्या अग्निशामक दलाने फटाके फोडणे आणि त्यांच्या साठवणुकीबाबत नागरिकांसाठी नियमावली प्रसिद्ध केली आहे. सणादरम्यान आगीच्या दुर्घटना टाळण्यासाठी अग्निशामक दलातील सर्व अधिकारी आणि जवानांच्या सुट्या आणि रजा रद्द केल्या असून, संपूर्ण दल सज्ज ठेवण्यात आल्याची माहिती मुख्य अग्निशमन अधिकारी गणेश सोनुने यांनी दिली. दिवाळीच्या काळात बाजारपेठा आणि सार्वजनिक ठिकाणी मोठी गर्दी असते. अशा वेळी फटाके फोडताना निष्काळजीपणामुळे दुर्घटना घडू नयेत म्हणून नागरिकांनी फटाके केवळ मोकळ्या मैदानांमध्येच उडवावेत; गर्दीच्या किंवा अरुंद गल्ल्यांमध्ये, कचऱ्याच्या ढिगाऱ्याजवळ आणि विजेच्या डीपीजवळ फटाके फोडणे पूर्णपणे टाळावे. लहान मुलांनी फटाके फोडताना पालकांनी प्रत्यक्ष देखरेख ठेवणे आवश्यक आहे. तसेच, नायलॉनचे कपडे वापरू नयेत आणि फटाके खिशात ठेवू नयेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

राजकारण निघाले ढवळून

■ पुणे (दै. संध्या)

शिक्षक व पदवीधर मतदारसंघाच्या निवडणूकीदरम्यान बारामतीत वेगळे राजकीय चित्र समोर आले. महायुतीत असलेल्या राष्ट्रवादी कॉंग्रेसमधील एका गटाने वेगळी भूमिका घेत थेट महाविकास आघाडीच्या उमेदवाराचा प्रचार व त्यांच्यासाठी काम केल्याची बाब मतदानाच्या दिवशी समोर आली. बारामतीत महायुतीतील राष्ट्रवादी अजित पवार पक्षाचे प्राबल्य आहे. बहुसंख्य संस्था त्यांच्या वर्चस्वाखाली आहेत. नुकत्याच झालेल्या सोमेश्वर सहकारी साखर कारखान्याच्या निवडणूकीत सुनेत्रा पवार यांच्या पॅनेलच्या विरोधात पुरुषोत्तम जगताप यांना भाजपच्या संजय जगतापांनी उघड मदत केलेली होती. ही निवडणूक ताजी असतानाच आज राष्ट्रवादीतील काही प्रमुखांनी काहीशी वेगळी भूमिका घेत महाविकास आघाडीच्या हर्षदा देशमुख यांच्यासाठी काम केल्याचे चित्र दिसले. दुसरीकडे ज्या भाजपने सोमेश्वरमध्ये राष्ट्रवादीच्या विरोधात काम केले, त्याच भाजपच्या उमेदवारासाठी का प्रचार करायचा असा सवालही काही कार्यकर्त्यांनी उपस्थित केला होता, पण पक्षादेश असल्याचे सांगत बहुसंख्य कार्यकर्त्यांनी तो मान्य करत भाजपच्याच डॉ. स्मिता जाधव यांच्यासाठी काम केले.

महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग एक-पुणे विभागीय पुरवणी, गुरुवार ते बुधवार, ऑक्टोबर ८-१४, २०२६ / आश्विन १६-२२, शके १९४८ १९

जिल्हाधिकारी यांजकडून

जिल्हा पुणे

भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३

अधिसूचना कलम-११

क्रमांक पीएलसी/कावि/४८८/२०२६. ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) (यात यापुढे जिचा निर्देश "उक्त अधिनियम" असा करण्यात आला आहे) यांच्या कलम ३ च्या खंड (ई) च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून काढण्यात आलेली शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग क्रमांक MIS-११/२०१४/CR-७७ (PART-२)/A-२, दिनांक ११ सप्टेंबर २०१५ (यात यापुढे जिचा निर्देश "उक्त अधिसूचना" असा करण्यात आला आहे) याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (झेड अे) मध्ये व्याख्या केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी एखाद्या जिल्ह्यातील १०,००० हेक्टरपेक्षा अधिक नसेल इतक्या क्षेत्राकरिता भूमी संपादन करण्याच्या संबंधात अशा जिल्ह्याचे जिल्हाधिकारी हे उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी समुचित शासन असल्याचे मानण्यात येईल :

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसूचनेनुसार समुचित शासन असलेल्या जिल्हाधिकारी, पुणे यांना या सोबत जोडलेल्या अनुसूची-एकमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेली जमीन (यात यापुढे जिचा निर्देश 'उक्त जमीन" असा करण्यात आला आहे) सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यक आहे अथवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे असे वाटते, ज्याच्या स्वरूपाचे विवरण यासोबत जोडलेल्या अनुसूची-दोनमध्ये दिलेले आहे आणि म्हणून उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम (१) च्या तरतुदीन्वये याद्वारे असे अधिसूचित करण्यात येते की, उक्त जमिनींची उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता भासण्याची शक्यता आहे.

त्याअर्थी आता, असे घोषित करण्यात येत आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम (४) नुसार कोणतीही व्यक्ती ही अधिसूचना सिद्ध झाल्याच्या दिनांकापासून ते उक्त अधिनियमाच्या प्रकरण-चार खालील कार्यवाही पूर्ण होईल त्या कालावधीपर्यंत उक्त जमिनींचा अथवा तिच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही किंवा उक्त जमिनींवर कोणताही भार निर्माण करणार नाही.

परंतु, उक्त जमिनीच्या अथवा तिच्या भागाच्या मालकाने अर्ज केल्यावर, जिल्हाधिकाऱ्यांस विशेष परिस्थितीची कारणे लेखी नमूद करून अशा मालकास उपरोक्त तरतुदींच्या प्रवर्तनातून सूट देता येईल.

परंतु, आणखी असे की, जर कोणत्याही व्यक्तीने या तरतुदींचे बुद्धिपुरस्सर उल्लंघन केल्यामुळे तिला झालेल्या कोणत्याही हानीची किंवा क्षतीची जिल्हाधिकाऱ्यांकडून भरपाई दिली जाणार नाही.

तसेच, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम (५) अनुसार जिल्हाधिकाऱ्यांद्वारे विहित केल्याप्रमाणे भूमी अभिलेखाच्या अद्ययावतीकरणाचे काम हाती घेणार असल्याचे व पूर्ण करणार असल्याचेदेखील घोषित करण्यात येत आहे;

आणि त्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या पोट खंड (ग) अन्यये समुचित शासन असलेले जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमाखाली जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी विशेष भूमी संपादन अधिकारी क्रमांक १४, पुणे यांना पदनिर्देशित करीत आहे.

अनुसूची- एक

संपादित करावयाच्या जमिनींचे वर्णन

जिल्हा पुणे, तालुका मावळ, गाव खंडाळा

अ. क्र.	नगर भूमापन क्रमांक	संपादन क्षेत्र (चौ. मी.)	झाड
१	२	३	४
१.	४	३७.४५	२
२.	९	२००	८
३.	१०	२७४.६५	१
४.	३५३	९३४.५	१२
५.	३५८	४४३	४
६.	३६२	४८७	१
७.	३६३	४९९	५
८.	३६९	५१.३४	२
९.	३७२	३०	१

अनुसूची- दोन

सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण

प्रकल्पाचे नाव :- रेल्वे गेट नं. ३०, रेल्वे उड्डाणपुलाचे बांधकाम.

प्रकल्पाचे संक्षिप्त वर्णन :- लोणावळा नगरपरिषद ही "ब" वर्ग नगरपरिषद असून संपादनाखालील जागा लोणावळा शहराच्या मंजूर दुसरी सुधारित विकास योजनामध्ये सर्वसाधारणपणे दक्षिण दिशेला स्थित आहे. संपादनाखालील जागेचे स्थान हे सर्वसाधारणपणे नगरपालिका चौकापासून १.८ कि.मी. अंतरावर दक्षिण दिशेला लोणावळा नगरपरिषद हद्दीत आहे. संपादनाखालील जागा लोणावळा नगरपरिषद हद्दीतील रेल्वे गेट नं. ३० येथील रेल्वे उड्डाणपुलाच्या बांधकामाकरिता आवश्यक असून रहिवासी विभागात समाविष्ट आहे, तसेच आसपासच्या निवासी परिसरास आवश्यक असणाऱ्या मूलभूत सुविधा, वीज, पाणी इ. उपलब्ध आहेत. लोणावळा नगरपरिषद हद्दीतील रेल्वे गेट नं. ३० येथील रेल्वे उड्डाणपूल प्रकल्पाकरिता उक्त भूसंपादनाचे स्थान महत्त्वाचे आहे.

समाजाला होणारे लाभ :- विकसित होणाऱ्या रेल्वे गेट नं. ३० येथील रेल्वे उड्डाणपूल शहरातील वाहतूक कोंडी कमी करणेकामी रस्ते जोडणीकामी उपयुक्त ठरणार आहे.

अनुसूची- तीन

बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे

मौजे खंडाळा, तालुका मावळ येथील जमीन व बांधकाम बाधित होत असून नियमाप्रमाणे मोबदला अदा करण्याची तरतूद करण्यात येईल.

अनुसूची - चार

(सामाजिक प्रभाव निर्धारण अभ्यास करणाऱ्या अभिकरणाने दिलेला)

सामाजिक प्रभाव निर्धारणाचा सारांश

उक्त अधिनियमाच्या कलम १० (क) आणि राज्य शासनाचे स्थायी आदेश क्रमांक एसआयए-२०२३/प्र.क्र.१०५/अ-२, दिनांक १७ नोव्हेंबर २०२५ द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून विभागीय आयुक्त, पुणे यांनी अधिनियमाच्या प्रकरण-दोनच्या आणि प्रकरण-तीनच्या तरतुदी लागू करण्यापासून सूट दिलेली आहे.

अनुसूची- पाच

नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील

(अ) प्रशासक म्हणून नियुक्त करण्यात आलेल्या अधिकाऱ्यांचे पदनाम :- लागू नाही.

(ब) प्रशासनाच्या कार्यालयाचा पत्ता :- प्रश्न उद्भवत नाही.

(क) ज्या अधिसूचनेद्वारे प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली आहे, त्या अधिसूचनेचा तपशील :- प्रश्न उद्भवत नाही.

टीप.:- उक्त जमिनींच्या आराखड्याचे विशेष भूमी संपादन अधिकारी क्र. १४, पुणे या कार्यालयामध्ये निरीक्षण करता येईल.

पुणे, १ ऑक्टोबर २०२६.

जितेंद्र डूडी (भा.प्र.से.),
जिल्हाधिकारी, पुणे.

जिमाका/पुणे/जाहिरात/२९६/२०२६-२७

पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड यांचे कार्यालय
स्वातंत्र्यवीर सावरकर उद्यानाजवळ,
प्रेमलोक पार्क, चिंचवड, पुणे-४११०१९

जा.क्र.परवाना शाखा/दिवाळी-२०२६/जाहिर सुचना/२०२६/५७०६३३० पिंपरी चिंचवड दि. १९/१०/२०२६

दिवाळी सणानिमित्त तात्पुरत्या स्वरूपाच्या फटाके स्टॉलसाठीचा परवाना घेणेबाबत जाहीर सूचना-२०२६

पिंपरी चिंचवड आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रात दिवाळी सणानिमित्त तात्पुरत्या स्वरूपाच्या फटाके विक्रीचे स्टॉलसाठी परवाने देणेबाबत खालील प्रमाणे कार्यपध्दती अवलंबली जाणार आहे.

१. मुंबई पोलीस अधिनियम १९५१ मधील नियम ३३ अन्वये पिंपरी-चिंचवड, महानगरपालिका, कॅन्टोन्मेंट बोर्ड यांचे तर्फे केले जाणाऱ्या लिलावात भाग घेणाऱ्यांनी प्रथम पोलीस आयुक्त कार्यालयातील चारित्र्य पडताळणी विभागामधून ना-हरकत दाखला घ्यावा व त्याकरिता कोर्ट फी स्टॅम्प लावून अर्ज करावा त्याशिवाय लिलावात भाग घेता येणार नाही.

२. लिलावात जागा घेतल्या नंतर शोभेची दारू विक्री करिता स्वतंत्र अर्ज खालीलप्रमाणे करण्यात यावा.
   अ. लिलावात घेतलेल्या जागेचा तपशिल कागदपत्रांसह दयावा.
   ब. अर्जास रू.१०/- चा कोर्ट फी स्टॅम्प लावावा.
   क. **परवाना शुल्क रू. ६००/-** ही संबंधित पोलीस उप आयुक्त यांचे कार्यालयात **रोख स्वरुपात** भरण्यात यावी.

३. पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे हद्दीतील इतर कोणत्याही ठिकाणी शोभेची दारू विक्रीचे परवाने देणेसाठी खालील प्रमाणे पद्धत अवलंबण्यात येईल.
   अ. अर्जदाराने रू. १०/- चा कोर्ट फी स्टॅम्पसह, जागेचे तपशिलवार माहितीसह संबंधित पोलीस उप आयुक्त यांना परवाना मिळण्यासाठी अर्ज करावा.
   ब. अर्जदाराने पोलीस आयुक्त कार्यालयात चारित्र्य पडताळणी करिता चारित्र्य पडताळणी विभाग येथे अर्ज करुन त्याची पोच (छायांकित प्रत) परवाना मंजूरीसाठी सादर केलेल्या अर्जासोबत जोडावी.
   इ. गतवर्षी सध्याचे नियोजित जागी परवाना घेतला असल्यास त्याचा तपशिल व परवान्याची छायांकित प्रत जोडावी.
   फ. अर्जासोबत सादर केलेल्या छायांकित प्रती नोटराईज/साक्षांकित करुन सादर कराव्यात.
   ड. अर्जासोबत जागेचे लोकेशन, मोजमाप, आजुबाजुचा परिसर व रस्ते दर्शविणारा कच्चा नकाशा, जागा योग्य असलेबाबतचा मनपा/नगरपालिका/ग्रामपंचायतीचा नाहरकत दाखला जोडावा. अग्निशमन विभागाकडील ना-हरकत दाखला, जागा मालकीची असल्यास मालकी संबंधी अथवा भाडेतत्त्वावर असल्यास जागा मालकाचे संमतीपत्र या बाबतची कागदपत्रे जोडावीत.

४. खालील तक्त्यामध्ये नमुद केलेप्रमाणे पोलीस स्टेशन हद्दीतील अर्जदार यांचे फटाके स्टॉल परवाना मिळणेबाबतचा अर्ज संबंधित परिमंडळ पोलीस उप आयुक्त यांचे कार्यालयात **सकाळी १० ते सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत मिळणेबाबत स्विकारले जातील. (अर्ज स्विकारण्याची मुदत दि.०४/११/२०२६ पर्यंत आहे.)**

अ. क्र.	परिमंडळ	पोलीस स्टेशन		अर्ज स्विकारणे व परवाने मंजूरी करणे
१	परि.- १	१. पिंपरी २. चिंचवड ३. निगडी	४. सांगवी ५. संत तुकाराम नगर ६. दापोडी	पोलीस उपायुक्त **परि.-१** कार्यालय, जुना पुणे-मुंबई रोड, रेमंड शोरुम मागे, चिंचवड, पुणे.
२	परि.- २	१. वाकड २. काळेवाडी ३. हिंजवडी	४. बावधन ५. रावेत	पोलीस उपायुक्त **परि.-२** कार्यालय, यशविन इनकोअर, वाकडकर वस्ती, वाकड, पुणे
३	परि.- ३	१. दिघी २. आळंदी ३. भोसरी	४. MIDC भोसरी ५. उत्तर चाकण ६. दक्षिण चाकण	पोलीस उपायुक्त **परि.-३** कार्यालय, स्पाईन रोड, भोसरी एमआयडीसी पो. ठाणे इमारत, पुणे
४	परि.- ४	१. चिखली २. देहुरोड ३. शिरगाव-परंदवाडी	४. तळेगाव दाभाडे ५. MIDC तळेगाव ६. MIDC महाळुंगे उत्तर ७. MIDC महाळुंगे दक्षिण	पोलीस उपायुक्त **परि.-४** कार्यालय, योजना नगर, चाकण रोड, तळेगाव दाभाडे, पुणे

५. **दि.०४/११/२०२६** रोजीनंतर अर्ज स्विकारले जाणार नाहीत अथवा त्याचा विचार केला जाणार नाही.

६. तात्पुरता फटाका परवाना हा जास्तीत जास्त १५ दिवसांकरीता देण्यात येईल व सदरचा परवाना हा **दि. ११/११/२०२६** पर्यंतच वैध राहील.

७. मंजूर परवाने संबंधित परिमंडळीय पोलीस उप आयुक्त यांचे कार्यालयातून वाटप केले जातील.

८. तात्पुरता फटाका परवाना शुल्क रूपये ६००/- ही संबंधित पोलीस उप आयुक्त यांचे कार्यालयाकडे रोख स्वरुपात भरण्यात यावी.

९. पर्यावरण (संरक्षण) अधिनियम १९८६, ध्वनीप्रदूषण (नियमन आणि नियंत्रण) नियम २००२ तसेच वरील संदर्भात सर्वोच्च किंवा इतर न्यायालयाकडून निर्गमित झालेल्या सूचना (विशेषतः दिनांक १८/०७/२००५ चे सर्वोच्च न्यायालयाचे ध्वनी प्रदूषणा बाबतचे निर्देश याचे पालन करावे.)

१०. पेट्रोलियम तथा विस्फोटक सुरक्षा संघटन, नागपूर यांचेकडील परिपत्रक क्र. आर-४ (२) १८३/सी.सी.१९४/२०१५, दि.१५/१२/२०१५ अन्वये परवानाधारक यांनी विदेशी मूळ फटाके विक्री करू नये अशा सूचना दिलेल्या आहेत.

११. सार्वजनिक सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून धोकादायक ठिकाणी परवाने देणेत येणार नाहीत. अर्जासोबत वर नमूद प्रमाणे आवश्यक माहिती दाखले व इतर कागदपत्रे जोडलेली नसतील अथवा अर्ज अपूर्ण असेल, तसेच मुदती नंतर अर्ज प्राप्त झालेस अर्जाचा कोणताही परिस्थितीत विचार केला जाणार नाही.

दिनांक २३/१०/२०१८ रोजी मा. सर्वोच्च न्यायालयाने रिट पिटीशन (सिव्हील) क्रमांक २१३/२०१७ मध्ये निकालपत्र दिलेले असून सदरील निकालाचे परिच्छेद क्रमांक ४२ मध्ये मा. न्यायालयाने सूचना दिलेल्या आहेत. त्यातील मुख्य सूचना थोडक्यात पुढीलप्रमाणे आहेत,

१. कमी प्रदूषण व प्रकाश उत्सर्जन करणारे फटाके (crackers with reduced emission (improved crackers) and green crackers) अशाप्रकारचे फटाके तयार करणे व विक्रीस परवानगी दिली जाईल, याचाच अर्थ या व्यतिरिक्त इतर प्रकारचे फटाके तयार करणे व विक्रीस मनाई आहे.
२. फटाक्यांचे लडी (joined firecrackers, series crackers or laris) व असे फटाके जे मोठया प्रमाणात प्रदूषित हवा, आवाज आणि घन कचरा तयार करतात असे फटाके तयार करणे, विक्री व वापरास बंदी राहील.
३. फटाके विक्री ही फक्त परवानाधारक व्यापारी यांचेकडूनच होईल आणि ते वरीलप्रमाणे अनुज्ञेय फटाक्यांचीच विक्री करतील.
४. कोणतेही ऑनलाईन, ई कॉमर्स वेबसाईट उदा. फ्लिपकार्ट, ॲमेझॉन व इतर असे साईटवरुन फटाक्यांची ऑनलाईन खरेदी विक्री करता येणार नाही.
५. दिवाळी सण आणि इतर सण ज्यावेळी फटाके उडविले जातात त्यावेळी रात्रो ०८.०० वा. ते १०.०० वा. या कालावधीतच फटाके उडविणेची परवानगी देणेत येईल.
६. दिवाळी व इतर सणाचे वेळी मोठे प्रमाणावर फटाके आतिषबाजीचे कार्यक्रम (community fire cracking) करावयाचे असलेस त्यासाठीची सुयोग्य जागा ही कार्यक्रमापूर्वी संबंधीत प्राधिकाऱ्यांची मान्यता घेवून व ठरवूनच परवानगी घ्यावी लागेल.
७. वरीलप्रमाणे सर्व नियमांचे व अटींचे पालन करुन योग्य ठिकाणी व विहीत वेळेमध्येच फटाके उडविले जातील याबाबत संबंधीत विविध शासकीय विभागांनी खातरजमा करावी. वरील नियमांचे उल्लंघन झालेचे आढळलेस, संबंधीतांवर मा. कोर्टाचे आदेशाचा अवमान केलेबाबत त्यांचेविरुध्द कारवाई होईल.

शिक्का

सही/-
(विनय कुमार चौबे)
पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड

विमाका/पुणे/जाहि/१७०/२०२६-२७

थोडक्यात पण महत्वाचे

बजाज फायनान्सतर्फे मुदतठेव दरांमध्ये ४० बेसिस पॉईंटपर्यंत वाढ

मुंबई/पुणे : दैनिक संध्या

भारतातील सर्वात मोठी खाजगी क्षेत्रातील नॉन-बँकिंग वित्तीय कंपनी बजाज फायनान्स लिमिटेडने आज त्यांच्या मुदतठेवींवरील व्याजदरांमध्ये १२ ते ६० महिन्यांच्या सर्व मुदतींसाठी १५ ते ४० बेसिस पॉईंट्सची वाढ केली आहे. सुधारित दर आजपासून लागू झाले असून ते नवीन ठेवी आणि नूतनीकरण या दोन्हीसाठी लागू आहेत. दीर्घ मुदतींवर सर्वात मोठी वाढ करण्यात आली आहे. ३१ ते ६० महिन्यांच्या कालावधीसाठीचे दर नियमित ठेवीदारांसाठी ३५ बेसिस पॉईंट्स आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी ४० बेसिस पॉईंट्सने वाढले आहेत. नवीन ठेवी बुक करणारे नियमित ठेवीदार आता ३१ ते ६० महिन्यांसाठी एकत्रित वार्षिक ७.७५ टक्के पर्यंत व्याज मिळवू शकतात, जे पूर्वी वार्षिक ७.४० टक्के होते. १२ ते १७ महिन्यांच्या मुदतीचे दर वार्षिक ६.६० टक्के वरून वाढून ६.८० टक्के झाले आहेत आणि १८ ते ३० महिन्यांच्या मुदतीचे दर वार्षिक ६.८५ टक्क्यांवरून ७.०० टक्के झाले आहेत. ज्येष्ठ नागरिक आता सर्व मुदतींवर नियमित दरांपेक्षा अतिरिक्त वार्षिक ०.४० टक्के दर मिळवू शकतात, जे पूर्वी ०.३५ टक्के होते. ३१ ते ६० महिन्यांसाठी ज्येष्ठ नागरिकांच्या नवीन ठेवींवर वार्षिक ८.१५ टक्क्यांपर्यंत व्याज मिळेल, जे आधी वार्षिक ७.७५ टक्के होते. १२ ते १७ महिन्यांचे दर आता वार्षिक ७.२० टक्के आणि १८ ते ३० महिन्यांचे दर वार्षिक ७.४० टक्के आहेत.

सायबर सुरक्षा जागरुकता मोहिमेअंतर्गत केले १.८ लाख नागरिकांना शिक्षित

मुंबई : दैनिक संध्या

ग्राहकांमध्ये जागरुकता निर्माण करण्याबरोबरच सायबर गुन्ह्यांपासून त्यांचे रक्षण करण्याच्या त्यांच्या योजनेचा एक भाग तसेच 'सायबर फ्रॉड सुरक्षा' या उपक्रमाअंतर्गत एचडीएफसी बँके तर्फे संपूर्ण भारतात ८,८०० हून अधिक जागरुकता कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळा जुलै – ऑक्टोबर २०२६ दरम्यान आयोजित करण्यात आल्या होत्या व त्यांचा लाभ हा देशभरांतील १.८ लाख नागरिकांनी घेतला. या मोहिमेचा उद्देश हा ग्राहकांना आणि सर्वसामान्य नागरिकांना आधुनिक सायबर गुन्ह्यांच्या बाबत जागरुक करण्यासह सुरक्षित डिजिटल बँकिंगच्या पध्दतीं विषयी माहिती देऊन सुरक्षित डिजिटल पध्दतींची निर्मिती करण्यात योगदान देणे हा आहे.

'पिंक ऑक्टोबर' निमित्ताने मॅनकाइंड फार्माचे आवाहन

■ पुणे (दै. संध्या)


मॅनकाइंड फार्माने स्तन कर्करोग जागरूकता महिन्याचे औचित्य साधत, आपल्या 'पिंक ऑक्टोबर' मोहिमेच्या माध्यमातून स्तन कर्करोगाविषयी जागरूकता, लवकरात लवकर निदान आणि वेळेवर उपचारांच्या महत्त्वावर प्रकाश टाकला आहे. हा उपक्रम कंपनीच्या '#१ मिलियन लाइव्ह्ज' या प्रवासाचाच एक भाग आहे, ज्याचा उद्देश कर्करोगाविषयीची जागरूकता अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचवणे आणि नागरिकांना त्यांच्या आरोग्यासाठी सक्रिय पावले उचलण्यास प्रोत्साहित करणे हा आहे. स्तनांच्या बाबतीत काहीही असामान्य जाणवत असल्यास लवकरात लवकर वैद्यकीय सल्ला घेण्यास महिलांना प्रोत्साहित करण्यासाठी आणि या आजाराविषयीची त्यांची समज वाढवण्यासाठी जागरूकता अत्यंत महत्त्वाची ठरते. स्तनात गाठ येणे किंवा त्वचा जाड होणे, स्तनाचा आकार किंवा स्वरूपात बदल होणे, त्वचेवर बदल दिसणे, स्तनाग्रांमध्ये बदल होणे किंवा त्यातून असामान्य स्त्राव येणे, ही स्तनाच्या कर्करोगाची आजाराची संभाव्य लक्षणे असू शकतात. हे बदल म्हणजे कर्करोगच आहे असे नाही, तरीही त्यांची डॉक्टरांकडून वैद्यकीय तपासणी करून घेणे गरजेचे आहे. व्यक्तीचे वय आणि आजाराचा धोका लक्षात घेऊन केलेल्या क्लिनिकल तपासण्या आणि मॅमोग्राफीमुळे हा आजार सुरुवातीच्या टप्प्यात ओळखण्यास मोठी मदत होते. मॅनकाइंड फार्माचे सीनियर प्रेसिडेंट अतिश मजुमदार यांनी सांगितले, "कर्करोगाविषयीची जागरूकता केवळ आरोग्य केंद्रांपुरती मर्यादित न राहता, ती लोकांच्या जीवनशैलीचा आणि आरोग्याकडे पाहण्याच्या दृष्टिकोनाचा एक अविभाज्य भाग बनली पाहिजे. आमच्या '#१ मिलियन लाइव्ह्ज' उपक्रमाद्वारे, विश्वसनीय आरोग्य माहिती अधिक लोकांपर्यंत सहज पोहोचवणे आणि त्यांना आरोग्याविषयी सक्रिय निर्णय घेण्यास प्रोत्साहित करणे हे आमचे ध्येय आहे. 'पिंक ऑक्टोबर' ही मोहीम स्तन आरोग्याची जागरूकता, लवकरात लवकर निदान आणि वेळेवर वैद्यकीय सल्ल्याला प्राधान्य देऊन आमच्या या वचनबद्धतेला अधिक बळकट करते.

जून २०२६ मध्ये सुरू झालेल्या मॅनकाइंड फार्माच्या '#१ मिलियन लाइव्ह्ज' उपक्रमांतर्गत आतापर्यंत ५०० हून अधिक आरोग्य कर्मचाऱ्यांना प्रशिक्षित करण्यात आले आहे, तर जुलै महिन्यात २८५ डॉक्टरांनी १ दशलक्ष कुटुंबांचे संरक्षण करण्यात मदत करण्याची प्रतिज्ञा घेतली आहे. 'पिंक ऑक्टोबर'च्या माध्यमातून कंपनी प्रिव्हेंटिव्ह ऑन्कोलॉजीवर आपला भर अधिक दृढ करत असून, आजाराचे लवकर निदान आणि वेळेवर काळजी घेण्याबाबत अधिक जागरूकतेला सातत्याने प्रोत्साहन देत आहे.

एअरटेलने यूट्यूबसोबत भागीदारी करत प्रीपेड ग्राहकांसाठी प्रीमियम मनोरंजन आणले

■ नवी दिल्ली (दै. संध्या)

ग्राहकांसाठी, मोबाइल डेटा आता फक्त जोडलेले राहण्यासाठी नाही. ते शो आणि चित्रपट कसे पाहतात, क्रिएटर्सना कसे फॉलो करतात, संगीत कसे ऐकतात आणि नवीन कंटेंट कसा शोधतात याचे ते प्रवेशद्वार बनले आहे. या मोठ्या प्रमाणातील ग्राहक वापर वर्तनाला सामोरे जाण्यासाठी आणि त्याला आपल्या सर्वोत्तम सेवांसोबत पूरक करण्यासाठी, एअरटेलने यूट्यूबसोबत भागीदारी केली आहे जेणेकरून त्यांच्या प्रीपेड ग्राहकांसाठी यूट्यूब प्रीमियम आणले जाईल. या भागीदारीमुळे त्यांना शॉर्ट्ससह जाहिरातमुक्त यूट्यूब अनुभव मिळतो, तसेच बॅकग्राउंड प्ले, ऑफलाइन डाउनलोड्स आणि यूट्यूब म्युझिक प्रीमियम अटी व शर्ती लागू. हे लॉन्च ग्राहक आज त्यांचे फोन कसे वापरतात हे दर्शवते. डेटा हा त्यांना क्रिएटर्सना फॉलो करण्याचा, शो पाहण्याचा, संगीत ऐकण्याचा आणि नवीन कंटेंट शोधण्याचा मार्ग आहे. यूट्यूब प्रीमियम आता प्राइम व्हिडिओ, जिओहॉटस्टार, झी5 प्रीमियम, सोनीलिव्ह आणि 18+ इतर ओटीटी प्लॅटफॉर्म्ससह एअरटेलच्या मनोरंजन लाइनअपमध्ये सामील झाले आहे.



मल्टी-ऑर्गन ट्रान्सप्लांट सेंटर ऑफ एक्सलन्सचे उद्घाटन

■ पुणे (दै. संध्या)



डॉ. डी. वाय. पाटील मेडिकल कॉलेज, हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर, पिंपरी, पुणे येथे 'यशराज प्रसाद पाटील' मल्टी-ऑर्गन ट्रान्सप्लांट सेंटर ऑफ एक्सलन्सचे उद्घाटन करण्यात आले. विशेषीकृत अवयव प्रत्यारोपण सेवांना अधिक सक्षम करण्याच्या आणि महाराष्ट्रासह देशाच्या विविध भागांतील रुग्णांना गुंतागुंतीच्या वैद्यकीय उपचारांची सुविधा अधिक सुलभतेने उपलब्ध करून देण्याच्या संस्थेच्या बांधिलकीतील हा एक महत्त्वपूर्ण टप्पा आहे. डीपीयूने गुंतागुंतीच्या अवयव प्रत्यारोपण क्षेत्रात विकसित केलेल्या अनुभव आणि कौशल्याच्या पायावर हे केंद्र उभारण्यात आले आहे. विशेष प्रशिक्षित बहुविद्याशाखीय वैद्यकीय पथके, प्रगत वैद्यकीय तंत्रज्ञान आणि प्रत्यारोपणाच्या रुग्णांच्या विशेष गरजा पूर्ण करण्यासाठी तयार करण्यात आलेली स्वतंत्र वैद्यकीय उपचार व्यवस्था या केंद्राला पाठबळ देणार आहे. या नव्या केंद्राचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे विशेष एअर-हँडलिंग यंत्रणा आणि संसर्ग नियंत्रणासाठीच्या विशेष उपाययोजनांनी सुसज्ज असलेली स्वतंत्र व विशेष उद्देशाने उभारण्यात आलेली प्रत्यारोपण सुविधा. रुग्णालयांमध्ये संसर्गाचा प्रसार होण्याची शक्यता असते आणि अवयव प्रत्यारोपण झालेल्या रुग्णांसाठी संसर्ग प्रतिबंध अत्यंत महत्त्वाचा असतो, हे लक्षात घेऊन या सुविधेची रचना करण्यात आली आहे.

प्रत्यारोपण शस्त्रक्रिया होणाऱ्या तसेच शस्त्रक्रियेनंतर बरे होत असलेल्या रुग्णांसाठी नियंत्रित आणि सुरक्षित वैद्यकीय वातावरण उपलब्ध करून देणे, हा यामागील मुख्य उद्देश आहे.

नमुना १

खाजगी क्षेत्रातील जमीन खाजगी वाटाघाटीव्दारे थेट खरेदी पध्दतीने ताब्यात घेणेबाबत जाहीर नोटीस

उपजिल्हाधिकारी भूसंपादन क्र. २२
पुणे यांचे कार्यालय,
जिल्हाधिकारी कार्यालय आवार, ए विंग,
पहिला मजला पुणे १
दि. १६/१०/२०२६

क्रमांक : भूसं/खाजगी वाटाघाटी/एसआर/६१/२०२६

ज्याअर्थी सह आयुक्त पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे यांनी मौजे आव्हाळवाडी, तालुका हवेली, जि. पुणे येथील जमीन पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण हद्दीतील ६५ मी. रुंद इनर रिंग रोड प्रकल्पासाठी भूसंपादन गट नं. ६६४ पै व इतर क्षेत्र १०२९९५.६५ चौ. मी चे संपादन सार्वजनिक प्रयोजनासाठी शासन निर्णय क्र. महसूल व वनविभाग क्र. संकीर्ण ०३/२०१५/प्र.क्र.३४/अ-२ दि. १२ मे २०१५ व दि. ३० सप्टेंबर २०१५ मधील तरतुदीस अनुसरुन खाजगी क्षेत्रातील जमीन वाटाघाटीव्दारे थेट खरेदी पध्दतीने सह आयुक्त पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे यांचे नावे घेण्याबाबतचा प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी पुणे यांचेकडे सादर केला आहे.

१. आणि ज्याअर्थी जिल्हाधिकारी, पुणे यांचे आदेश क्र. पीएलसी/सीआर/४१/२०२६ दि. ०९/०९/२०२६ अन्वये उक्त प्रस्तावासंबंधी उक्त शासन निर्णय परिपत्रक दि. १२ मे २०१५ व दि. ३० सप्टेंबर २०१५ आणि तदनुषंगिक शासन निर्णय तसेच शासन परिपत्रक महसूल व वन विभाग क्र. एलक्यूएन/०१/२०१७/प्र.क्र.१२/अ-२/दि. २५ जानेवारी २०१७ प्रमाणे कार्यवाही करण्याबाबत निर्देश दिले आहेत. संपादन मंडळ तथा सह आयुक्त जमीन व मालमत्ता विभाग पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे यांच्याकडील पत्र क्र. ज.व.मा.वि/भूस/कावि/D.२/२०२५-१९७० दि.०१/०९/२०२६ अन्वये गट क्र. ६६४ पै,६६७ पै, ७४४ पै व इतर मधील जमीन संपादनाची कार्यवाही करण्यात यावी असे कळविण्यात आले आहे.

२. त्याअर्थी आता

उक्त शासन निर्णय आणि शासन परिपत्रकातील तरतुदीनुसार मी श्री. विठ्ठल उदमले, उपजिल्हाधिकारी भूसंपादन क्र. २२ पुणे याव्दारे,

(एक) अनुसूची १ मध्ये नमूद जमीन थेट खरेदी पध्दतीने सह आयुक्त पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे यांचे नावे घेणेबाबत जाहीर नोटीस प्रसिध्द करीत आहे.

(दोन) प्रकल्पासाठी जमीन थेट खरेदी पद्धतीने घेताना जिल्हास्तरीय समिती मार्फत भूसंपादन कायदा २०१३ मधील कलम २६ ते ३० च्या व शेडयूल १ च्या तरतुदीनुसार व महाराष्ट्र शासन निर्णय/परिपत्रका नुसार संबंधित जमीनीसाठी मोबदला निश्चित करण्यात येईल.

(तीन) संबधित भूधारकांकडून शासनाच्या प्रचलित धोरणाप्रमाणे खाजगी जमीन वाटाघाटीव्दारे ६५ मी. रुंद इनर रिंगरोड प्रकल्पासाठी सह आयुक्त पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे यांचे नावे खरेदी देण्यास स्वच्छेने तयार असल्याबाबत व जिल्हास्तरीय समितीने निश्चित केलेला मोबदला संपूर्णतः व अंतिमरित्या स्विकारण्यास तयार असल्याबाबतचे संमत्तीपत्रे (विकल्प) मागवित आहे.

३. संबंधित भूधारकांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यानंतर विहित नमुन्यातील संमत्तीपत्र (विकल्प) उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) क्र. २२ पुणे जिल्हाधिकारी कार्यालय आवार, ए विंग पहिला मजला पुणे व सह आयुक्त पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे यांचेकडे दाखल करावीत.

४. संमत्तीपत्राचा (विकल्प) विहित नमुना उपजिल्हाधिकारी भूसंपादन क्र. २२ पुणे, जिल्हाधिकारी कार्यालय आवार ए विंग, पहिला मजला पुणे व सह आयुक्त पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे यांचे अधिकाऱ्यांमार्फत भूधारकांस उपलब्ध करून देण्यात येईल.

५. सदर प्रकल्पासाठी निश्चित करण्यात आलेल्या क्षेत्राच्या आराखड्याची प्रत उपजिल्हाधिकारी भूसंपादन क्र. २२ पुणे, जिल्हाधिकारी कार्यालय ए विग, पहिला मजला पुणे यांच्या कार्यालयामध्ये कार्यालयीन वेळेत भूधारकांना किंवा हितसंबंधित व्यक्तींना तसेच जनतेस निरीक्षणासाठी खुली ठेवण्यात आली आहे.

६. सदर जाहीर नोटीसीतील खालील अनुसूची मध्ये खाजगी वाटाघाटीने थेट खरेदी पद्धतीने भूसंपादन करावयाचे गट नं. व संपादित करावयाचे क्षेत्र नमूद आहे. तसेच सदर जमीन खरेदी घेण्यासंबधी काही हरकत असल्यास नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांमध्ये उपजिल्हाधिकारी भूसंपादन क्र. २२ पुणे, जिल्हाधिकारी कार्यालय आवार ए विंग, पहिला मजला पुणे यांचे कार्यालय येथे पुराव्या सह दाखल कराव्यात. अन्यथा सदर जमीन निर्वेध/निर्जोखीम आहे असे समजून खरेदी करण्याची पुढील कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

अनुसूची - एक
खरेदी दयावयाच्या जमीनीचा तपशील
गावाचे नाव - आव्हाळवाडी तालुका. हवेली जिल्हा पुणे

अ.क्र	गट क्र.	संपादित क्षेत्र (हे. आर चौ.मी)	संपादन क्षेत्राच्या चतुः सिमा			
			पूर्व	पश्चिम	दक्षिण	उत्तर
१	६६४ पै	०.०२३९	६५९	६६७	मांजरी खुर्द शिव	६६४
२	६६७ पै	०.०२०६	६६६	७४३	मांजरी खुर्द शिव	६६७
३	७४४ पै	०.१७६३	७४३	७४५	मांजरी खुर्द शिव	७४४
४	७४५ पै	०.९७६२	७४४	७४५ व ८३३	मांजरी खुर्द शिव	७४५
५	८३० पै	०.०७६७	८३०	८६८ व ८४३	८४३	८६८
६	८३२ पै	०.२८४१	८३२	८४१ व ८४०	८४०	८३२
७	८३३ पै	०.४३६५	७४५	८३५	८३३	८३३
८	८३४ पै	०,०९००	७४५	८३६	मांजरी खुर्द शिव	८३४
९	८३५ पै	०.२१९६	८३३	८३६	८३५	८३५
१०	८३६ पै	०.४४४६	८३५	८४०	८३६	८३६
११	८३७ पै	०.०६९०	८३६	८३८	मांजरी खुर्द शिव	८३७
१२	८३८ पै	०,०६००	८३७	८३८	मांजरी खुर्द शिव	८३८
१३	८४० पै	०.४७१३	८३६	८४०	८३६	८४१, ८३२
१४	८४१ पै	०.४७४२	८३२	८४२	८४० &८४१	८४१
१५	८४२ पै	०.४९५१	८४१	८४३	८४०	८४२
१६	८४३ पै	१.१९५०	८४२	८६८,८४३ ८४६	८४३	८३० व ८६८
१७	८४६ पै	०.००१९	८४३	८४६	८४६	८६८
१८	८६८ पै	०.४७३४	८६८	८६८	८४३	८६९
१९	८६९ पै	०.४९२२	८६९	८६९	८६८	८७०, ८७१
२०	८७२ पै	०.११५३	८७०	८७३	८७२	८७३ व ८८१
२१	८७३ पै	०.१९५१	८७२	८७३	८७२	८८० व ८८१
२२	८७९ पै	०.४४३०	८७९	८७९	८८०	८९५
२३	८८० पै	१.३४५१	८८०	८८०	८७३, ८८१, ८८२	८७९
२४	८८२ पै	०.०४६४	८८२	८८०	८८१	८८०
२५	८९२ पै	०.०२६७	८९२	८७९	८८०	८९५
२६	८९४ पै	०.६८७४	८९४ व ८९५	८९४	८९५	खराडीची शिव
२७	८९५ पै	०.४३५१	८९५	८९५	८७९ व ८९२	८९४
२८	८८१ पै	०.१९३९	८८१ व ८८२	८८०	८७३,८७२ ८७१	८८०
२९	८७१ पूर्ण	०,०१००	८६९	८७२	८७०	८८१
३०	८७० पै	०.११५२	८६९	८७२	८६९	८७२
३१	६५८ पै	०.०२५९०	६५७	६५९	मांजरी खुर्द शिव	६५८
३२	६५९ पै	०.०३०१	६५८	६६४	मांजरी खुर्द शिव	५५९
३३	६६६ पै	०.०४९१	६६४	६६७	मांजरी खुर्द शिव	६६६
३४	६५४ पै	०,०००१	६५३	६५५	मांजरी खुर्द शिव	६५४
३५	६५५ पै	०.०१३३	६५४	६५६	मांजरी खुर्द शिव	६५५
३६	६५६ पै	०.०१५७	६५५	६५७	मांजरी खुर्द शिव	६५६
३७	६५७ पै	०.०२९४	६५६	६६३	मांजरी खुर्द शिव	६५७
३८	७४३ पै	०.०४२३	६६७	७४४	मांजरी खुर्द शिव	७४३

दिनांक : १६/१०/२०२६
ठिकाण : पुणे

सही/-
(विठ्ठल उदमले)
उपजिल्हाधिकारी
भूसंपादन क्रमांक २२ पुणे

जिमाका/पुणे/जाहिरात/२९३/२०२६-२०२७

स्वच्छ दिवाळी, हरित दिवाळी आपल्या वस्तू कचऱ्यात न टाकता आर.आर.आर. केंद्रात द्या

■ पिंपरी (दै. संध्या)

घरातील वापरात नसलेल्या; मात्र सुस्थितीत असलेल्या वस्तूंचा पुनर्वापर व्हावा आणि त्या गरजूंपर्यंत पोहोचाव्यात, या उद्देशाने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने शहरातील आठ क्षेत्रीय कार्यालयांच्या हद्दीत 'आर. आर.आर.' (रिड्यूस, रियुज, रिसायकल) केंद्रे सुरू करण्यात आली आहेत. नागरिकांनी घरातील अडगळ ठरलेल्या वस्तू टाकून न देता या केंद्रांमध्ये जमा कराव्यात, असे आवाहन महापालिकेने केले आहे.

घराची साफसफाई करताना जुनी खेळणी, कपडे, पुस्तके, भांडी, फर्निचर तसेच विविध इलेक्ट्रॉनिक उपकरणे यांसारख्या वस्तू अनेकदा निरुपयोगी समजून फेकून दिल्या जातात. त्यामुळे कचऱ्याचे प्रमाण वाढण्याबरोबरच सार्वजनिक ठिकाणांच्या स्वच्छतेचा प्रश्न निर्माण होतो. या वस्तू सुस्थितीत असल्यास त्यांचा पुनर्वापर करून त्या गरजू व्यक्तींपर्यंत पोहोचविता येऊ शकतात. या विचारातून महापालिकेच्या आरोग्य विभागामार्फत आर.आर.आर. केंद्रांचा उपक्रम राबविण्यात येत आहे.

उप आयुक्त डॉ. प्रदीप ठेंगल म्हणाले की, आर.आर.आर. केंद्रांचा उपक्रम हा स्वच्छता, पर्यावरण संवर्धन आणि सामाजिक बांधिलकी यांचा समन्वय साधणारा महत्त्वपूर्ण उपक्रम आहे. घरातील वापरात नसलेल्या; मात्र सुस्थितीत असलेल्या वस्तू कचऱ्यात न टाकता या केंद्रांमध्ये जमा केल्यास त्यांचा पुनर्वापर होऊन त्या गरजू व्यक्तींच्या उपयोगी येऊ शकतात. यामुळे कचऱ्याचे प्रमाण कमी होण्यास मदत होण्याबरोबरच नैसर्गिक संसाधनांचे संवर्धन आणि पुनर्वापराला प्रोत्साहन मिळेल.

विशेषतः दिवाळीच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी घराची साफसफाई करताना अशा वस्तू फेकून न देता आर.आर.आर. केंद्रांमध्ये जमा कराव्यात. नागरिक आणि गृहसंकुलांनी या उपक्रमात सक्रिय सहभाग नोंदवून महापालिकेला सहकार्य करावे. लोकसहभागातूनच स्वच्छ, सुंदर आणि पर्यावरणपूरक पिंपरी चिंचवड शहर घडविणे शक्य आहे. आर.आर.आर. केंद्रांमध्ये जमा होणाऱ्या वस्तूंचे संकलन करून त्यांचा योग्य पद्धतीने पुनर्वापर केला जातो. त्यामुळे कचऱ्याचे प्रमाण कमी होण्यास मदत होते. तसेच गरजू नागरिकांना उपयोगी वस्तू उपलब्ध होऊन सामाजिक बांधिलकीही जपली जाते. पर्यावरण संवर्धन, कचरा व्यवस्थापन आणि वस्तूंचा पुनर्वापर यांची सांगड घालणाऱ्या या उपक्रमात नागरिकांचा सहभाग महत्त्वाचा आहे. आर.आर.आर. केंद्रांमध्ये पुस्तके, वह्या, शालेय साहित्य, सुस्थितीतील कपडे, चादरी, पडदे, खेळणी, शैक्षणिक साधने, घरगुती साहित्य, भांडी, फर्निचर, इलेक्ट्रॉनिक उपकरणे, चपला आणि पुनर्वापर करता येण्याजोग्या अन्य वस्तू जमा करता येतील.



आपल्या घरातील वस्तू जमा करण्यासाठी साधा संपर्क

नागरिकांनी तसेच गृह निर्माण संस्थांनी घरातील वापरात नसलेल्या, मात्र सुस्थितीत असलेल्या वस्तू कचऱ्यात न टाकता पुनर्वापरासाठी द्याव्यात. अशा वस्तू संकलित करण्यासाठी ७०३०९०१९९३ / ९१६८६८४६७० या क्रमांकावर संपर्क साधावा. घरातील सुस्थितीत असलेल्या वस्तू समाजातील गरजू व्यक्तींच्या उपयोगी आणून पुनर्वापराची साखळी अधिक मजबूत करण्यासाठी नागरिकांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

शहरातील हद्दीत असणारी आर.आर.आर केंद्रे:

■ कापसे उद्यान, मोरवाडी (प्रभाग १०); आकुर्डी भाजी मंडई (प्रभाग १४); संत तुकाराम महाराज उद्यान (प्रभाग १५); श्रीधरनगर उद्यान (प्रभाग १९).

■ एसकेएफ कंपनीशेजारी, थेरगाव (प्रभाग १७); हेगडेवार पूल, दर्शननगरी (प्रभाग १८); धर्मराज चौक, रावेत (प्रभाग १६); ज्योतिबा उद्यान, काळेवाडी (प्रभाग २२).

■ हेगडेवार क्रीडा संकुल, अजमेरा (प्रभाग ९); धावडे वस्ती, भोसरी (प्रभाग ६); संत सावता महाराज उद्यान, मोशी (प्रभाग २); संत ज्ञानेश्वर क्रीडा संकुल, पिंपळे गुरव (प्रभाग ८).

■ लिनियर उद्यान, कोकणे चौक (प्रभाग २८); ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले उद्यान, पिंपळे निलख (प्रभाग २६); तानाजी कलाटे उद्यान, वाकड (प्रभाग २५); प्रभाग कार्यालय क्रमांक २९.

■ मोशी चौक (प्रभाग ३); दिघी जकात नाका (प्रभाग ४); राजमाता जिजाऊ उड्डाणपूल, भोसरी (प्रभाग ५ व ७).

■ वृंदावन, चिखली (प्रभाग १); भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी उद्यान (प्रभाग ११); रूपीनगर पोलीस चौकी (प्रभाग १२); शनि मंदिर, सेक्टर २१ (प्रभाग १३).

■ थेरगाव रुग्णालयाशेजारी, जगताप नगर (प्रभाग २३); मोरू

"

स्वच्छ, सुंदर आणि हरित शहर घडविण्यासाठी प्रत्येक नागरिकाचा सहभाग अत्यंत महत्त्वाचा आहे. घरातील वापरात नसलेल्या; मात्र सुस्थितीत असलेल्या वस्तू कचऱ्यात न टाकता आर.आर.आर. केंद्रात जमा केल्यास त्यांचा पुनर्वापर करून त्या गरजू व्यक्तींच्या उपयोगी आणता येतील. यामुळे कचऱ्याचे प्रमाण कमी होण्यास मदत होईल, पर्यावरणाचे संवर्धन होईल आणि गरजू बांधवांनाही आवश्यक वस्तू उपलब्ध होतील. विशेषतः दिवाळीच्या सणानिमित्त घराची साफसफाई करताना नागरिकांनी जुन्या कपड्यांपासून पुस्तके, खेळणी, भांडी, फर्निचर आणि इतर सुस्थितीतील वस्तू फेकून न देता त्या आर.आर.आर. केंद्रांमध्ये जमा कराव्यात. वस्तूंचा पुनर्वापर करणे ही केवळ स्वच्छतेची बाब नसून, पर्यावरणाप्रती असलेली जाणीव आणि सामाजिक जबाबदारी जपण्याची संधी आहे. नागरिकांनी तसेच गृहसंकुलांनी या उपक्रमात सक्रिय सहभाग नोंदवून महापालिकेला सहकार्य करावे. लोकसहभागातून पुनर्वापराची साखळी अधिक मजबूत करून स्वच्छ, पर्यावरणपूरक आणि शाश्वत पिंपरी चिंचवड शहर घडविण्यासाठी सर्वांनी पुढाकार घ्यावा.

-डॉ.विजय सूर्यवंशी

"

आर.आर.आर. केंद्रांच्या माध्यमातून जुन्या वस्तूंना नव्याने उपयोगात आणण्याची संधी उपलब्ध होत असून, हा उपक्रम पर्यावरण रक्षणासोबतच सामाजिक संवेदनशीलतेलाही चालना देणारा आहे. घरात वापरात नसलेल्या; परंतु चांगल्या स्थितीत असलेल्या वस्तू गरजूंपर्यंत पोहोचवून त्यांच्या जीवनात आनंद निर्माण करता येऊ शकतो. त्याचबरोबर अनावश्यक वस्तू कचऱ्यात जाण्याचे प्रमाण कमी होऊन पुनर्वापराची सवय रुजण्यास मदत होईल. दिवाळीनिमित्त घराची स्वच्छता करताना नागरिकांनी अशा वस्तू टाकून देण्याऐवजी आर.आर.आर. केंद्रांकडे जमा कराव्यात. गृहसंकुले आणि नागरिकांनी या उपक्रमात सहभागी होऊन वस्तूंचा सुयोग्य वापर आणि पर्यावरण संवर्धनासाठी पुढाकार घ्यावा. वस्तूंचा पुनर्वापर, पर्यावरणाचे संरक्षण आणि गरजूंना मदत या त्रिसूत्रीतून स्वच्छ, सुंदर व शाश्वत पिंपरी चिंचवड शहराच्या निर्मितीला हातभार लावूया.

-कुलदीप जंगम, अतिरिक्त आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

थोडक्यात पण महत्वाचे



आमदार शंकर जगताप यांनी पुणे पदवीधर निवडणुकीत बजावला मतदानाचा हक्क!

पिंपरी : दैनिक संध्या

पुणे पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीत चिंचवड विधानसभा मतदारसंघाचे आमदार शंकर जगताप यांनी शुक्रवारी पिंपळे गुरव येथील मतदान केंद्रावर मतदानाचा हक्क बजावला. मतदान हे केवळ कर्तव्य नसून सक्षम नेतृत्व निवडण्याची महत्त्वपूर्ण संधी आहे, अशी भावना त्यांनी यावेळी व्यक्त केली. पिंपळे गुरव माध्यमिक विद्यालयाच्या जुन्या इमारतीतील मतदान केंद्र क्रमांक १०५ येथे आमदार जगताप यांनी शुक्रवारी सकाळी मतदान केले. मतदानाचा हक्क बजावल्यानंतर आमदार शंकर जगताप यांनी लोकशाही प्रक्रियेतील प्रत्येक मताचे महत्त्व अधोरेखित केले. लोकशाही व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी मतदानाची भूमिका महत्त्वाची असून, प्रत्येक मत हे लोकशाहीच्या बळकटीकरणासाठी मोलाचे योगदान ठरते, असे त्यांनी नमूद केले.

ऐश्वर्यम सोसायटीत विजयादशमीनिमित्त शस्त्रपूजन सोहळा उत्साहात

निगडी : दैनिक संध्या

ऐश्वर्यम सोसायटी, निगडी नगर (देहू गट) यांच्या वतीने राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा विजयादशमी उत्सव व शस्त्रपूजनाचा सोहळा ऐश्वर्यम कम्फर्ट,आकुर्डी मागील पालिका मैदान येथे उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. या कार्यक्रमाला महाराष्ट्र विधानसभेचे उपाध्यक्ष आमदार अण्णा बनसोडे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. तसेच नगरसेवक कैलास कुटे, मीनलताई यादव, विशाल काळभोर आणि गणेश लंगोटे यांची विशेष उपस्थिती लाभली. पश्चिम महाराष्ट्र प्रांताचे समरसता गतिविधी सहसंयोजक विलासराव लांडगे यांनी प्रमुख वक्ते म्हणून उपस्थितांना मार्गदर्शन केले. विजयादशमीच्या पावन पर्वानिमित्त शस्त्रपूजन करून राष्ट्रभक्ती, शिस्त, संस्कार, सामाजिक समरसता आणि राष्ट्रसेवेचा संकल्प दृढ करण्याचा संदेश देण्यात आला. कार्यक्रमात अमृतवचन, सुभाषित, सांघिक पद्य, वैयक्तिक पद्य आणि प्रार्थना अशा विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी तुषार कुलकर्णी यांनी मुख्य शिक्षक, धनंजय पुराणिक यांनी कार्यक्रमाची रूपरेषा, निखिल भोसले यांनी प्रास्ताविक परिचय, मंगेश अवसेकर यांनी अमृतवचन, पुरुषोत्तम कुलकर्णी यांनी सुभाषित, तर नाना कुलकर्णी यांनी पद्य सादर .केले, इतर स्वयंसेवकांनीही व्यवस्थापन, सजावट, शस्त्रपूजन, पाहुणचार आणि विविध व्यवस्थांसाठी मोलाचे योगदान दिले. सर्व कार्यकर्त्यांच्या नियोजनबद्ध सहभागातून कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला. अशा उपक्रमांमधून समाजात एकात्मता, संघभावना, संस्कार आणि राष्ट्रहिताची जाणीव अधिक दृढ होण्यास मदत होते. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, निगडी नगर (देहू गट) यांच्या वतीने कार्यक्रमासाठी सहकार्य करणाऱ्या सर्व मान्यवरांचे, स्वयंसेवकांचे आणि कार्यकर्त्यांचे आभार व्यक्त करण्यात आले.

भाजपा युवा मोर्चाचे शहराध्यक्ष दिनेश यादव यांनी बजावला पदवीधर मतदानाचा हक्क

पिंपरी : दैनिक संध्या

भाजपा युवा मोर्चा पिंपरी चिंचवड शहराचे अध्यक्ष दिनेश लालचंद यादव यांनी पदवीधर मतदार म्हणून आपला मतदानाचा हक्क बजावला. यावेळी भाजपा युवा मोर्चाचे पदाधिकारी उपस्थित होते. लोकशाही व्यवस्थेमध्ये मतदानाला अनन्यसाधारण महत्त्व असून, प्रत्येक पात्र मतदाराने मतदान प्रक्रियेत सहभागी होणे आवश्यक आहे. मतदान हा केवळ अधिकार नसून लोकशाही बळकट करण्यासाठी नागरिकांना मिळालेली महत्त्वपूर्ण संधी आहे. याच भावनेतून दिनेश लालचंद यादव यांनी पदवीधर मतदान प्रक्रियेत सहभाग नोंदवला.

दिवाळीच्या खरेदीला सुरुवात; मुलांच्या परीक्षांमुळे बाजारपेठांतील गर्दी कमी

■ पिंपरी (दै. संध्या)

दसरा संपताच आता दिवाळीच्या तयारीला वेग येऊ लागला आहे. दिवाळी अवघ्या काही दिवसांवर आल्याने पिंपरी-चिंचवड शहरातील बाजारपेठांमध्ये फराळाचे साहित्य खरेदी करण्यासाठी नागरिकांची लगबग सुरू झाली आहे. मात्र, शाळांमध्ये सुरू असलेल्या सहामाही परीक्षांमुळे अनेक मुले अभ्यासात व्यस्त असून, दिवाळीच्या खरेदीसाठी बाजारपेठांमध्ये अद्याप अपेक्षित गर्दी झालेली नाही. मुलांच्या परीक्षा संपल्यानंतर खरेदीला अधिक वेग येईल, असा अंदाज व्यापाऱ्यांकडून व्यक्त केला जात आहे.

दिवाळी म्हटले की, घराघरांत फराळाची तयारी, नवीन कपड्यांची खरेदी आणि आकर्षक सजावटीची लगबग सुरू होते. यंदाही शहरातील गृहिणींनी दिवाळीच्या फराळासाठी लागणारे साहित्य खरेदी करण्यास सुरुवात केली आहे. पोहे, रवा, बेसन, मैदा, साखर, गूळ, तेल, तूप,



सुकामेवा यांसह चकली, चिवडा, लाडू, करंजी आणि शंकरपाळे तयार करण्यासाठी आवश्यक असलेल्या वस्तूंच्या खरेदीला प्राधान्य दिले जात आहे.

अनेक कुटुंबांमध्ये दिवाळीचा फराळ घरीच तयार करण्याची परंपरा आजही जपली जाते. त्यामुळे शाळा सुरू असताना आणि मुलांच्या परीक्षांचे वेळापत्रक सांभाळत गृहिणींकडून फराळाच्या तयारीचे नियोजन केले जात आहे. काही पालक सकाळी मुलांना शाळेत सोडल्यानंतर किंवा मुले शाळेत गेल्यावर बाजारपेठेत जाऊन आवश्यक साहित्य खरेदी करत असल्याचे चित्र दिसत आहे.

फेडरल बँक पुणे मॅरेथॉन २०२६; २२ नोव्हेंबरला आयोजन

■ पिंपरी(दै. संध्या)

फिटनेस, आरोग्य आणि सक्रिय जीवनशैलीला प्रोत्साहन देण्यासाठी आयोजित करण्यात येणाऱ्या 'फेडरल बँक पुणे मॅरेथॉन २०२६'चे तिसरे पर्व येत्या रविवार, २२ नोव्हेंबर रोजी पार पडणार आहे. 'रन युअर रीजन' (Run Your Reason) या प्रेरणादायी संकल्पनेसह होणाऱ्या या मॅरेथॉनचे आयोजन पुण्यातील पाषाण येथील पोलीस भरती मैदानावर करण्यात आले आहे. फेडरल बँक आणि स्ट्रायडर्स माइल्स प्रा. लि. यांच्या संयुक्त विद्यमाने ही स्पर्धा आयोजित करण्यात येत आहे.

या मॅरेथॉनमध्ये अनुभवी धावपटूंसह फिटनेसप्रेमी, कॉर्पोरेट संघ, धावण्याचे गट आणि प्रथमच सहभागी होणाऱ्या धावपटूंना आपले कौशल्य आजमावण्याची संधी मिळणार आहे. यंदाच्या स्पर्धेत ६ हजारांहून अधिक धावपटू सहभागी होतील, अशी अपेक्षा आयोजकांनी व्यक्त केली आहे.

मॅरेथॉनमध्ये सहभागी होण्यासाठी



४२.१९५ किलोमीटर पूर्ण मॅरेथॉन, २१.०९७५ किलोमीटर हाफ मॅरेथॉन, १० किलोमीटर धावणे आणि ५ किलोमीटर धावणे असे चार प्रकार ठेवण्यात आले आहेत. विविध शर्यत प्रकारांमध्ये एकूण ११ लाख रुपयांची बक्षिसे दिली जाणार आहेत.

स्पर्धेसाठी ऑनलाइन नोंदणी सुरू झाली असून, पूर्ण मॅरेथॉनसाठी १,१५० रुपये, हाफ मॅरेथॉनसाठी १,००० रुपये, १० किलोमीटर धावण्यासाठी १,८०० रुपये आणि ५ किलोमीटर धावण्यासाठी २,६०० रुपये प्रवेश शुल्क निश्चित करण्यात आले आहे. या शुल्कावर जीएसटी अतिरिक्त लागू असेल.'रन युअर रीजन' ही संकल्पना प्रत्येक धावपटूच्या वैयक्तिक प्रेरणेचा आणि ध्येयाचा सन्मान करणारी आहे. आरोग्य सुधारणे, वैयक्तिक टप्पा गाठणे, स्वतःची क्षमता सिद्ध करणे किंवा एखाद्या सामाजिक कार्याला पाठिंबा देणे, अशा विविध कारणांसाठी धावपटूंना प्रोत्साहित करणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे.

फेडरल बँकेचे मुख्य विपणन अधिकारी एम. व्ही. एस. मूर्ती म्हणाले की, पुणे मॅरेथॉन हे फिटनेस, शिस्त आणि चिकाटी अंगीकारण्यासाठी लोकांना प्रेरणा देणारे व्यासपीठ बनले आहे. यंदाच्या पर्वातून हजारो धावपटूंना एकत्र आणत आरोग्यदायी जीवनशैली आणि सामुदायिक सहभागाला अधिक चालना देण्याचा प्रयत्न आहे.फेडरल बँकेचे वरिष्ठ उपाध्यक्ष आणि विभागीय प्रमुख ऋषी झा यांनीही मागील पर्वांना मिळालेल्या प्रतिसादाबद्दल समाधान व्यक्त केले. यंदाच्या संकल्पनेतून प्रत्येकाने स्वतःसाठी महत्त्वाच्या असलेल्या ध्येयासाठी धावावे.

पिंपरी चिंचवड करंडक' आंतरक्लब खुला गट टी-२० क्रिकेट स्पर्धा

■ पिंपरी(दै. संध्या)

पिंपरी चिंचवड शहर क्रिकेट असोसिएशनच्यावतीने आयोजित 'पिंपरी चिंचवड करंडक' आंतरक्लब खुल्या गटाच्या टी-२० क्रिकेट स्पर्धेत २नाईन स्पोर्ट्स क्लब आणि सह्यांद्री किंग्ज् या संघांनी आपापल्या प्रतिस्पर्धी संघांचा पराभव करून उद्घाटनाचा दिवस गाजवला.

हिंजेवाडी येथील फोर स्टार क्रिकेट मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेत सागर नागमुळे याने फटकावलेल्या ६६ धावांच्या जोरावर २नाईन स्पोर्ट्स क्लबने एचएस पँथर्सचा १०२ धावांनी सहज पराभव केला. पहिल्यांदा फलंदाजी करणाऱ्या २नाईन स्पोर्ट्स क्लबने १८३ धावांचे लक्ष्य उभे केले. सागर नागमुळे याने ६६ धावांची खेळी केली. दुसऱ्या बाजुने शुभम मोहीते याने नाबाद ५३ धावांचे योगदान दिले. याला उत्तर देताना एचएस पँथर्स संघाचा डाव ८१ धावांवर आटोपला. २नाईन स्पोर्ट्सच्या



कमल कुमार याने चार गडी टिपले. के. करण याने तीन गडी तर, हिमांशु यादव याने दोन गडी बाद करून संघाचा विजय सोपा केला.

सुशांत अभंग याने केलेल्या कामगिरीच्या जोरावर सह्यांद्री किंग्ज्ने व्हिडीआर क्रिकेट अॅकॅडमीचा ६९ धावांनी पराभव करून स्पर्धेत विजयी सलामी दिली. पहिल्यांदा खेळताना सह्यांद्री किंग्ज्ने १७९ धावा धावफलकावर लावल्या. यैशले कुच्चल (नाबाद ४४ धावा), सुशांत अभंग (४१ धावा), सुयश देसाई (३१ धावा) आणि सईश शिंदे (२६ धावा) यांनी धावा जमवून संघाचा डाव उभा केला. या लक्ष्याचा पाठलाग करताना व्हिडीआर क्रिकेट अॅकॅडमीचा डाव ११० धावांवर मर्यादित राहीला. प्रसाद पांडे याने नाबाद ५२ धावांची खेळी करून एकहाती लढा दिला.

याआधी स्पर्धेचे उद्घाटन पिंपरी चिंचवड क्रिकेट संघटनेचे अध्यक्ष जगदीश शेट्टी, संघटनेचे सचिव राजू कोतवाल, यांच्या हस्ते करण्यात आले.

पिंपरी-चिंचवडमध्ये दस्त नोंदणीचा खोळंबा

■ पिंपरी(दै. संध्या)

पिंपरी-चिंचवड शहरातील दुय्यम निबंधक कार्यालयांमध्ये गेल्या पंधरा दिवसांपासून दस्त नोंदणीचे काम संथ गतीने सुरू आहे. वारंवार आधार अपडेटमध्ये समस्या येत असल्यामुळे नागरिक, ज्येष्ठ नागरिक, महिला आणि दस्त लेखनिकांना मोठ्या मनस्तापाला सामोरे जावे लागत आहे. शासनाने सर्व व्यवहार ऑनलाईन केले असले तरी यंत्रणा मात्र अद्यापही सक्षम झालेली नसल्याचे यातून स्पष्ट होत आहे.

शासनाने याकडे तातडीने लक्ष द्यावे. सर्व्हरची क्षमता वाढवावी. आधार अपडेटसाठी स्वतंत्र काउंटर सुरू करावा. सर्व्हर डाऊन असताना ऑफलाईन पर्यायी व्यवस्था करावी. तसेच नागरिकांना टोकन पद्धत सुरू करून त्यांना ताटकळत बसावे लागू नये, यासाठी नियोजन करावे, अशी मागणी होत आहे. केवळ डिजिटल इंडियाच्या घोषणा करून चालणार नाही,



तर त्या घोषणा प्रत्यक्षात आणण्यासाठी यंत्रणा सक्षम करणे गरजेचे आहे, हे या निमित्ताने पुन्हा एकदा समोर आले आहे. पिंपरी, चिंचवड आणि भोसरी येथील दुय्यम निबंधक कार्यालयात रोज शेकडो दस्त नोंदणीसाठी येतात.

फ्लॅट खरेदी, जमीन खरेदी, भाडेकरार, बक्षीसपत्र, वाटणीपत्र असे विविध दस्त येथे नोंदवले जातात. मात्र, सकाळी १० वाजता कार्यालय सुरू झाले तरी दुपारी १२ ते १ वाजेपर्यंत कधी सर्व्हर डाऊनमुळे तर कधी आधार प्रमाणीकरण अर्थात आधार व्हेरिफिकेशन होत नाही. आधार कार्डवरील नाव, पत्ता आणि बोटांचे ठसे न जुळल्यास दस्त नोंदणी होत नसल्याचे चित्र आहे.

भ्रष्टाचार लपविण्यासाठी गरळ ओकण्याचे काम करू नका..!

■ पिंपरी(दै. संध्या)

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील तुमच्या नेत्यांचा भ्रष्टाचार बाहेर काढला, म्हणून शिवसेना उपनेत्या तथा विद्यमान नगरसेविका सुलभा उबाळे यांच्यावर गरळ ओकण्याचे काम सत्ताधारी भाजपमधील काही जण करत आहेत. सत्तेतील आमदारांकडून काही पदरात पाडून घेण्यासाठी अशा प्रकारे बिनबुडाचे आरोप करत असाल, तर आम्ही देखील हाडाचे शिवसैनिक असून शिवसेना स्टाईने उत्तर मिळेल, असा इशारा शिवसेना विभागप्रमुख महेश डोके यांनी शिवसेना नगरसेविका सुलभा उबाळे यांच्यावर आरोप करणाऱ्या मंडळींना दिला आहे

या संदर्भात शिवसेना विभागप्रमुख महेश डोके यांनी प्रसिध्दीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, एका भाजपच्या स्थानिक पदाधिकाऱ्याने आमच्या शिवसेनेच्या उपनेत्या सुलभा उबाळे यांच्यावर टीका केली. ही टीका त्यांनी भाजपचा व त्यांच्या आमदारांचा भ्रष्टाचार बाहेर काढला म्हणून केली आहे. मोशी कचरा डेपोमध्ये नऊ कामगारांचा बळी गेला. त्यांचे कुटुंब उध्वस्त झाले. त्या प्रकल्पात



झालेला भ्रष्टाचार आणि चुकीच्या कारभाराविरोधात सुलभा उबाळे यांनी आवाज उठवला. त्यांनी लोकप्रतिनिधी व सामाजिक उत्तरदायितत्वाचे कर्तव्य म्हणून ते केले. ते यापुढेही त्या करत राहतील. परंतु तुमचा भ्रष्टाचार उघडकीस आणला म्हणून त्यांना टार्गेट करण्याचे काम सत्ताधारी आणि स्थानिक नेत्यांच्या बगलबच्चे करीत आहेत. जे कोणी हे करीत आहेत. त्यांनी स्वतःचे राजकीय हित साधण्यासाठी आणि स्वतःचे अपयश लपवण्यासाठी दुसऱ्यांवर बिनबुडाचे आरोप करणे थांबवावे. आपली राजकीय पातळी सांभाळून उत्तर द्या. महानगरपालिकेचा कारभार असो वा आमदारांचे काम, सत्ता तुमच्या हातात आहे, हे लक्षात ठेवा. आरोपांचे राजकारण करण्यापेक्षा जनतेच्या पैशांचा हिशोब द्या. महानगरपालिकेत सुरु असलेला भ्रष्ट कारभार थांबविण्यासाटी काहीतरी करा. नगरसेवक कुणाचे, सत्ताधारी कोण, भ्रष्टाचार करून महापालिका कर्जबाजारी केली कुणी, वेस्ट एनर्जी मध्ये भागीदार कोण, याची उत्तरे शहराला द्या. ते करता आमच्या नेत्यांची नावे घेऊन कोणी मोठं होण्याचा प्रयत्न करू नये. आपण बोलत असताना किंवा टीका करताना ती कोणावर करतो, याचे भान ठेवावे. ताई चार वेळा नगरसेविका, दोन वेळा विधानसभा निवडणुकीला सामोरे गेल्या. शिवसेना पक्षाच्या उपनेत्या म्हणून त्यांच्यावर जबाबदारी आहे. त्या महानगरपालिकेतील तुमच्या नेत्यांचा भ्रष्टाचार बाहेर काढतात, म्हणून त्यांच्यावर गरळ ओकण्याचे काम करू नका. हे थांबविले नाही, तर आम्हीही शिवसेना स्टाईलने उत्तर देणार, असे महेश डोके यांनी या प्रसिध्दीपत्रात म्हटले आहे.

थोडक्यात पण महत्वाचे



४५ गावांवर पाणीटंचाईचे संकट; डिंभे उजव्या कालव्याला पाणी सोडण्याची मागणी

मंचर : दैनिक संध्या

आंबेगाव आणि शिरूर तालुक्यांतील ४५ गावांमध्ये पाणीटंचाईची तीव्रता वाढू लागल्याने हुतात्मा बाबू गेनू सागर (डिंभे) उजव्या कालव्याला तातडीने पाणी सोडण्याची मागणी शेतकरी आणि ग्रामस्थांनी केली आहे. पावसाअभावी शेतीला पाणी मिळणे कठीण झाले असून, उभी पिके करपू लागली आहेत. काही गावांमध्ये पिण्याच्या पाण्याची टंचाईही जाणवू लागल्याने ग्रामीण भागातील परिस्थिती चिंताजनक बनली आहे. या परिसरातील शेती मोठ्या प्रमाणावर कालव्याच्या पाण्यावर अवलंबून आहे. मात्र, पाण्याअभावी पिके जगविण्यासाठी शेतकऱ्यांची धावपळ सुरू आहे. विहिरी, कूपनलिका आणि पाझर तलावांमधील पाणीसाठा कमी होत असल्याने सिंचनाचा प्रश्न गंभीर बनला आहे. वेळेत पाणी उपलब्ध न झाल्यास पिकांचे मोठे नुकसान होण्याची भीती शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे. शेतीबरोबरच जनावरांच्या पिण्याच्या पाण्याची आणि चाऱ्याची उपलब्धता करणेही कठीण होत आहे. डिंभे उजव्या कालव्याला पाणी सोडल्यास परिसरातील शेतीला दिलासा मिळण्याबरोबरच काही गावांतील पिण्याच्या पाण्याचा प्रश्नही मार्गी लागू शकतो. त्यामुळे संबंधित विभागाने तातडीने निर्णय घेऊन कालव्याचे आवर्तन सुरू करावे, अशी मागणी शेतकरी आणि ग्रामस्थांनी केली आहे. या प्रश्नाकडे लोकप्रतिनिधींचे लक्ष वेधण्यासाठी शेतकऱ्यांचे शिष्टमंडळ लवकरच माजी गृहमंत्री दिलीप वळसे पाटील यांची भेट घेणार असल्याची माहिती पंचायत समिती सदस्य नीलेश टेमकर यांनी दिली. पाणीटंचाईची तीव्रता लक्षात घेऊन संबंधित यंत्रणेने तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. डिंभे उजव्या कालव्यावर अवलंबून असलेल्या ४५ गावांमध्ये पाणीटंचाई गंभीर होत आहे. पिके करपू लागली असून, पिण्याचे पाणी आणि जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. कालव्याला तातडीने पाणी सोडण्यासाठी शिष्टमंडळ दिलीप वळसे पाटील यांची भेट घेणार असल्याचे पंचायत समिती सदस्य नीलेश टेमकर यांनी सांगितले.

बारामतीतील उद्योजकावरील गोळीबारप्रकरणात मोठा खुलासा

बारामती: दैनिक संध्या

बारामतीतील राणा शिपिंग कंपनीचे व उद्योजक राणा दिलीप सूर्यवंशी यांच्यावर शस्त्राने हल्ला करून त्यांना जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी बारामती तालुका पोलिसांनी दोघांना अटक केली आहे. पार्थ वासुदेव अवथळे (वय १९ रा. पिंपरी गवरी, ता. खामगाव, जि. बुलढाणा. सध्या रा. कर्वेनगर, दत्त मंदिर, कालवा रोड, स्पेन्सर चौक, पुणे) आणि ज्ञानदेव महादेव शिंदे (वय ५० रा. वीट, ता. करमाळा, जि. सोलापूर, सध्या रा. थोरात नगर, भिगवण, ता. इंदापूर) अशी अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत. न्यायालयाने दोघांनाही दि. २३ ऑक्टोबरपर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे. या प्रकरणात एका विधी संघर्ष बालकाचा सहभाग पोलिसांना आढळून आला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, १८ ऑक्टोबर रोजी रात्री सव्वासताच्या सुमारास पायलट ढाब्याजवळ, पालखी महामार्गजवळ राणा सूर्यवंशी यांच्यावर दोघांनी शस्त्राने हल्ला केला होता. या हल्ल्यात त्यांना जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याची फिर्याद लक्ष्मीकांत महादेव सूर्यवंशी यांनी दिली होती. त्यानुसार, बारामती तालुका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. विधी संघर्षीत बालक व पार्थ अवथळे या दोघांना ज्ञानदेव शिंदे याने हा गुन्हा करण्यासाठी दोन लाख रुपये दिले होते असे तपासात निष्पन्न झाले आहे; परंतु राणा सूर्यवंशी यांच्यावर हल्ला कोणत्या कारणासाठी केला हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. या दोन आरोपींना पुणे शहर पोलिसांनी अटक केली.

कुकडी, डिंभे, चासकमानमधून आवर्तन सोडण्याची वळसे पाटलांची मागणी

मंचर: दैनिक संध्या

"पावसाने दीर्घकाळ ओढ दिल्याने पुणे आणि अहिल्यानगर जिल्ह्यांसह राज्यातील अनेक भागांत पाणीटंचाईचे गंभीर संकट निर्माण झाले आहे. पाण्याअभावी शेतातील उभी पिके करपू लागली असून ग्रामीण भागात पिण्याच्या पाण्याचाही प्रश्न ऐरणीवर आला आहे. या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांची पिके वाचविण्यासाठी तसेच पिण्याच्या पाण्याची गरज भागविण्यासाठी कुकडी, हुतात्मा बाबू गेनू(डिंभे धरण) व चासकमान धरणांतून तातडीने पाण्याचे आवर्तन सोडावे, "अशी मागणी माजी विधानसभा अध्यक्ष व आमदार दिलीप वळसे पाटील यांनी केली आहे. यासंदर्भात वळसे पाटील यांनी राज्याचे जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांना पत्र देऊन पाणीटंचाईच्या गंभीर परिस्थितीकडे लक्ष वेधले. तसेच त्यांच्याशी प्रत्यक्ष चर्चा करून शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी तातडीने पाणी सोडण्याची आवश्यकता स्पष्ट केली. जुलै २०२६ नंतर पावसाने अचानक पाठ फिरविल्याने खरीप हंगामातील पिकांना मोठा फटका बसला आहे. पावसाच्या प्रतीक्षेत असलेली पिके आता पाण्याअभावी सुकू लागली आहेत. अनेक गावांमध्ये शेतीच्या पाण्याबरोबरच पिण्याच्या पाण्याची समस्याही गंभीर होत आहे. त्यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडण्याची भीती निर्माण झाली आहे. शेती आणि शेतकरी हा ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा आहे. पाण्याअभावी शेतकऱ्यांचे नुकसान होऊ नये, यासाठी जलसंपदा विभागाने परिस्थितीचे गांभीर्य ओळखून निर्णय घेणे आवश्यक आहे. कुकडी, डिंभे आणि चासकमान प्रकल्पांतून उपलब्ध पाण्याचे योग्य नियोजन करून तातडीने आवर्तन सोडल्यास शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळू शकतो, असे वळसे पाटील यांनी निदर्शनास आणून दिले.

पुणे जिल्ह्यात २.६१ लाख हेक्टरवरील पीकनुकसान पंचनामे पूर्ण

पुणे : दैनिक संध्या

जिल्ह्यात दुष्काळ जाहीर झालेल्या तालुक्यांत पंचनामे सुरू असून, आठ तालुक्यांमध्ये पीकनुकसान पंचनाम्यांचे ८५ टक्के काम पूर्ण झाले आहे. या तालुक्यांतील तीन लाख आठ हजार ९५४ हेक्टर क्षेत्रापैकी दोन लाख ६१ हजार ३१४ हेक्टरवरील पंचनामे पूर्ण झाले आहेत. दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील दहा तालुक्यांत विविध उपाययोजना व सवलती लागू करण्यात आल्या आहेत. यामध्ये भोर, वेल्हा, खेड, शिरूर, बारामती, इंदापूर, दौंड आणि पुरंदर, आंबेगाव आणि जुन्नर या दहा तालुक्यांचा समावेश आहे. पहिल्या टप्प्यातील आठ तालुक्यांतील चार लाख ८६ हजार १८९ खातेदारांच्या क्षेत्राचे पंचनामे पूर्ण झाले आहेत. तालुकानिहाय पूर्ण झालेल्या पंचनाम्यांमध्ये बारामतीमध्ये ५२ हजार १३० हेक्टर, इंदापूरमध्ये ४८ हजार ९८९ हेक्टर, दौंडमध्ये ३९ हजार ९९७ हेक्टर, खेडमध्ये ३९ हजार १२९ हेक्टर, पुरंदरमध्ये ३३ हजार २११ हेक्टर, शिरूरमध्ये ३० हजार ११० हेक्टर, भोरमध्ये १२ हजार ९२६ हेक्टर आणि वेल्ह्यात चार हजार ८२२ हेक्टर क्षेत्राचा समावेश आहे. दुसऱ्या टप्प्यात दुष्काळ जाहीर झालेल्या आंबेगाव तालुक्यात पाच हजार २१७ खातेदारांच्या एक हजार १०७ हेक्टर क्षेत्राचे, तर जुन्नर तालुक्यात १२ हजार ९७ खातेदारांच्या आठ हजार १३५ हेक्टर क्षेत्राचे पंचनामे पूर्ण झाले आहेत.



सुरक्षित बालपण अभियानांतर्गत कायदेविषयक शिबिर उत्साहात संपन्न

■ नारायणगाव (दै. संध्या)

महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई येथील मुख्य मध्यस्थी केंद्राच्या निर्देशानुसार, सुरक्षित बालपण अभियानांतर्गत विधीविषयक जनजागृती शिबिराचे आयोजन तालुका विधी सेवा समिती, खेड, खेड वकील संघटना, आणि सरसेनापती हंबीरराव मोहिते लॉ कॉलेज, राजगुरुनगर यांच्या संयुक्त विद्यमाने (दि.२२) जिल्हा परिषद शाळा, थिगळस्थळ, खेड येथे खेडचे सह दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर,एम. टी. खराडे यांच्या अध्यक्षतेखाली व खेड वकील संघटनेचे अध्यक्ष ॲड.अतुल गोरडे, प्रा. किरण काळे यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. यावेळी जि.प. शाळेच्या मुख्याध्यापिका सुनीता गवाडे, तालुका विधी सेवा समिती, खेडच्या प्रियंका कदम, महाविद्यालयाच्या मोफत विधी सहाय्य विभागाचे समन्वयक प्रा. संदीप तायडे, प्रा. ज्योती सांडभोर, शिक्षक महादू रोडे, संजय गुमटकर, दीपाली मांजरे, रोहणी जाधव, वकील संघटनेचे पदाधिकारी व सदस्य तसेच सरसेनापती हंबीरराव मोहिते विधी महाविद्यालयाचे विद्यार्थी - विद्यार्थिनी उपस्थित होते.

यावेळी विद्यार्थिनी प्रिया येलमाटे - बालसुरक्षा, ॲड. स्मिता सांडभोर- बालकांचे अधिकार, वैयक्तिक व ऑनलाइन सुरक्षितता, तर ॲड. संदीप घुले यांनी POCSO कायदा व NALSA जागृती योजनेविषयी मार्गदर्शन करून कायदेविषयक माहिती देऊनवैयक्तिक सुरक्षितता, ऑनलाइन सुरक्षितता तसेच तक्रार व अहवाल नोंदविण्याची यंत्रणा याविषयी बालकांमध्ये व समाजामध्ये कायद्याबाबत जागरूकता निर्माण करण्यावर भर देण्यात आला.

सदर उपक्रम हुतात्मा राजगुरु शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष तथा मा.आमदार दिलीपराव मोहिते पाटील, संस्थेचे सचिव - प्राचार्य डॉ. शिवाजीराव मोहिते, खजिनदार सौ. सुरेखाताई डी. मोहिते पाटील तसेच विधी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. किरण शिंदे यांच्या प्रेरणादायी मार्गदर्शनाखाली यशस्वीरीत्या पार पडला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रिया येलमाटे यांनी केले. प्रास्ताविक ॲड.अतुल गोरडे यांनी तर आभार उर्मिला डाखोरे यांनी मानले.

चाकण शहरात स्वच्छतेचा प्रश्न ऐरणीवर

रस्त्यालगत कचरा टाकणाऱ्यांवर कारवाईची मागणी

■ चाकण (दै. संध्या)

औद्योगिक नगरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या चाकण शहरात स्वच्छतेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. नगरपरिषद हद्दीतील विविध भागांमध्ये रस्त्याच्या कडेला, मोकळ्या जागेत तसेच उघड्यावर कचरा टाकण्याचे प्रकार घडत असल्याने परिसराच्या स्वच्छतेचा आणि नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण होत आहे.

या प्रकारांची गंभीर दखल घेत चाकण नगरपरिषदेने उघड्यावर कचरा टाकणाऱ्यांविरोधात कठोर भूमिका घेण्याची गरज आहे. शहर स्वच्छ ठेवण्यासाठी प्रशासनाकडून प्रयत्न सुरू असताना नागरिकांनीही आपल्या जबाबदारीचे भान ठेवावे, असे आवाहन नगरपरिषदेच्या वतीने करण्यात येत आहे.

चाकण शहरातील विविध भागांमध्ये घरगुती कचरा संकलित करण्यासाठी नगरपरिषदेची घंटागाडी नियमितपणे फिरत असते. नागरिकांनी घरातील ओला व सुका कचरा घंटागाडीतच द्यावा. यासाठी प्रशासनाकडून जनजागृतीही केली जाते. मात्र, काही नागरिकांकडून या सूचनांकडे दुर्लक्ष करून रस्त्याच्या कडेला, मोकळ्या जागेत आणि सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकला जात असल्याचे निदर्शनास येत आहे. त्यामुळे परिसरात अस्वच्छता पसरून दुर्गंधी निर्माण होण्याबरोबरच डासांची उत्पत्ती आणि विविध आजारांचा धोका वाढण्याची शक्यता आहे.

घंटागाडी उपलब्ध असतानाही सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकण्याची प्रवृत्ती थांबविणे आवश्यक आहे. शहर स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी केवळ नगरपरिषदेची नसून प्रत्येक नागरिकाची आहे. सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकून दुसऱ्यांच्या आरोग्याला धोका निर्माण करणाऱ्यांवर नियमांनुसार दंडात्मक कारवाई करण्याची भूमिका नगरपरिषदेने घेतली पाहिजे. महिला व बालकल्याण समितीच्या सभापती तथा नगरसेविका रूपाली कांडगे यांनी सांगितले की," स्वच्छतेबाबत नागरिकांनी अधिक जागरूक राहण्याची गरज आहे. शहरातील महिला, लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि सर्वसामान्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने स्वच्छ परिसर असणे अत्यंत आवश्यक आहे."

नागरिकांनी सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकण्याची सवय सोडून प्रशासनाच्या स्वच्छता मोहिमेला सहकार्य करावे, असे त्यांनी आवाहन केले.

उघड्यावर कचरा टाकणाऱ्या नागरिकांवर यापुढे नियमांनुसार कठोर कारवाई केली जाईल. घरातील ओला व सुका कचरा वेगवेगळा करून तो केवळ घंटागाडीतच द्यावा. एखाद्या परिसरात घंटागाडी वेळेवर येत नसेल किंवा कचरा संकलनाबाबत काही अडचण येत असेल, तर संबंधित नागरिकांनी नगरपरिषद प्रशासनाशी किंवा आमच्याशी संपर्क साधावा. नागरिकांच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही केली जाईल, अशी भूमिका रूपालीताई कांडगे यांनी मांडली.

शहरातील स्वच्छता टिकवून ठेवण्यासाठी केवळ स्वच्छता कर्मचारी आणि घंटागाड्यांवर अवलंबून राहून चालणार नाही, तर नागरिकांनीही सार्वजनिक स्वच्छतेचे भान ठेवणे आवश्यक आहे. घरासमोरील परिसर स्वच्छ ठेवणे, कचरा रस्त्यावर न टाकणे, ओला व सुका कचरा वेगळा करणे आणि नगरपरिषदेच्या नियमांचे पालन करणे या साध्या गोष्टींमधून शहराच्या स्वच्छतेत मोठा बदल घडू शकतो.





चिलापी, बांगडा व सुरमई माशांना प्रचंड मागणी

■ चाकण (दै. संध्या)

चाकणला मच्छी बाजारात चिलापी, बांगडा व सुरमई माशांना प्रचंड मागणी आहे. शहरातील मुख्य बाजारपेठेत मासे खरेदीसाठी नागरिकांची मोठी गर्दी पाहायला मिळत आहे. सणासुदीच्या वातावरणामुळे बाजारपेठेत चैतन्य निर्माण झाले असून, मासे आणि मांसाहारी पदार्थांच्या खरेदीला तुफान वेग आला आहे. वाढती मागणी आणि ग्राहकांची वर्दळ यामुळे व्यापाऱ्यांमध्येही समाधानाचे वातावरण आहे. मच्छी बाजारात पापलेट, सुरमई, बांगडा, बोंबील, रावस, कोळंबी, चिलापी, रोहु, मळ्या माशांची भरपूर आवक झाली आहे. या सर्वच प्रकारच्या माशांना मोठी मागणी वाढूनही भाव कडाडले आहेत. मच्छी बाजारात मासे खरेदीसाठी नागरिकांची प्रचंड वर्दळ वाढली असून, चाकण बाजारपेठेत चिलापी माशांचे दर प्रति किलो २०० रुपये असल्याचे मासे विक्रेत्या राजश्री उंबरे यांनी सांगितले. इतर प्रकारच्या माशांच्या दरातही मोठी वाढ झाली आहे. सणाच्या निमित्ताने अनेक



ग्राहकांकडून माशांची मोठ्या प्रमाणात खरेदी केली जात असल्याने मासळी बाजारातही विक्रमी उलाढाल वाढली आहे. माशांची उलाढाल वाढल्यामुळे मासळी विक्रेते आणि इतर व्यापाऱ्यांच्या व्यवसायाला चालना मिळाली आहे. दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर बाजारातील गर्दी आणखी वाढण्याची शक्यता व्यापारी व्यक्त करत आहेत.

"मासे खरेदीसाठी नागरिकांची मोठी झुंबड उडत आहे. चिलापी माशांचा प्रति किलो दोनशे रुपये इतका दर आहे. माशांचे भाव तेजीत असल्याने व्यापारी खुशीत आहेत."
- राजश्री उंबरे, मासे विक्रेत्या, चाकण.

'यशवंत' कारखाना सुरु करण्यासाठी संचालक मंडळाचे प्रयत्न

■ कोरेगावमुळ (दै. संध्या)

पूर्व हवेली तालुक्यातील शेतकरी, सभासद आणि कामगारांच्या दृष्टीने महत्त्वाचा असलेला यशवंत सहकारी साखर कारखाना पुन्हा सुरु होण्याची प्रतीक्षा अनेक वर्षांपासून केली जात आहे. कारखान्यावरील प्रशासक हटवून पंचवार्षिक निवडणुकीच्या माध्यमातून चेअरमन, व्हाईस चेअरमन, संचालक मंडळ अस्तित्वात आले असून, कारखान्याचे कामकाज पुन्हा सुरु करण्याच्या दृष्टीने संचालक मंडळाकडून प्रामाणिक प्रयत्न केले जात आहेत.

दिवाळीच्या निमित्ताने सभासद देणी बाबतीत हालचाली चालू आहे. कारखाना कार्यान्वित करण्यासाठी आवश्यक असलेल्या प्रशासकीय व तांत्रिक बाबींमधील अडचणी दूर होणे गरजेचे आहे. यशवंत सहकारी साखर कारखाना हा पूर्व हवेलीची अस्मिता आहे तात्विक मुद्दे सोडून तालुक्यातील महत्त्वाची संस्था सहकार क्षेत्रातील ही चालु असावी. परिसरातील शेतकऱ्यांच्या



आर्थिक प्रगतीशी आणि सहकार क्षेत्राच्या विकासाशी जोडलेला महत्त्वाचा विषय आहे. कारखाना सुरु झाल्यास परिसरातील ऊस उत्पादक सभासद शेतकऱ्यांना दिलासा मिळण्यासोबतच स्थानिक रोजगारनिर्मितीलाही चालना मिळू शकते. त्यामुळे कारखाना पुन्हा सुरु होण्याकडे शेतकरी, सभासद आणि कामगारांचे लक्ष लागले आहे.

पंचवार्षिक निवडणुकीनंतर संचालक मंडळाने कारखान्याचे कामकाज सुरळीत करण्यासाठी पुढाकार घेतला आहे. मात्र, केवळ संचालक मंडळाच्या प्रयत्नांवर अवलंबून न राहता शासनस्तरावरुन मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, सहकार मंत्री संबंधित विभागाच्या वतीने आवश्यक सहकार्य मिळणेही तितकेच महत्त्वाचे आहे. विविध प्रशासकीय परवानग्या, तांत्रिक अडचणी आणि प्रलंबित बाबींचा सकारात्मक विचार करुन त्या मार्गी लावल्यास कारखाना सुरु करण्याच्या प्रक्रियेला गती मिळू शकते. 'राज्य सरकारने सकारात्मक भूमिका घ्यावी' यशवंत सहकारी साखर कारखान्याच्या पुनरुज्जीवनासाठी राज्य सरकारने पुढाकार घेऊन संचालक मंडळाला आवश्यक ते प्रशासकीय, तांत्रिक आणि धोरणात्मक सहकार्य करावे, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. प्रलंबित प्रश्नांचा सहानुभूतीपूर्वक विचार करुन संबंधित विभागांना आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्यास कारखाना सुरु करण्याच्या प्रयत्नांना बळ मिळू शकते.

सहकार क्षेत्राला बळकटी देणे, शेतकऱ्यांचे हित जपणे आणि स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना देणे या दृष्टीने यशवंत सहकारी साखर कारखाना पुन्हा कार्यान्वित होणे महत्त्वाचे आहे.

खेडमध्ये उत्खनन माफियांचा महसूल पथकावर हल्ला

■ राजगुरुनगर (दै. संध्या)

अवैध गौण खनिज उत्खननाच्या कारवाईला जाणाऱ्या खेडचे तहसीलदार प्रशांत बेडसे आणि महसूल अधिकाऱ्यांच्या पथकावर उत्खनन माफियांनी थेट हल्ला चढवला आहे. हायवा चालकाने गाडीतील मुरुम अचानक उलटून रस्ता अडवला, स्कूटीवरून आलेल्या दोघांनी गाडी रोखली तर जेसीबी चालक पळून गेले.

याप्रकरणी खेड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तहसीलदार प्रशांत बेडसे व अधिकारी गुरुवारी (दि २२) सायंकाळी सुमारे ६.३० वाजता अवैध उत्खनन कारवाई पथक राजगुरुनगरहून पाबळ रस्त्याने निघाले होते. निवासी नायब तहसीलदार चेतन मोरे, ग्राममहसूल अधिकारी मनिषा जानराव, विजया पाटील, ब्रम्हानंद टाचणे तसेच महसूल सेवक दत्तात्रय चव्हाण, संतोष बोऱ्हाडे, सुनिल गायकवाड हे बरोबर होते.

निमगाव हद्दीत खेड सिटीजवळ एमएच-१२ वायक्यू ७९४६ हा हायवा मुरुम वाहून कनेरसरकडून खेडकडे येताना पथकाला दिसला. पथकाने परत गाड्या वळवल्या. तेव्हा मागून आलेल्या स्कूटीवरील दोन अनोळखी इसमांनी पथकाच्या गाड्यांना रोखून "तुम्ही कोण?" असे विचारले. तहसीलदार बेडसे यांनी स्वतःची ओळख दिल्यानंतर ते बाजूला झाले. पथकाकडून हायवाचा पाठलाग सुरू झाला.रेटवडी



येथील कॅनाल रस्त्यावर सव्वासात वाजता पथकाच्या पुढे चाललेल्या हायवा चालकाने अचानक मागील भाग वर करून अंदाजे ६ ब्रास मुरुम पथकाच्या गाड्यांवर आणि रस्त्यावर ओतला. लहान असल्याने रस्ता पूर्णपणे अडला. हायवा चालक अंधारात गाडी घेऊन पळाला.


त्यानंतर पथक एमआयडीसीसाठी संपादित करण्यात आलेल्या गट नं. १४८६ येथे साय ७.३० वाजता पोहोचले. तिथे दोन जेसीबी मशीन उत्खनन करत होत्या. पथकाच्या गाड्या दिसताच चालक मशीन सुमारे २०० मीटर दूर उभी करून पळाले. या ठिकाणी अंदाजे २७०० ब्रास मुरुम उत्खनन आणि चोरी झाल्याचे आढळले. या ठिकाणी असलेल्या गणेश साहेबराव हजारे (रा. कनेरसर) यांनी मशीन आपल्या असल्याचे आणि हायवा सुयोग पांडुरंग पानसरे (रा. पाबळ, ता. शिरूर) यांचा असल्याचे सांगितले. महसुल अधिकारी शिला बाळशीराम शेवाळे (४४, रा. लक्ष्मीनगर, राजगुरुनगर) यांच्या तक्रारीवरून खेड पोलीस ठाण्यात गुन्हा करण्यात आला आहे.

आरोपींमध्ये गणेश हजारे, सुयोग पानसरे तसेच स्कूटीवरील दोन अनोळखी, हायवा चालक आणि दोन जेसीबी चालकांचा समावेश आहे. खेड तालुक्यात अवैध उत्खननाचे जाळे किती मजबूत आहे, हे या घटनेने पुन्हा उघड झाले आहे. अधिकाऱ्यांच्या गाडीवर थेट मुरुम ओतणे आणि रस्ता अडवणे हे स्पष्टपणे दडपशाहीचे आणि आव्हानाचे कृत्य आहे.



शनिवार, दि. २४ ऑक्टोबर २०२६ www.dainikesandhya.com www.youtube.com/@sandhyalivenews ७

दैनिक संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक



कलाकारांना प्रोत्साहन, कलाकेंद्राच्या उभारणीसाठी शासनाचे सर्वतोपरी सहकार्य : उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार

■ मुंबई (दै. संध्या)

कला, कलाकार आणि कलाशिक्षणाला प्रोत्साहन देऊन सांस्कृतिक क्षेत्राच्या विकासाला चालना देण्यासाठी शासन कटिबद्ध आहे. आरे कॉलनी येथे उभारण्यात येत असलेल्या 'ओम द ग्लोबल आर्ट सेंटर' आणि 'आरे म्युझियम' या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाला शासनाच्या वतीने सर्वतोपरी सहकार्य करण्यात येईल. या केंद्रामुळे महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वैभवात मोलाची भर पडेल, असा विश्वास उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी व्यक्त केला.

आरे कॉलनी येथील निसर्गरम्य परिसरात आयोजित 'शिल्परंग-१२' या राष्ट्रीय कला परिसंवादाच्या उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या. यावेळी सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार, खासदार रवींद्र वायकर, एबीपी न्यूज व एबीपी माझाचे मुख्य संपादक राजीव खांडेकर, वित्त विभागाचे सहसचिव संजय इंगळे, आरे मिल्क कॉलनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीकांत शिपूरकर, 'ओम द ग्लोबल आर्ट सेंटर' आणि 'आरे म्युझियम'चे संस्थापक अध्यक्ष डॉ. नरेंद्र बोरलेपवार, मयुरी बोरलेपवार आदी मान्यवर उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार म्हणाल्या की, महाराष्ट्राला अजिंठा-वेरूळच्या लेण्यांपासून वारली चित्रकलेपर्यंत आणि आधुनिक चित्रकला व शिल्पकलेपर्यंत समृद्ध कलापरंपरा लाभली आहे. कला ही केवळ सौंदर्याची अनुभूती देणारी नसून ती माणसाला विचार करायला शिकवते, संवेदनशील बनवते आणि समाजाला एकत्र जोडते. रस्ते, उद्योग, शिक्षण व पायाभूत सुविधांप्रमाणेच कला, संस्कृती आणि सर्जनशीलताही समाजाच्या समृद्धीचे महत्त्वाचे मापदंड आहेत.

'ओम' या केंद्राच्या माध्यमातून देशभरातील कलाकारांना प्रदर्शनासोबतच एकत्र राहून कलानिर्मिती करणे, नवनवीन प्रयोग करणे आणि अनुभवांची देवाणघेवाण करण्याची संधी उपलब्ध होत आहे. 'शिल्परंग'सारख्या उपक्रमांमुळे विविध राज्यांतील कलाकार एकत्र येऊन भारतीय सांस्कृतिक विविधतेचे दर्शन घडवतात. युवा कलाकारांनी आपल्या कलेवर विश्वास ठेवत नवनवीन प्रयोग करावेत आणि आपल्या मातीशी नाते जपत जागतिक विचारांशी संवाद साधावा, असे आवाहन त्यांनी केले.

कला क्षेत्रातील महिलांचा सहभागही महत्त्वाचा असल्याचे नमूद करून उपमुख्यमंत्री पवार म्हणाल्या की, अधिकाधिक मुलींना कलाशिक्षण, कलानिर्मिती आणि व्यावसायिक



संधी मिळण्यासाठी प्रयत्न होणे आवश्यक आहे. कला क्षेत्राला राजाश्रय मिळणे गरजेचे असल्याने कलाकारांना प्रोत्साहन देण्यासाठी सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार यांच्यासोबत सकारात्मक प्रयत्न करण्यात येतील. दृश्य कला (व्हिज्युअल आर्ट्स) हा विषय सांस्कृतिक कार्य विभागाकडे वर्ग करण्याबाबतही सकारात्मक प्रयत्न करण्याची ग्वाही त्यांनी यावेळी दिली.

दृश्य कलांना व्यापक व्यासपीठ देण्याची गरज – सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार

चित्रकार आणि शिल्पकारांच्या कलानिर्मितीला प्रोत्साहन देण्यासाठी राजाश्रय वाढविण्यासह त्यांच्या संकल्पनांना भक्कम पाठबळ देण्याची आवश्यकता आहे. भारतीय चित्रकला आणि शिल्पकलेला समृद्ध परंपरा लाभली असून, तिचे जतन व संवर्धन करण्यासाठी शासन, कला क्षेत्र आणि समाजाने एकत्रित प्रयत्न करणे गरजेचे आहे. दृश्य कला आणि सादरीकरण कला या दोन्ही क्षेत्रांचा समतोल विचार करून दृश्य कलांना अधिक व्यापक व्यासपीठ उपलब्ध करून दिले पाहिजे, असे प्रतिपादन सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार यांनी केले.

'ओम द ग्लोबल आर्ट सेंटर' आणि 'आरे म्युझियम' येथे साकारलेल्या शिल्पांमध्ये केवळ मूर्त स्वरूप नसून त्यामागे भावनिक, संवेदनशील आणि नैसर्गिक आशय दडलेला आहे. कलाकृतीचे सौंदर्य अनुभवण्याबरोबरच त्यामागील विचार, भावना आणि तत्त्वज्ञान समजून घेणेही महत्त्वाचे आहे. ज्येष्ठ चित्रकार सुहास बहुलकर यांच्यासह अनेक कलाकारांनी रंगांच्या माध्यमातून व्यापक विचार मांडण्याची परंपरा जपली आहे, असे त्यांनी सांगितले. 'शिल्परंग-१२' या राष्ट्रीय कला परिसंवादात देशाच्या विविध भागांतून सहभागी झालेल्या २१ चित्रकार व शिल्पकारांचा शाल आणि प्रतिमा देऊन सन्मान करण्यात आला. यामध्ये विनोद शर्मा, सुहास बहुलकर, चरण शर्मा, जॉन डगलस, निलेश वेडे, प्रदीप जोगदंड, रमेश चंद्र, साक्षी कदम, आनंद पांचाळ, सिद्धार्थ शिंगाडे, नितीन मिस्त्री, अमरनाथ शर्मा, प्रदीप कामिया, नीना देवांगन, वैभव मोरे, जगन्नाथ महापात्रा, दिलीप शर्मा, योगेश मुरकुटे, मान काफर, रविकुमार आणि केतन खुटले यांचा समावेश होता. यावेळी ज्येष्ठ चित्रकार सुहास बहुलकर यांच्या चित्राचे अनावरण करण्यात आले. कार्यक्रमस्थळी साकारलेल्या शिल्पांची पाहणी करून उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी कलाकारांच्या सर्जनशीलतेचे कौतुक केले.

संस्कृतीमध्ये रंगांना विशेष महत्त्व

भारतीय जीवनपद्धती, अध्यात्म आणि संस्कृतीमध्ये रंगांना विशेष महत्त्व आहे. रंगसंगतीचा संबंध मानवी भावना, संवेदना आणि तत्त्वज्ञानाशी आहे. चित्रकारांनी आपल्या कलाकृतींतून भारतीय परंपरा, विचार आणि जीवनदृष्टी प्रभावीपणे मांडावी. शिल्पकलेने लेणी, वास्तू आणि विविध कलाकृतींच्या माध्यमातून भारतीय संस्कृतीला आकार दिला असून, या परंपरेशी नव्या पिढीचे नाते जोडण्यासाठी सातत्यपूर्ण प्रयत्न आवश्यक आहेत, असेही मंत्री शेलार यांनी नमूद केले.

थोडक्यात पण महत्वाचे

एकापेक्षा अधिक बँकांत कर्जखाती असलेल्या शेतकऱ्यांची यादी प्रसिद्ध

मुंबई : पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६ ची प्रभावी अंमलबजावणी सुरू असून, एकापेक्षा अधिक बँकांमध्ये कर्जखाती असलेल्या आणि २ लाख रुपयांपेक्षा कमी थकबाकी असलेल्या १ लाख १५ हजार ६९७ पात्र शेतकऱ्यांची चौथी यादी आधार प्रमाणीकरणासाठी प्रसिद्ध करण्यात आली आहे, अशी माहिती सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी दिली. सहकार मंत्री बाबासाहेब पाटील म्हणाले, महाआयटीने तयार केलेल्या योजनेच्या पोर्टलवर बँकांनी एकूण ३१.१७ लाख थकीत कर्जखात्यांची माहिती अपलोड केली आहे. महाआयटीने केलेल्या संगणकीय प्रक्रियेनंतर, आधार प्रमाणीकरण पूर्ण झालेल्या शेतकऱ्यांपैकी १५.८५ लाख पात्र लाभार्थ्यांच्या कर्जखात्यांवर आतापर्यंत १३ हजार २७५ कोटी रुपयांची कर्जमुक्तीची रक्कम जमा करण्यात आली आहे. पहिल्या यादीत १६ लाख ९६ हजार २०१, दुसऱ्या यादीत ४ लाख १९ हजार ७३७ आणि तिसऱ्या यादीत ३ लाख ५१ हजार १९२, अशा एकूण २४ लाख ६७ हजार १३० पात्र शेतकऱ्यांच्या याद्या प्रसिद्ध केल्या आहेत. आज एकापेक्षा अधिक बँकांमध्ये कर्जखाती असलेल्या आणि २ लाख रुपयांपेक्षा कमी थकबाकी असलेल्या १ लाख १५ हजार ६९७ पात्र शेतकऱ्यांची यादी आधार प्रमाणीकरणासाठी प्रसिद्ध करण्यात आली आहे. ही यादी संबंधित बँक शाखा, विकास संस्था आणि ग्रामपंचायतींमध्ये प्रसिद्ध करण्यात आली आहे.

जयराम यांची महाराष्ट्र विधिमंडळाला सदिच्छा भेट

मुंबई : सुरीनामच्या भारतातील राजदूत हनीषा जयराम यांनी महाराष्ट्र विधिमंडळ, मुंबई येथे सदिच्छा भेट दिली. यावेळी महाराष्ट्र विधानपरिषदेचे उपसभापती सचिन अहिर यांनी त्यांचे स्वागत केले. सुरीनाममध्ये भारतीय वंशाच्या नागरिकांची संख्या लक्षणीय असून, दोन्ही देशांमधील राजनैतिक, आर्थिक आणि व्यापारविषयक संबंध अतिशय दृढ व मैत्रीपूर्ण आहेत. सुरीनाममध्ये ५१ प्रतिनिधींचे सभागृह असून, मंत्रिमंडळ सदस्यांची संख्या १७ आहे. महाराष्ट्राची राजधानी मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी असल्याने येथे विविध क्षेत्रांतील व्यापार आणखी वाढविण्यासाठी आपण प्रयत्नशील असल्याचे हनीषा जयराम यांनी यावेळी सांगितले. त्यांनी विधानसभा आणि विधानपरिषद या दोन्ही सभागृहांना भेट दिली. दोन्ही देशांमधील व्यापार आणि मैत्रीपूर्ण संबंध आणखी वृद्धिंगत व्हावेत, अशी सदिच्छा उपसभापती सचिन अहिर यांनी यावेळी व्यक्त केली. याप्रसंगी महाराष्ट्र विधानमंडळाच्या सचिव-२ श्रीमती मेघना तळेकर-इटकेलवार, सचिव-३ डॉ. विलास आठवले, सचिव-४ श्री. शिवदर्शन साठ्ये आणि महाराष्ट्र विधानपरिषदेच्या सभापतींचे सचिव पंडित खेडकर उपस्थित होते.

पाणीटंचाईवर मात करण्यासाठी सूक्ष्म नियोजन आणि लोकसहभागातून भूजल व्यवस्थापनावर भर द्या : जिल्हाधिकारी जॉन्सन

■ बीड (दै. संध्या)

बीड जिल्ह्यात यंदा सरासरीपेक्षा कमी पर्जन्यमान झाल्यामुळे अनेक भागांत भूजल पातळी खालावली आहे. आगामी उन्हाळा आणि संभाव्य दुष्काळी परिस्थिती लक्षात घेता जिल्ह्यात कुठेही पिण्याच्या पाण्याची टंचाई भासू नये, यासाठी प्रशासनाने आतापासूनच टप्प्याटप्प्याने सूक्ष्म नियोजन करावे, असे निर्देश जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी दिले आहेत. जलशक्ती मंत्रालयाचा जल संसाधन, नदी विकास व गंगा संरक्षण विभाग (केंद्रीय भूमी जल बोर्ड – CGWB, राज्य इकाई कार्यालय, पुणे) आणि भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा (GSDA) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित भूजल पातळी व पाणीटंचाई निवारण आढावा बैठकीत ते बोलत होते.

या महत्त्वपूर्ण बैठकीत केंद्रीय भूमी जल बोर्डाचे शास्त्रज्ञ आणि भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेच्या वतीने जिल्ह्यातील पर्जन्यमान, सद्यस्थितीतील भूजल पातळी आणि आगामी



काळातील संभाव्य टंचाई कृती आराखड्याबाबत सविस्तर सादरीकरण करण्यात आले. जिल्ह्यात पावसाचे प्रमाण कमी राहिल्याने जमिनीतील पाण्याच्या पुनर्भरणावर परिणाम झाला आहे. निरीक्षण विहिरींच्या नोंदीनुसार तसेच जानेवारीअखेरच्या संभाव्य आकडेवारीनुसार जिल्ह्यातील अनेक गावांमध्ये पाण्याची पातळी सरासरीपेक्षा १ ते २ मीटर आणि काही ठिकाणी त्याहून अधिक खालावण्याची चिन्हे आहेत. ही परिस्थिती लक्षात घेऊन प्रशासनाने ऑक्टोबर ते डिसेंबर या पहिल्या टप्प्यात विंधन विहिरी (बोअरवेल) आणि हातपंपांची विशेष दुरुस्ती मोहीम हाती घेणे, तर जानेवारी ते मार्च आणि एप्रिल ते जून या सर्वाधिक तीव्रतेच्या काळात करावयाच्या तातडीच्या उपाययोजनांबाबत बैठकीत सखोल चर्चा झाली. जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी बैठकीत चर्चेदरम्यान अधिकाऱ्यांकडून तालुका आणि गावनिहाय परिस्थितीची सविस्तर माहिती जाणून घेतली. ज्या गावांमध्ये आणि वाड्या-वस्त्यांवर दरवर्षी पाण्याची तीव्र टंचाई भासते किंवा जिथे यंदा भूजल पातळी झपाट्याने खालावत आहे, अशा संवेदनशील गावांची अचूक माहिती संकलित करून वस्तुनिष्ठ तांत्रिक अहवाल तयार करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

जलसुरक्षेच्या दिशेने ठोस पाऊल : टँकरद्वारे पाणीपुरवठ्याला पारदर्शकतेची नवी दिशा

■ मुंबई (दै. संध्या)



पाणी हे जीवनाचे मूलभूत अधिष्ठान आहे. मानवी जीवनापासून शेती, पशुधन आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेपर्यंत प्रत्येक घटक पाण्यावर अवलंबून आहे. पावसाची अनिश्चितता आणि बदलत्या हवामानामुळे निर्माण होणारी पाणीटंचाई ही केवळ नैसर्गिक समस्या राहिलेली नाही, तर प्रभावी नियोजन आणि सुयोग्य व्यवस्थापनाची कसोटी ठरत आहे. अशा परिस्थितीत प्रत्येक नागरिकाला आवश्यक प्रमाणात स्वच्छ पिण्याचे पाणी उपलब्ध करून देणे, ही प्रशासनाची महत्त्वपूर्ण जबाबदारी आहे. याच भूमिकेतून छत्रपती संभाजीनगर जिल्हा प्रशासनाने टंचाईग्रस्त भागातील टँकरद्वारे पाणीपुरवठ्यासाठी सर्वंकष कार्यपद्धती निश्चित केली आहे.

जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष विनय गौडा जी. सी. यांनी जिल्हास्तरीय पाणी टँकर संनियंत्रण व प्रत्यक्ष पाहणी समिती गठित करून पाणीपुरवठा व्यवस्थेत पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि अचूकता आणण्याच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. ऑक्टोबर 2026 ते जून 2027 या संभाव्य टंचाई कालावधीचा विचार करून ही कार्यपद्धती निश्चित करण्यात आली आहे.

पाणीटंचाईच्या काळात टँकरद्वारे पाणीपुरवठा हा नागरिकांसाठी मोठा आधार ठरतो. मात्र, हा पुरवठा केवळ मागणीवर आधारित न राहता प्रत्यक्ष गरजेनुसार व्हावा, यासाठी प्रशासनाने स्पष्ट निकष निश्चित केले आहेत. संबंधित गावाची किंवा वाडी-वस्तीची लोकसंख्या विचारात घेऊन दरडोई प्रतिदिन 20 लिटर पाण्याच्या निकषानुसार आवश्यक पाण्याचे प्रमाण निश्चित केले जाणार आहे.

बुद्धभूमी फाउंडेशनच्या जमिनीसंदर्भात सामोपचाराने कार्यवाही करावी : बनसोडे



■ मुंबई (दै. संध्या)

बुद्धभूमी फाउंडेशनच्या जमिनीसंदर्भात सामोपचाराने कार्यवाही करण्यात यावी, असे निर्देश विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांनी दिले.

कल्याण तालुक्यातील मौजे चिकणघर येथील बुद्धभूमी फाउंडेशनच्या जमिनीबाबत तसेच बुद्धभूमी आंतरराष्ट्रीय बौद्ध पर्यटन केंद्र विकसित करण्याबाबत विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांच्या अध्यक्षतेखाली विधानभवनात आढावा बैठक झाली. संबंधित जमीन कायमस्वरूपी भाडेपट्ट्याने देण्याबाबत तसेच त्यासंदर्भातील नोंद सातबारा उताऱ्यावर घेण्यासाठी आवश्यक प्रस्ताव सादर करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या. कामांमुळे बुद्धभूमी फाउंडेशनचे काही नुकसान झाले असल्यास ते संबंधित कंत्राटदाराकडून भरून घेण्याचे निर्देशही यावेळी देण्यात आले. बैठकीस कल्याण-डोंबिवली महानगरपालिका, एमएमआरडीएचे संबंधित अधिकारी तसेच बुद्धभूमी फाउंडेशनचे प्रतिनिधी उपस्थित होते.

सात महिन्यांचे थकीत वेतन अदा करून दोषींवर कारवाई करा : कामगार मंत्री ॲड. आकाश फुंडकर

■ बीड (दै. संध्या)



बीड जिल्ह्यात यंदा सरासरीपेक्षा कमी पर्जन्यमान झाल्यामुळे अनेक भागांत भूजल पातळी खालावली आहे. आगामी उन्हाळा आणि संभाव्य दुष्काळी परिस्थिती लक्षात घेता जिल्ह्यात कुठेही पिण्याच्या पाण्याची टंचाई भासू नये, यासाठी प्रशासनाने आतापासूनच टप्प्याटप्प्याने सूक्ष्म नियोजन करावे, असे निर्देश जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी दिले आहेत. जलशक्ती मंत्रालयाचा जल संसाधन, नदी विकास व गंगा संरक्षण विभाग (केंद्रीय भूमी जल बोर्ड – CGWB, राज्य इकाई कार्यालय, पुणे) आणि भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा (GSDA) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित भूजल पातळी व पाणीटंचाई निवारण आढावा बैठकीत ते बोलत होते.

या महत्त्वपूर्ण बैठकीत केंद्रीय भूमी जल बोर्डाचे शास्त्रज्ञ आणि भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेच्या वतीने जिल्ह्यातील पर्जन्यमान, सद्यस्थितीतील भूजल पातळी आणि आगामी काळातील संभाव्य टंचाई कृती आराखड्याबाबत सविस्तर सादरीकरण करण्यात आले.

जिल्ह्यात पावसाचे प्रमाण कमी राहिल्याने जमिनीतील पाण्याच्या पुनर्भरणावर परिणाम झाला आहे. निरीक्षण विहिरींच्या नोंदीनुसार तसेच जानेवारीअखेरच्या संभाव्य आकडेवारीनुसार जिल्ह्यातील अनेक गावांमध्ये पाण्याची पातळी सरासरीपेक्षा १ ते २ मीटर आणि काही ठिकाणी त्याहून अधिक खालावण्याची चिन्हे आहेत. ही परिस्थिती लक्षात घेऊन प्रशासनाने ऑक्टोबर ते डिसेंबर या पहिल्या टप्प्यात विंधन विहिरी (बोअरवेल) आणि हातपंपांची विशेष दुरुस्ती मोहीम हाती घेणे, तर जानेवारी ते मार्च आणि एप्रिल ते जून या सर्वाधिक तीव्रतेच्या काळात करावयाच्या तातडीच्या उपाययोजनांबाबत बैठकीत सखोल चर्चा झाली. जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी बैठकीत चर्चेदरम्यान अधिकाऱ्यांकडून तालुका आणि गावनिहाय परिस्थितीची सविस्तर माहिती जाणून घेतली.

अमरावती नदी पुन्हा प्रवाही होईपर्यंत प्रयत्न थांबणार नाही : पालकमंत्री रावल

■ धुळे (दै. संध्या)

दोंडाईचा शहराची जीवनवाहिनी असलेली अमरावती नदी पुन्हा प्रवाही करण्यासाठी केंद्र व राज्य शासनाच्या विविध विभागांसह तज्ज्ञ संस्था आणि नागरिकांच्या सहभागातून व्यापक उपाययोजना करण्यात येतील. नदीचे पुनरुज्जीवन करताना पावसाचे पाणी अडविणे, ते जमिनीत मुरविणे, नैसर्गिक जलप्रवाह मोकळे करणे आणि वृक्षारोपणाला प्राधान्य देण्यात येईल. अमरावती नदीत पुन्हा पाणी येईपर्यंत आपले प्रयत्न थांबणार नाहीत, असा निर्धार राज्याचे पणन व राजशिष्टाचार मंत्री तथा धुळे जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार रावल यांनी दोंडाईचा येथे व्यक्त केला.

पालकमंत्री जयकुमार रावल यांनी केंद्रीय जलशक्ती मंत्री सी. आर. पाटील यांच्याकडे अमरावती नदीच्या पुनरुज्जीवनासाठी तज्ज्ञ पथक पाठविण्याची मागणी केली होती. त्यानुसार केंद्रीय जलशक्ती मंत्रालयाच्या राष्ट्रीय स्वच्छ गंगा अभियान (NMCG) आणि राष्ट्रीय नदी संवर्धन संचालनालय (NRCD) यांच्या संयुक्त पथकाने दोंडाईचा येथे भेट देऊन नदीच्या सद्यस्थितीचा आढावा घेतला. नदी आटण्यामागील कारणांचा शोध घेणे, तिच्या नैसर्गिक प्रवाहातील अडथळे ओळखणे आणि पुनरुज्जीवनासाठी योग्य उपाययोजना सुचविणे हा या दौऱ्याचा प्रमुख उद्देश असल्याचे पालकमंत्री रावल यांनी सांगितले.



यावेळी केंद्रीय जलशक्ती मंत्रालयाच्या राष्ट्रीय नदी संवर्धन संचालनालयाचे संचालक तथा सहसचिव मिलिंद पानपाटील, राष्ट्रीय स्वच्छ गंगा अभियानाचे शास्त्रज्ञ 'डी' उपेंद्र व्ही. धोंडे, मृद व जलसंधारण विभागाचे उपसचिव अरुण गंगाधर गाळवे, नाशिक येथील महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्थेचे उपविभागीय अधिकारी वामन चव्हाण, नंदुरबार येथील भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेचे वरिष्ठ भूवैज्ञानिक सुनील शिंदे, धुळे येथील भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेचे वरिष्ठ भूवैज्ञानिक गिरीशकुमार भारे, उपविभागीय अभियंता अभय पाटीदार, कनिष्ठ अभियंता दीपक सैनी व अमोल दिलीप वागुळ, तहसीलदार नितीनकुमार देवरे, दोंडाईचा नगरपरिषदेचे मुख्याधिकारी देवेंद्र परदेशी, अभियंता शिवनंदन राजपूत नंदुरबार येथील भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेचे कनिष्ठ भूवैज्ञानिक प्रणव धनगर, शिंदखेडा पंचायत समितीचे विस्तार अधिकारी दिलीप बागले, दोंडाईचा उपविभागीय कार्यालयाचे राजेश धोलप आणि शिंदखेडा तालुका कृषी अधिकारी सुधीर ईशी आदी उपस्थित होते.

नदी पुन्हा प्रवाही करण्यासाठी केवळ बंधारे बांधून पाणी अडविणे पुरेसे नाही, तर ते जमिनीत मुरविणेही आवश्यक आहे. तलाव, शेततळी आणि धरणांमध्ये उघड्यावर साठविलेल्या पाण्याचा काही भाग उन्हामुळे वाफ होऊन निघून जातो. मात्र, पाणी जमिनीत मुरल्यास विहिरी आणि कूपनलिकांमधील पाण्याची पातळी वाढण्यास मदत होते. त्यामुळे पावसाचे पाणी वाहून जाऊ न देता ते जमिनीत मुरविण्यासाठी योग्य ठिकाणी जलसंधारणाची कामे करावी लागतील, असे पालकमंत्री श्री.रावल यांनी सांगितले.


परिसरात किती पाऊस पडतो, त्यातून किती पाणी उपलब्ध होते, किती वाहून जाते आणि किती जमिनीत मुरविता येते, याचा अचूक हिशेब मांडल्याशिवाय प्रभावी नियोजन करता येणार नाही. यासाठी पाण्याचा ताळेबंद तयार करून उपलब्ध बंधारे, शेततळी आणि पाणी मुरविण्याच्या व्यवस्थांची प्रत्यक्ष पाहणी करणे आवश्यक आहे. त्यानुसार दुरुस्ती आणि नवीन कामांचा प्राधान्यक्रम ठरवून पुढील सहा महिन्यांत आवश्यक उपाययोजनांना गती देण्यावर भर राहील.



दैनिक संध्या
निःपक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक
शनिवार, दि. २४ ऑक्टोबर २०२६

पुणे शहर व जिल्हा

www.dainikesandhya.com www.youtube.com/@sandhyalivenews





पुणे विभाग पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी आज मतदान होत आहे. दौंडचे आमदार राहुल कुल यांनी पत्नी कांचन कुल यांच्यासमवेत दौंड तालुक्यातील राहू येथील मतदान केंद्रावर जाऊन मतदानाचा हक्क बजावला. सर्व पात्र पदवीधर मतदारांनी मोठ्या संख्येने मतदानात सहभागी व्हावे, असे आवाहन आमदार राहुल कुल यांनी यावेळी केले.



पुरंदर तालुक्यात शिक्षक व पदवीधर विधानपरिषद निवडणुकीसाठी शांततेत मतदान

■ शिक्षकांचा टक्का ८६.७५ वर पोहोचला

■ सासवड (दै. संध्या)

पुणे विभाग शिक्षक आणि पदवीधर विधानपरिषद निवडणुकीसाठी शुक्रवारी पुरंदर तालुक्यात अत्यंत उत्साहात आणि शांततेत मतदान प्रक्रिया पार पडली. तालुक्यातील सासवड, जेजुरी, परिंचे, राजेवाडी आणि वाल्हे या पाचही केंद्रांवर मतदारांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेत आपला मतदानाचा हक्क बजावला. सकाळपासूनच मतदान केंद्रांवर मतदारांच्या रांगा लागल्या होत्या, ज्यामुळे पुरंदरच्या राजकारणात दिवसभर चैतन्याचे वातावरण पाहायला मिळाले. या निवडणुकीमध्ये शिक्षकांनी सर्वाधिक दाखवलेला उत्साह विशेष चर्चेचा विषय ठरला. पुरंदर तालुक्यात एकूण ५८१ शिक्षक मतदार होते, त्यापैकी तब्बल ५०४ शिक्षकांनी मतदानात सहभाग घेतला.



यामुळे शिक्षकांच्या मतदानाची टक्केवारी चक्क ८६.७५ टक्क्यांवर पोहोचली. दुसरीकडे, पदवीधर मतदारसंघासाठी एकूण ५ हजार १३९ पैकी २ हजार ९५४ मतदारांनी मतदान केले, ज्यामुळे पदवीधर मतदानाची अंतिम टक्केवारी ५७.४८ टक्के नोंदवली गेली. पदवीधर मतदारसंघातील मतदानाची सुरुवात सकाळी संथ झाली असली तरी जसजसा दिवस पुढे सरकला, तशी मतदानाची टक्केवारी वाढली. दुपारी बारा वाजेपर्यंत केवळ २० टक्के मतदान झाले होते, तर दोन वाजेपर्यंत हा आकडा ३४ टक्क्यांवर गेला. मात्र, दुपारी तीन नंतर मतदारांनी केंद्रांवर मोठी गर्दी केल्यामुळे संध्याकाळपर्यंत पदवीधरांचे मतदान ५७.४८ टक्क्यांवर येऊन पोहोचले. या संपूर्ण प्रक्रियेत माजी आमदार व भाजपाचे नेते संजय जगताप आणि ग्रामीण संस्थेच्या अध्यक्षा राजवर्धिनी जगताप यांनी उपस्थित राहून आपला मतदानाचा हक्क बजावला.

या निवडणुकीत पुरंदर तालुक्यामध्ये ५८१ शिक्षक आणि ५ हजार १३९ पदवीधर मतदार आपले राजकीय भवितव्य ठरवत आहेत. विशेषतः, महाविकास आघाडीच्या उमेदवार पुरंदरच्याच सूनबाई असल्याने आणि महायुतीच्या उमेदवारासाठी स्थानिक नेत्यांनी घेतलेल्या जोरदार परिश्रमांमुळे या निवडणुकीत मोठी राजकीय चुरस निर्माण झाली होती. सासवड येथील मतदान केंद्राबाहेर दोन्ही प्रमुख पक्षांच्या समर्थकांनी गर्दी करत जोरदार शक्तिप्रदर्शन केले, परंतु पोलिसांच्या योग्य नियोजनामुळे संपूर्ण मतदान प्रक्रिया अत्यंत शांततेत व सुरक्षित पार पडली.

दुसऱ्या आरोग्य साहित्य संमेलनाच्या स्वागताध्यक्षपदी उमेश चव्हाण यांची निवड

■ पुणे (दै. संध्या)



रुग्णांचे हक्क,गरीब आणि गरजू रुग्णांना आरोग्यसेवा, वैद्यकीय क्षेत्रातील जनजागृती तसेच सामाजिक आरोग्य चळवळीत कार्यरत असलेले रुग्ण हक्क परिषदेचे अध्यक्ष उमेश चव्हाण यांची दुसऱ्या आरोग्य साहित्य संमेलनाच्या स्वागताध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे.हे संमेलन १०,११ आणि १२ डिसेंबर २०२६ रोजी पुण्यातील बालगंधर्व रंगमंदिर येथे आयोजित करण्यात येणार आहे. आरोग्य आणि साहित्य यांचा परस्परसंबंध अधोरेखित करणे, आरोग्यविषयक प्रश्नांवर समाजात जागृती निर्माण करणे,रुग्ण,डॉक्टर, आरोग्य क्षेत्रातील तज्ज्ञ,लेखक व सामाजिक कार्यकर्ते यांच्यात संवाद घडवून आणणे,हा या संमेलनामागील महत्त्वाचा उद्देश आहे.उमेश चव्हाण हे रुग्ण हक्क परिषदेच्या माध्यमातून रुग्णांना न्याय मिळवून देणे,रुग्णालयांच्या अवाजवी बिलांविरोधात आवाज उठवणे आणि गरजू रुग्णांना उपचारांसाठी मदत मिळवून देण्यासाठी पाठपुरावा करणे अशा विषयांवर सातत्याने कार्यरत आहेत.ग्रँड पृथ्वी मेडिकल फाउंडेशनच्या माध्यमातून राबविण्यात येणारे पृथ्वी मोबाईल क्लिनिक हा त्यांच्या आरोग्यसेवेशी संबंधित उपक्रमांपैकी एक आहे. या उपक्रमाद्वारे वंचित आणि गरजू नागरिकांपर्यंत आरोग्यसेवा पोहोचविण्याचा प्रयत्न केला जातो. आरोग्यविषयक प्रश्न केवळ वैद्यकीय क्षेत्रापुरते मर्यादित नसून त्यांना सामाजिक,आर्थिक आणि मानवी पैलूही आहेत.साहित्याच्या माध्यमातून हे प्रश्न व्यापक समाजापर्यंत पोहोचविणे, आरोग्यविषयक अनुभवांना अभिव्यक्ती देणे आणि समाजाभिमुख आरोग्यविषयक विचारांना प्रोत्साहन देणे,या दृष्टीने आरोग्य साहित्य संमेलनाला विशेष महत्त्व प्राप्त होत आहे. या निवडीबाबत बोलताना उमेश चव्हाण म्हणाले, "आरोग्य ही प्रत्येक नागरिकाची मूलभूत गरज आहे,तर रुग्णाला सन्मानाने आणि न्यायाने उपचार मिळणे हा त्याचा अधिकार आहे. आरोग्यविषयक प्रश्नांना साहित्याची जोड मिळाली, तर समाजातील वेदना,रुग्णांचे अनुभव आणि आरोग्य व्यवस्थेतील वास्तव अधिक प्रभावीपणे लोकांसमोर मांडता येईल.दुसऱ्या आरोग्य साहित्य संमेलनाच्या स्वागताध्यक्षपदाची जबाबदारी माझ्यावर सोपविण्यात आली,ही माझ्यासाठी आनंदाची आणि जबाबदारीची बाब आहे. या संमेलनाच्या माध्यमातून रुग्णहित, आरोग्य जनजागृती आणि समाजाभिमुख आरोग्यव्यवस्था या विषयांवर व्यापक संवाद घडवून आणण्यासाठी मी प्रयत्नशील राहीन."

थोडक्यात पण महत्वाचे



लासुर्णेत दिवसाआड पाणीपुरवठा; ऑक्टोबरअखेरीसच पाणीटंचाईचे संकेत!

■ ग्रामपंचायत प्रशासनाचे पाणी काटकसरीने वापरण्याचे आवाहन; दुष्काळामुळे उन्हाळ्यातील संकटाची चिंता

लासुर्णे : दैनिक संध्या

इंदापूर तालुक्यातील लासुर्णे येथे पाणीटंचाईची चाहूल लागली असून, ग्रामपंचायत प्रशासनाकडून आता दिवसाआड पाणीपुरवठा करण्यात येणार आहे. पाण्याची उपलब्धता लक्षात घेता ग्रामस्थांनी पाण्याचा वापर काटकसरीने व जपून करावा, असे आवाहन ग्रामपंचायत प्रशासनाने केले आहे. ऑक्टोबर महिन्याच्या अखेरीसच पाणीपुरवठ्याचे नियोजन बदलण्याची वेळ आल्याने आगामी उन्हाळ्यातील पाणीटंचाईची चिंता आतापासूनच सतावू लागली आहे. परिसरात दुष्काळी परिस्थिती असल्याने पाण्याच्या उपलब्धतेवर परिणाम होण्याची शक्यता आहे. त्यामुळे येत्या काळात ग्रामस्थांना पाण्यासाठी अडचणींचा सामना करावा लागू शकतो. सध्या हिवाळ्याची सुरुवात होत असतानाच पाण्याचे संकट जाणवू लागल्याने उन्हाळ्यात परिस्थिती कशी असेल, याची प्रचिती आतापासूनच येत आहे. त्यामुळे पाण्याचा अपव्यय टाळणे, आवश्यक तेवढेच पाणी वापरणे आणि उपलब्ध पाण्याचे योग्य नियोजन करणे गरजेचे बनले आहे. पाणी हीच जीवनाची गरज असल्याने प्रत्येक थेंब जपून वापरा आणि ग्रामपंचायत प्रशासनाला सहकार्य करा, असे आवाहन करण्यात येत आहे.



रक्तातील कर्करोग पेशी ओळखण्यासाठी स्वदेशी तंत्रज्ञान

■ पुण्यातील Actorius ला केंद्र सरकारची मान्यता

■ मराठमोळे डॉ. जयंत खंदारे यांचे जर्मनी-फ्रान्सच्या शास्त्रज्ञांसोबत संशोधन

पुणे : दैनिक संध्या

भारतामध्ये कर्करोगाचे प्रमाण वाढत असताना लवकर निदान हे मोठे आव्हान बनले आहे. या पार्श्वभूमीवर मराठमोळे संशोधक डॉ. जयंत खंदारे या ही चाचणी विकसित केली आहे. Circulating Tumour Cells (CTCs) आणि Liquid Biopsy वरील या संशोधनासाठी पुण्यातील Actorius Innovations and Research Lab ला भारत सरकारच्या CDSCO कडून भारतातील पहिले मेडिकल डिव्हाइस लायसन्स मिळाले आहे. Actorius Innovations ही कर्करोग निदान आणि प्रिसिजन ऑन्कोलॉजीसाठी परवडणारे उपाय विकसित करणारी आघाडीची भारतीय मेड-टेक कंपनी आहे. OncoDiscover® हे Actorius ने विकसित केलेले CDSCO-मान्यताप्राप्त इन-व्हिट्रो डायग्नोस्टिक मेडिकल डिव्हाइस असून ते रक्तातील Circulating Tumour Cells (CTCs) शोधण्यासाठी वापरले जाते. इम्युनोमॅग्नेटिक एनरिचमेंट आणि फ्लूरोसेन्स मायक्रोस्कोपीद्वारे रक्तप्रवाहातील ट्युमर पेशींची ओळख पटवली जाते. भारतीय बनावटीचे हे तंत्रज्ञान Liquid Biopsy मधील देशांतर्गत कौशल्य वाढवण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे. Next-Generation Sequencing (NGS) मुळे ट्युमरमधील जनुकीय बदल ओळखता येतात. NGS आणि CTC विश्लेषण एकत्रितपणे कर्करोगाच्या जीवशास्त्र, उपचार प्रतिसाद आणि प्रगतीबद्दल अधिक व्यापक माहिती देण्याची क्षमता ठेवते. या अनुप्रयोगांसाठी योग्य क्लिनिकल पुराव्याची आवश्यकता असते.पीईटी सीटी: कर्करोगावरील उपचारानंतर, रुग्णाची गाठ आकुंचन पावली आहे की नाही हे तपासण्यासाठी पीईटी सीटीचा वापर केला जातो... तथापि, ते ६ मिमी आणि त्याहून मोठ्या गाठी शोधू शकते. आणि त्यामुळे अनेक रुग्णांमध्ये कर्करोग पुन्हा उद्भवतो आणि मेटास्टॅसिस होतो. ऑनकोडिस्कव्हर तंत्रज्ञान रुग्णाच्या रक्तातील उर्वरित कर्करोगाच्या पेशी शोधते, ज्यामुळे कर्करोग पुन्हा उद्भवतो आणि मेटास्टॅसिस होतो. दोन्ही शास्त्रज्ञ जगातील आघाडीचे शास्त्रज्ञ आहेत - आणि त्यांनी व्याख्यानासाठी आणि आमच्या एनजीएस लॅबच्या उद्घाटनासाठी ॲक्टोरियसला भेट दिली. डॉ. जयंत खंदारे म्हणाले, "पेट स्कॅननंतरही रक्तात काही पेशी राहू शकतात. OncoDiscover® तंत्रज्ञान त्यांच्या अभ्यासासाठी पूरक माहिती देऊ शकते. स्वदेशी तंत्रज्ञानामुळे आयातीवरील अवलंबित्व कमी होऊन चाचण्या अधिक सुलभ होण्यास मदत होईल."आम्ही त्यांचे संशोधन सहयोगी देखील आहोत आणि ते त्यांच्या प्रयोगशाळेत आमच्या पुढील महत्त्वपूर्ण तंत्रज्ञानाचे मूल्यांकन करत आहेत. ॲक्टोरियस एका अशा उपकरणाच्या विकासाधीन आहे जे कर्करोगाच्या रुग्णामधून सीटीसी (CTCs) फिल्टर करू शकते आणि मेटास्टॅसिसला विलंब लावू शकते किंवा प्रतिबंधित करू शकते. कर्करोगाच्या सुरुवातीच्या टप्प्यातील रुग्णांमध्ये मेटास्टॅसिसमुळे होणारे मृत्यू टाळण्यासाठी हे एक मोठे यश ठरेल. डॉ. क्लाऊस पँटेल म्हणाले, "प्रगत चाचण्या सर्वसामान्यांच्या आवाक्यात याव्यात हा हेतू आहे." डॉ. कॅथरीन ॲलिक्स-पॅनाबियरेस म्हणाल्या, "लवकर माहिती मिळाल्यास उपचारांचे नियोजन अधिक चांगले होते. हे तंत्रज्ञान त्या दिशेने महत्त्वाचे पाऊल आहे."

आंबिया बहार फळबागांसाठी हवामान धोक्यांचे संरक्षण

■ पुणे (दै. संध्या)

■ शेतकऱ्यांना पीक विम्यासाठी अर्ज करण्याचे आवाहन

आंबिया बहार सन २०२६ अंतर्गत फळपिकांसाठी हवामान धोक्यांपासून संरक्षण मिळावे, यासाठी पीक विमा योजनेची अधिसूचना जाहीर करण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत केळी पिकासाठी विविध हवामान धोक्यांनुसार विमा संरक्षण कालावधी निश्चित करण्यात आला असून, शेतकऱ्यांनी ३१ ऑक्टोबर २०२६ पर्यंत विमा योजनेत सहभागी व्हावे, असे आवाहन तालुका कृषी अधिकारी सचिन हाके यांनी केले आहे. या योजनेत केळी पिकासाठी कमी तापमान, वेगाचा वारा, जादा तापमान, पावसाचा खंड आणि गारपीट या हवामान धोक्यांचा समावेश आहे. कमी तापमानासाठी १ नोव्हेंबर ते २८ फेब्रुवारी, वेगाच्या वाऱ्यासाठी १ मार्च ते ३१ जुलै, जादा तापमानासाठी १ एप्रिल ते ३१ मे, तर पावसाच्या खंडासाठी १५ जुलै ते १५ सप्टेंबर हा विमा संरक्षण कालावधी निश्चित करण्यात आला आहे. गारपिटीसाठी १ डिसेंबर ते ३१ मे या कालावधीत संरक्षण देण्यात येणार आहे. केळी पिकासाठी पहिल्या चार हवामान धोक्यांकरिता विमा संरक्षित रक्कम प्रतिहेक्टर १ लाख ७० हजार रुपये असून, शेतकऱ्यांचा विमा हप्ता ८,५०० रुपये आहे. गारपिटीसाठी विमा संरक्षित रक्कम प्रतिहेक्टर ५७ हजार रुपये असून, विमा हप्ता २,८५० रुपये आहे. योजनेत सहभागी होण्यासाठी शेतकऱ्यांकडे ॲग्रीस्टॅक नोंदणी, आधार कार्ड,पी बँक खात्याचा तपशील आणि जमीनधारणा उतारा असणे आवश्यक आहे. तसेच जिओ टॅग फोटो आणि डिजिटल क्रॉप सर्व्हे (DCS) अंतर्गत १०० टक्के पिकाची नोंद बंधनकारक आहे. शेतकऱ्यांनी अधिसूचित फळपिकांच्या हवामान धोक्यांची माहिती घेऊन विहित मुदतीत नजीकच्या ई-सेवा केंद्रात किंवा बँक व वित्तीय संस्थेत संपर्क साधून विमा योजनेत सहभाग नोंदवावा, असे आवाहन करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी संबंधित तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा.आंबिया बहारातील अधिसूचित फळपिकांच्या हवामान धोक्यांविषयी सविस्तर माहिती कृषी विभागाच्या www.krishi.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

'सोमेश्वर'कडून सभासद व कामगारांची दिवाळी गोड

■ सोमेश्वरनगर (दै. संध्या)



श्री सोमेश्वर सहकारी साखर कारखान्याने सभासद शेतकरी, बिगरसभासद ऊस उत्पादक आणि कामगारांची दिवाळी गोड केली आहे. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार व राज्यसभा खासदार पार्थ पवार यांच्या मार्गदर्शनाखाली मागील गळीत हंगामातील ऊसदराची उर्वरित रक्कम,सभासदांच्या ठेवींवरील व्याज,कामगारांचा बोनस, दिवाळी भेट तसेच वेतनवाढीचा फरक वितरित करण्यात आला आहे.त्यामुळे शेतकरी आणि कामगारांना दिवाळीच्या पार्श्वभूमीवर आर्थिक दिलासा मिळाला आहे,अशी माहिती कारखान्याचे कार्यकारी संचालक राजेंद्र यादव यांनी दिली.मागील २०२५-२०२६ च्या गळीत हंगामासाठी नोव्हेंबर ते जानेवारी या कालावधीतील उसाला प्रतिटन ३,८०० रुपये,फेब्रुवारी महिन्यातील उसाला ३,९०० रुपये, तर मार्च महिन्यातील उसाला प्रतिटन ४,००० रुपये अंतिम दर निश्चित करण्यात आला होता. कार्यक्षेत्राबाहेरील ऊस उत्पादकांसाठी प्रतिटन ३,४०० रुपये दर ठरविण्यात आला होता. त्यानुसार सभासद व बिगरसभासद ऊस उत्पादकांना प्रतिटन ५०० रुपयांप्रमाणे एकूण ६०.११ कोटी रुपये,तर कार्यक्षेत्राबाहेरील ऊस उत्पादकांना प्रतिटन १०० रुपयांप्रमाणे ९६ लाख रुपये वितरित करण्यात आले.ठेवींचे व्याज आणि कामगारांना बोनससभासदांच्या ठेवी व त्यावरील व्याजापोटी २४.१५ कोटी रुपये,तर २०२३-२०२४ मधील ठेवींवरील चार कोटी रुपये वर्ग करण्यात आले आहेत. कामगारांना १५ टक्के बोनसपोटी ३.३३ कोटी रुपये, दिवाळी भेट म्हणून २९ लाख रुपये,वेतनवाढीच्या पहिल्या हप्त्यापोटी १.८४ कोटी रुपये,तर रजेच्या पगारापोटी २८ लाख रुपये देण्यात आले आहेत.या निर्णयामुळे कारखान्याशी संबंधित शेतकरी आणि कामगारांना सणासुदीच्या काळात मोठा आर्थिक आधार मिळाला आहे.

मागील गळीत हंगामात कारखान्याने १२ लाख ९८ हजार ५५९.३५७ मेट्रिक टन उसाचे गाळप केले. १२.२७ टक्के साखर उताऱ्याने १५ लाख ५७ हजार ६५० साखर पोत्यांचे उत्पादन झाले.तसेच को-जनरेशन प्रकल्पातून १२ कोटी ५३ लाख ४४ हजार ६८० युनिट वीज निर्मिती करण्यात आली.डिस्टिलरी प्रकल्पातून ८६ लाख २५ हजार १ लिटर अल्कोहोल,तर ४३ लाख ८२ हजार ५६९ लिटर इथेनॉलचे उत्पादन झाले.दरम्यान,चालू गळीत हंगामाला १५ ऑक्टोबरपासून सुरुवात झाली असून,सभासदांचा ऊस वेळेत गाळप करण्यासाठी कारखान्याने नियोजन केले आहे.सभासद शेतकऱ्यांनी कारखान्याला सहकार्य करून आपला ऊस वेळेत गाळपासाठी पाठवावा,असे आवाहन कार्यकारी संचालक राजेंद्र यादव यांनी केले.

माळेगाव केंद्रावर शांततेत मतदान - बालाजी लोंढे

■ माळेगाव (दै. संध्या)



पुणे पदवीधर मतदार व शिक्षक मतदार संघासाठी माळेगाव केंद्रावर शांततेत मतदान झाल्याची माहिती नोडल अधिकारी बालाजी लोंढे यांनी दिली.पुणे पदवीधर व शिक्षक मतदारसंघाच्या संघासाठी श्रीमंत शंभुसिंह महाराज हायस्कूल येथे मतदान प्रक्रिया पार पडली. पदवीधर मतदार संघात ४७ उमेदवार तर शिक्षक मतदार संघात ३० उमेदवार निवडणूकीसाठी रिंगणात उभे होते.या निवडणुकीत महायुती आणि महाविकास आघाडीत मुख्य लढत होत असून काही अपक्ष उमेदवार यांनी देखील दोघांसमोर कडवे आव्हान उभे केले होते. माळेगाव येथील १६ गावातील पदवीधर व शिक्षक मतदारांसाठी ७४१ क्रमांकाच्या मतदान केंद्रावर पदवीधर मतदारांसाठी ५ बुथ व शिक्षक मतदारांसाठी १ बुथ होता.या केंद्रावर पदवीधरच्या ३०८२ मतदाना पैकी २०१४ मतदारांनी मतदान केले.पदवीधर साठी सरासरी ६५.३३ टक्के,तर शिक्षकांच्या २०५ मतदाना पैकी १७९ मतदारांनी मतदान केले. शिक्षकांनी एकूण सरासरी ८७ .३० टक्के मतदान केले.या केंद्रावर नोडल अधिकारी बालाजी लोंढे यांना मंडलाधिकारी विनोद धापटे व ग्राममहसुल अधिकारी हनुमंत शिंदे यांनी सहकार्य केले. मतदान शांततेत पार पाडण्यासाठी माळेगाव पोलिस ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक कुलदीप संकपाळ यांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.मतदान प्रक्रिया शांततेत पार पडल्याने पोलिसांनी सुटकेचा निःश्वास सोडला. पदवीधर व शिक्षक यांना मतदार यादीतील नाव शोधण्यासाठी मतदान मदत केंद्रांची उभारणी करण्यात आली होती.बिएलओ यांनी अनेकांची नावे शोधून दिल्याने मतदान करणे सोपे झाले. याकामी बिएलओची भुमिका महत्त्वाची ठरली. या निवडणुकीच्या निमित्ताने महायुतीच्या घटक पक्षातील प्रमुख पदाधिकारी व महाविकास आघाडीचे पदाधिकारी खेळीमेळीच्या वातावरणात मतदारांना मतदान करण्याचे आवाहन करत होते.एकंदरीत हि निवडणूक वाद न करता उत्साहात मतदान झाले.

डॉ. डी. वाय. पाटील यांच्या स्मृतींचे जिवंत स्मारक येरवड्यात साकारणार!

■ पुणे (दै. संध्या)



पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या स्मृतींना सामाजिक कार्यातून उजाळा देण्याचा विधायक उपक्रम डॉ अजिंक्य डी वाय पाटील यांनी हाती घेतला आहे. येरवडा कारागृहात उभारण्यात येणाऱ्या महाराष्ट्र कारागृह उद्योग विक्री केंद्राचे भूमिपूजन त्यांच्या हस्ते करण्यात आले. अजिंक्य डीवाय. पाटील विद्यापीठाच्या वतीने हा प्रकल्प साकारत आहे. वडिलांच्या जयंतीनिमित्त केवळ औपचारिक अभिवादन न करता त्यांच्या स्मृतीत समाजोपयोगी उपक्रम उभारण्याचा निर्णय डॉ अजिंक्य पाटील यांनी घेतला. कारागृह उद्योगांमध्ये तयार होणाऱ्या उत्पादनांना विक्रीचे व्यासपीठ उपलब्ध करून देणे आणि कैद्यांच्या कौशल्याला प्रोत्साहन देणे, हा या उपक्रमामागील उद्देश आहे. या सोहळ्याला महाराष्ट्राचे अपर पोलीस महासंचालक तथा कारागृह व सुधारसेवा महानिरीक्षक सुहास वारके, येरवडा कारागृहाचे अधीक्षक सुनील धमाळ, महिला कारागृहाच्या अधीक्षक पल्लवी कदम, विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राकेश कुमार जैन, कुलसचिव डॉ. सुधाकर शिंदे, अधिष्ठाता डॉ. अभिलाषा माने, डॉ. सचिन राजस, मुख्य वित्त अधिकारी बाळासाहेब खुणे आणि उपस्थित होते. माहेर महिला प्रतिष्ठानच्या अध्यक्षा विद्या म्हात्रे यांच्या समन्वयाने हा कार्यक्रम पार पडला.

पुणे महानगरपालिकेच्या लोहगाव शाळेतून 'डेंग्यूमुक्त भारत' अभियानाचा शुभारंभ



■ पुणे (दै. संध्या)

भारतातील क्रमांक एक वैयक्तिक वापरासाठीचे डास प्रतिबंधक उत्पादन असलेल्या ओडोमॉसने 'डेंग्यूमुक्त भारत' या देशव्यापी जनजागृती अभियानाची सुरुवात केली. नागरिकांमध्ये डेंग्यूपासून बचावाबाबत जागरूकता निर्माण करणे तसेच दिवसा डेंग्यूचा प्रसार करणाऱ्या डासांपासून संरक्षण घेण्याची गरज अधोरेखित करणे, हा या अभियानाचा मुख्य उद्देश आहे. शाळांमधील जनजागृती कार्यक्रम आणि समुदाय सहभागाच्या उपक्रमांद्वारे दररोज डासांपासून संरक्षण घेण्याबाबत जनजागृती करण्याचा प्रयत्न या अभियानातून केला जाणार आहे. डासांमुळे पसरणाऱ्या आजारांपासून बचावाबाबत जनजागृती निर्माण करणे आणि प्रतिबंधात्मक उपाययोजना अंगीकारण्यास प्रोत्साहन देणे, हा ओडोमॉसच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांचा एक भाग आहे. ग्राहक शिक्षण आणि समुदाय जनजागृती कार्यक्रमांद्वारे कुटुंबांना डेंग्यू, मलेरिया आणि इतर डासांमुळे पसरणाऱ्या आजारांचा प्रसार करणाऱ्या डासांपासून सुरक्षित राहण्यास मदत करण्याचे उद्दिष्ट ब्रँडने ठेवले आहे. या अभियानांतर्गत संपूर्ण भारतातील शाळांमध्ये विविध उपक्रम राबवले जाणार असून, जनजागृती सत्रांच्या माध्यमातून विद्यार्थी, शिक्षक आणि पालकांशी संवाद साधला जाणार आहे.